# प्रकरण १

# १

# सार्वजनिक आयव्यय - I

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना: सार्वजनिक आयव्ययाचा अर्थ

१.२ सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती व कार्ये

१.३ महत्तम सामाजिक लाभाचे तत्त्व- डाल्टन आणि मस्ग्रेव्हांचा दृष्टिकोन

१.४ सारांश

१.५ प्रश्न

## १.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- सार्वजनिक आयव्ययाचा अर्थ समजून घेणे.
- सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती समजून घेणे.
- साधनसामुग्रीच्या वाटपाचे आणि आर्थिक स्थैर्याचे कार्य समजून घेणे.
- विकासात्मक आयव्ययाची संकल्पना समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना: सार्वजनिक आयव्ययाचा अर्थ (INTRODUCTION OF MEANING OF PUBLIC FINANCE)

ॲडम स्मिथ यांनी त्यांच्या काळात असे प्रतिपादन केले होते की,' जे सरकार कमीत कमी कार्य करते ते सरकार उत्कृष्ट असते'. कारण ॲडम स्मिथने सरकारच्या कार्याबद्दल सांगत असताना प्रामुख्याने चार गोष्टी गृहीत धरल्या होत्या त्या म्हणजे

- प्रत्येक व्यक्ती हा समंजस आहे.
- प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे हित कळते.
- प्रत्येक व्यक्ती हा स्वार्थी आहे.
- प्रत्येक व्यक्ती स्वतःचे हित साधून घेण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतो.

त्यामुळे सरकारने लोकांचे हित किंवा कल्याण साधण्यासाठी वेगळे काही करण्याची गरज नाही. कारण प्रत्येक व्यक्ती ही स्वतःचे हित साधून घेण्यास समर्थ आहे. त्यामुळे ॲडम स्मिथने असे प्रतिपादन केले की, सरकारने फक्त देशाच्या सीमारेषांचे संरक्षण करणे

munotes.in

म्हणजेच परकीय आक्रमणापासून संरक्षण, देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे आणि सार्वजनिक शिक्षण, आरोग्य व पाणीपुरवठा या सुविधा उपलब्ध करून देणे एवढेच कामे करावीत.

पण आधुनिक काळात मात्र जगातील अनेक देशांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे. म्हणजेच आपल्या देशातील जनतेचे जास्तीत जास्त सामाजिक आर्थिक कल्याण साधणे होय. आणि यातूनच अलीकडील काळात सरकारी कार्यांचा व्याप हा मोठ्या प्रमाणावर वाढत गेला.

सरकारला जनतेचे कल्याण साधावयाचे असेल तर, जनतेच्या कल्याणासाठी अनेक कामे करावी लागतात. आणि ही कामे करण्यासाठी सरकारकडे मोठ्या प्रमाणावर उत्पन्न जमा व्हावे लागते. सरकार हे उत्पन्न विविध मार्गांनी मिळवि ते. त्यामध्ये प्रामुख्याने कर, शासकीय उत्पन्न, अनुदाने व देणग्या आणि व्यापारी उत्पन्न या विविध मार्गांनी सरकार उत्पन्न मिळविते. आणि हे मिळालेले उत्पन्न जनतेच्या, सामाजिक, आर्थिक कल्याणासाठी, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, पाणीपुरवठा, रस्ते बांधणी, रेल्वे मार्ग, धरणे, ऊर्जा प्रकल्प, दळणवळण, देश संरक्षण, इत्यादी कार्यांवर खर्च करते. म्हणजेच सार्वजनिक आयव्य यात सरकारच्या उत्पन्नाची साधने आणि खर्चाचे मार्ग यांचा प्रामुख्याने विचार केला जातो.

मुळात 'सार्वजनिक आयव्यय' या शब्दांचा अर्थ पाहिल्यास सार्वजनिक म्हणजे सरकारचे आणि 'आयव्यय' या शब्दातील 'आय' म्हणजे 'उत्पन्न' आणि 'व्यय' म्हणजे 'खर्च' होय. यावरून सार्वजनिक आयव्यय म्हणजे ज्या विषयात सरकारचे उत्पन्न व सरकारचा खर्च यांचा विचार केला जातो असा विषय होय. आज 'सार्वजनिक आयव्यय' ही अर्थशास्त्राची एक स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून उदयाला आली आहे.

**सार्वजनिक आयव्यय याच्या व्याख्या:**

१. **प्रा. फिलिप टेलर** 'सार्वजनिक आयव्यय हे राजकोषीय शास्त्र आहे. त्याची धोरणे ही राजकोषीय धोरणे आहेत. त्यातील अडचणी या राजकोषीय अडचणी असतात.''

२. **फिंडले शिरस:** 'सार्वजनिक सत्तांचा उत्पन्न मिळविण्याच्या व खर्च करण्याच्या पद्धतीशी ज्या शास्त्राचा संबंध आहे त्याला सार्वजनिक आयव्यय म्हणतात.

३. **डॉक्टर डाल्टन:** ''अर्थकारण व राजकारण या दोघांच्या सीमारेषां मध्ये असणारा एक विषय म्हणजे सार्वजनिक आयव्यय होय.''

४. **सी. पी. बॅस्टॅबल:** ''सार्वजनिक राज्यातील सार्वजनिक सत्तेचे उत्पन्न व खर्च तसेच त्यांचा परस्परांशी असलेला संबंध तसेच वित्तीय प्रशासन व नियंत्रण ह्यांचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.''

वरील सर्व व्याख्यान वरून हे स्पष्ट होते की, 'सार्वजनिक आयव्यय म्हणजे सार्वजनिक सत्तांचे उत्पन्न आणि खर्च या संबंधीचे विवेचन यामध्ये असते. तसेच सरकार आपले

उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ घालून जनतेचे सामाजिक आर्थिक कल्याण कसे चालते याचा विचार प्रामुख्याने केला जातो.

## १.२ सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती व कार्ये (SCOPE AND FUNCTIONS OF PUBLIC FINANCE)

सार्वजनिक आयव्ययाच्या व्याप्ती मध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होतो:

**१. सार्वजनिक उत्पन्न:**

सार्वजनिक आयव्ययाच्या सार्वजनिक उत्पन्न या विभागात सरकारला विविध मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केला जातो. यामध्ये प्रामुख्याने करांपासून मिळणारे उत्पन्न, प्रशासकीय उत्पन्न, अनुदाने व देणग्या, तसेच व्यापारी उत्पन्नाचा समावेश होतो. करामध्ये प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर इत्यादीचा समावेश होतो.

प्रशासकीय उत्पन्नामध्ये परवाना फी, दंड, शुल्क, इत्यादींचा समावेश होतो. तर व्यापारी उत्पन्नामध्ये सरकारी उद्योगातील, नफा, पोस्ट खाते, रेल्वे, इत्यादी पासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केला जातो.

**२. सार्वजनिक खर्च:**

सरकारला विविध मार्गांनी मिळणारे उत्पन्न सरकार लोकांच्या सामाजिक, आर्थिक कल्याणासाठी खर्च करते. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक शिक्षण व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, रस्ते बांधणी, रेल्वे मार्ग निर्मिती, गरिबांना कमीत कमी किमतीत प्राथमिक सेवा सुविधा पुरविणे इत्यादीचा समावेश. होतो सार्वजनिक खर्च करत असताना सरकार नेहमी महत्तम सामाजिक कल्याणाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवते.

**३. सार्वजनिक कर्ज:**

जेव्हा विविध मार्गांनी सरकारला मिळणारे उत्पन्न कमी पडते, तेव्हा सरकार विविध कल्याणकारी कामांच्या पूर्ततेसाठी देशांतर्गत तसेच देशाबाहेरून सार्वजनिक कर्जाची उभारणी करते, सार्वजनिक आयव्ययाच्या भागात सार्वजनिक कर्ज कोणत्या मार्गांनी उभे करावे, तसेच त्या कर्जाचे व्याजदर आणि व्यवस्थापन कसे करावे इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**४. वित्तीय किंवा सार्वजनिक प्रशासन:**

सार्वजनिक आयव्ययाची ही महत्वाची शाखा मानली जाते. कारण यामध्ये वित्तीय प्रशासन हे अंदाजपत्रक तयार करणे, वेगवेगळ्या करांचे दर सुचविणे इत्यादी कामे करते.

**५. संघीय वित्त व्यवस्था:**

भारतासारख्या देशात संघराज्य शासन प्रणाली अस्तित्वात आहे. यामध्ये केंद्रीय स्तरावर केंद्र सरकार व राज्य सरकार कार्यरत असते. अशा वेळी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी कोणकोणते कर आकारावेत, तसेच या विविध करांचा पासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे

munotes.in

वाटप केंद्र आणि राज्य सरकार या दोघांमध्ये कशा पद्धतीने व्हावे, तसेच गरजेच्या वेळी राज्यांना सहाय्य किंवा अनुदान देणे इत्यादी बाबींचा समावेश असतो.

**६. स्थिरता व विकास:**

आजच्या काळामध्ये सार्वजनिक काव्याचा वापर करून देशांतर्गत विविध वस्तूंच्या किंमत पातळीत स्थिरता राखण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढविणे आणि स्थैर्यासह आर्थिक विकासाचे ध्येय गाठण्याचा प्रयत्न केला जातो.

**सार्वजनिक आणि खाजगी आयव्यय यातील साम्य व भेद:**

सार्वजनिक आयव्यय हे सरकारचे उत्पन्न आणि खर्च यांचेशी संबंधित असते तर खाजगी आयव्यय हे वैयक्तिक व्यक्तीचे उत्पन्न आणि खर्च याचेशी संबंधित असते.

असे असले तरी या दोन्हींमध्ये पुढील बाबतीत साम्य किंवा सारखेपणा आढळतो:

१. सार्वजनिक आयव्यय व खाजगी आयव्यय या दोन्हींमध्ये ही उत्पन्न आणि खर्च या दोन्हींचा मेळ घालावा लागतो.

२. या दोन्हींमध्ये ही कमीत कमी खर्चात आणि कमीत कमी साधन संपत्तीचा वापर करून जास्तीत जास्त समाधान किंवा लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

३. उत्पन्न व खर्च या दोन्ही मधील तफावत भरून काढण्यासाठी दोघांनाही प्रयत्नशील रहावे लागते.

४. सार्वजनिक आयव्यय आणि खाजगी आयव्यय यामधील व्याप्ती व संस्था या गुंतवणूक आणि खर्चात वाढ करून त्यांचे त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात.

## १.३ सार्वजनिक आयव्यय आणि खाजगी आयव्यय यातील भेद (DIFFERENCE BETWEEN PUBLIC FINANCE AND PRIVATE FINANCE)

**१. हेतू:**

खाजगी आय याचा हेतू हा विविध व्यवहारातून जास्तीत जास्त नफा मिळविणे हा असतो. तर सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून सरकार जनतेचे सामाजिक - आर्थिक कल्याण कसे साधले जाते हे पाहिले जाते.

**२. उत्पन्न व खर्च यांचा मेळ:**

खाजगी आय व्ययात आधी उत्पन्न पाहून त्यानंतर रोज खर्च केला जातो. म्हणजेच मराठी भाषेतील म्हणी नुसार 'अंथरूण पाहून पाय पसरणे' याचा अवलंब खाजगी आय व्ययात केला जातो. तर याउलट सार्वजनिक आयव्यय आत सरकार आधी खर्च ठरविते आणि त्यानंतर तो खर्च भागविण्यासाठी कोणकोणत्या मार्गांनी किती उत्पन्न मिळवायचे हे ठरविले जाते.



munotes.in

### ३. कर आकारणी:

सरकारला जिल्हा ज्यादा उत्पन्नाची गरज असते तेव्हा सरकार जनतेवर विविध करांची आकारणी करून हे उत्पन्न मिळविते. मात्र खाजगी आयव्ययात व्यक्तीला असे करता येत नाही. खाजगी आय व्ययात व्यक्ती किंवा संस्था यांना जादा उत्पन्न हवे असल्यास ते कष्ट करून किंवा व्यापार, उद्योग करूनच मिळवावे लागते. इतरांवर आकारता येणार नाही.

### ४. वस्तू व सेवा यांच्या उत्पादनाचा उद्देश:

खाजगी आयव्ययामध्ये वस्तू व सेवा यांच्या उत्पादनाचा उद्देश हा जास्तीत जास्त नफा मिळविणे हा असतो तर सार्वजनिक आयव्ययात जनतेचे सामाजिक, आर्थिक कल्याण साधणे हा उद्देश असतो.

### ५. निर्णय घेण्याचा कालावधी:

खाजगी आय व्ययात व्यक्ती किंवा संस्था जेव्हा त्यांच्या आर्थिक घडामोडी बाबत विविध निर्णय घेतात तेव्हा नेहमी अल्प काळाचा विचार करतात. मात्र सार्वजनिक आय व्ययात मात्र एखाद्या आर्थिक बाबींचा निर्णय घेतात. तेव्हा एखाद्या आर्थिक निर्णयाचा दीर्घकाळात काय परिणाम होईल याचा विचार करावा लागतो.

### ६. कर्ज घेण्याच्या संदर्भात:

खाजगी व्यक्ती किंवा संस्था जेव्हा त्यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी किंवा विविध आर्थिक व्यवहार पार पाडण्यासाठी जादा पैशाची गरज लागते तेव्हा ते स्वतःच स्वतःकडून कर्ज घेऊ शकत नाहीत. मात्र सर्व आय आयव्यय मात्र जेव्हा सरकारला जादा पैशाची गरज पडते तेव्हा सरकार कर्ज रोख्यांच्या या माध्यमातून देशातील जनतेकडून कर्ज घेऊ शकते. म्हणजेच सरकार स्वतःचा कडून कर्ज घेऊ शकते.

### ७. पैशाचा पुरवठा:

जेव्हा सरकारच्या उत्पन्नापेक्षा सरकारचा खर्च वाढतो तेव्हा सरकार नोटा छापून हा खर्च भरून काढते. पण खाजगी आयव्ययाा व्यक्तीला आपला जादा खर्च भरून काढण्यासाठी नोटा छापता येत नाहीत. आणि तसे केल्यास व्यक्तीला तुरुंगात जावे लागेल.

### ८. अंदाज पत्रक:

खाजगी आय व्ययात व्यक्तीचे अंदाजपत्रक हे नेहमी शिलकीचे असते. तर सार्वजनिक आयव्ययात सरकारचे अंदाजपत्रक हे तुटीचे असते किंबहुना ते तुटीचे असावे असे प्रतिपादन जे. एम. एम केन्स यांनी केले आहे.

## १.३ महत्तम सामाजिक लाभाचे तत्त्व (PRINCIPLE OF MAXIMUM SOCIAL ADVANTAGE)

सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून सरकार विविध मार्गांनी मोठ्या प्रमाणावर उत्पन्न जमा करते. सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नापैकी सर्वात जास्त उत्पन्न म्हणजे जवळजवळ

७६ टक्के उत्पन्न हे निव्वळ विविध करांपासून मिळते. प्रगतिशील कर रचनेच्या माध्यमातून जादा उत्पन्न असणाऱ्यांवर जादा दराने कर आकारणी केली जाते. आणि हे विविध करांपासून तसेच इतर मार्गांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून समाजाला विविध सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. करांच्या सहाय्याने श्रीमंत लोकांजवळील पैसा हा शासकीय यंत्रणेकडे हस्तांतरित केला जातो आणि पुन्हा हाच पैसा विविध योजनांच्या या माध्यमातून समाजाकडे परत येतो. म्हणजे एक प्रकारचे संपत्तीचे पुर्नवाटप होते. म्हणजेच महत्तम सामाजिक लाभाच्या तत्त्वांमध्ये जनता सरकारला भरते आणि त्याग करते. पण हाच कर भरलेला पैसा पुन्हा विविध योजनांच्या माध्यमातून लोकांकडे येतो आणि लोकांना लाभ होतो.

**'महत्तम सामाजिक लाभाचे तत्व- व्याख्या:**

**डाल्टन यांचे महत्तम सामाजिक लाभाचे तत्त्व:**

'सार्वजनिक उत्पन्न प्राप्त करण्याच्या प्रक्रियेमुळे जनतेला करावा लागणारा सीमांचा त्याग व खर्च करण्याच्या प्रक्रियेमुळे मिळणारा सीमांत लाभ या बिंदूच्या ठिकाणी समान होतात तो महत्तम सामाजिक लाभाचा बींदू होय.


महत्तम सामाजिक लाभाच्या तत्वात ज्या ठिकाणी कर भरून जनतेचा होणारा सीमांत त्याग हा सरकारने केलेल्या कल्याणकारी कामांमुळे जनतेला मिळणारा लाभ हे दोन्ही समान होतात तेथे महत्तम सामाजिक लाभ निश्चित होतो.

पुढील कोष्टकावरून व आकृतीवरून स्पष्ट होईल:

| सार्वजनिक आयव्ययाची मात्रा (संख्या) | सीमांत त्याग (कोटी रुपये) | सीमांत लाभ (कोटी रुपये) |
|---|---|---|
| १ | २० | ६० |
| २ | ३० | ५० |
| ३ | ४० | ४० |
| ४ | ५० | ३० |
| ५ | ६० | २० |

वरील कोष्टकात सार्वजनिक आयव्ययाच्या तिसऱ्या मात्रेला सीमांत सामाजिक त्याग आणि सीमांत सामाजिक लाभ दोन्ही समान आहेत. म्हणजेच प्रत्येकी अनुक्रमे चाळीस चाळीस कोटी रुपये आहेत. त्यामुळे तो समतोलाचा बिंदू आहे. कारण या बिंदूला कर भरून समाजाचा होणारा सामाजिक त्याग हा ४० कोटी रुपये आहे. आणि सरकारने समाजासाठी केलेल्या कल्याणकारी कामांमुळे समाजाला मिळणारा लाभ ही ४० कोटी रुपये इतका आहे. यालाच महत्तम सामाजिक लाभाचे तत्व म्हणतात. आकृतीच्या सहाय्याने याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

munotes.in




**सार्वजनिक आयव्यय संख्या**

**आकृती क्र. १.१**

बाजूच्या आकृतीत OX अक्षावर सार्वजनिक आयव्ययाच्या मात्रा दर्शविल्या आहेत तर OY अक्षावर सीमांत त्याग व सीमांत लाभ दर्शविला आहे. आकृतीत सीमांत त्यागाचा वक्र MM आणि सीमांत लाभाचा वक्र PP एकमेकांना 'S' या बिंदूत छेदतात. अशा वेळी सार्वजनिक आयव्ययाच्या 3 या मात्रेला सीमांत सामाजिक लाभ सीमांत सामाजिक त्याग हे दोन्ही समान म्हणजेच ४०-४० कोटी रुपये आहेत.

**महत्तम सामाजिक लाभाचे निकष पुढील प्रमाणे आहेत:**

डॉक्टर डाल्टन यांनी सार्वजनिक आयव्ययातील व्यवहारामुळे समाजाचे महत्तम हित साधले जाते की नाही हे पाहण्यासाठी काही निकष सांगितले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत:

**१. सामाजिक सुरक्षितता:**

देशाच्या जलद आणि स्थिरतेसह आर्थिक विकासासाठी देशांतर्गत शांतता व सुव्यवस्था असणे गरजेचे आहे. तसेच परकीय आक्रमणांपासूननही देशाला वाचविणे गरजेचे आहे. त्यामुळे देशात सामाजिक सुरक्षितता असेल तर सरकार अधिक मजबूत होईल. परिणामी समाजाचे महत्तम हित साधले जाईल.

**२. उत्पादन पद्धतीत सुधारणा होणे आवश्यक आहे:**

डॉक्टर डाल्टन यांच्या मते उत्पादन पद्धतीत होणारी सुधारणा ही प्रामुख्याने पुढील तीन बाबींवर अवलंबून असते.

**अ) विविध वस्तूंच्या उत्पादन क्षमतेत वाढ:** देशामध्ये उत्पादित केल्या जाणाऱ्या विविध वस्तूंच्या उत्पादनक्षमतेत जर मोठ्या प्रमाणात वाढ झाली तर त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढून दरडोई उत्पन्न वाढेल आणि यालाच उत्पादनक्षमतेत सुधारणा असे म्हणता येईल.

**ब) उत्पादन संघटनेत सुधारणा:** सुधारणा म्हणजे जर कामगार प्रतिनिधींना उत्पादन व्यवस्थापन प्रक्रियेत योग्य स्थान दिले तर हे कामगार अधिक मन लावून काम करतील आणि अपव्यय होणार नाही. उत्पादन घटकांचा पुरेपूर वापर होईल.

**क) उत्पादन रचनेत सुधारणा:** उत्पादन रचनेत सुधारणा झाल्याने जास्तीत जास्त वस्तूंचे उत्पादन होईल आणि विविध लोकांच्या गरजा भागून निर्यातही वाढेल आणि समाजाचे हित साधले जाईल.

**३) संपत्तीच्या वाटपाची सुधारणा:**

सार्वजनिक आयव्ययाच्या व्यवहारांमुळे संपत्तीच्या वाटपातही सुधारणा झाली पाहिजे असे डॉक्टर डाल्टन यांचे मत आहे. या सुधारणा प्रामुख्याने दोन प्रकारच्या आहेत.

**अ) आर्थिक विषमता कमी करणे:** समाजातील श्रीमंत लोकांवर मोठ्या प्रमाणावर कर बसवून त्यांचे उत्पन्न काढून घेणे आणि मिळालेल्या उत्पन्नातून गोरगरिबांना सोईसुविधा उपलब्ध करून दिल्यास आर्थिक विषमता कमी होईल.

**ब) उत्पन्नात होणारे चढ-उतार कमी करणे:** समाजामधील कोणत्याही व्यक्तीचे उत्पन्न हे सदासर्वकाळ स्थिर राहत नाही. त्यामध्ये सातत्याने चढ-उतार होत असतात. त्यामुळे संपत्तीच्या पुनर्वाटपातून हे चढ उतार कमी करता येतात.

**४) आर्थिक स्थिरता आणि रोजगार संधींची निर्मिती करणे:**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी व आर्थिक अस्थिरता आढळते. अशावेळी सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य निर्माण करणे आणि रोजगार संधी वाढविल्यास समाजाचे हित साधले जाईल.

**महत्तम सामाजिक लाभ तत्वाच्या मर्यादा/दोष पुढील प्रमाणे आहेत:**

**१. अस्पष्ट संकल्पना:**

टीकाकारांच्या मते महत्तम लाभ तत्वाची संकल्पना अस्पष्ट आहे. या तत्त्वानुसार सामाजिक कल्याण कसे साध्य होते ते स्पष्ट होत नाही.

**२. त्यागाचे मापन अशक्य:**

एखाद्या व्यक्ती ने किंवा समाजाने सरकारला कर भरून नेमका किती त्याग केला त्याचे नेमके मापन होणे अशक्य आहे. कारण प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत पैशाची सीमांत उपयोगिता वेगवेगळी असते.

**३. लाभाचे मापन अशक्य:**

त्यागाप्रमाणेच सरकारी खर्चाचा कोणाला किती लाभ झाला हे सांगणेही अवघड आहे.

**४. अव्यवहार्य संकल्पना:**

काही टीकाकारांच्या मते ही संकल्पना अव्यवहार्य आहे. कारण लाभ आणि त्याग या दोन्हींचे मापन करणे अशक्य असल्याने ही संकल्पना व्यवहार्य वाटत नाही.

**५. संवेदनक्षम मनाचा अभाव:**


सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून कर भरल्यामुळे कोणाला किती त्या करावा लागला आणि सरकारने केलेल्या खर्चामुळे कोणाला किती लाभ झाला त्या सर्वाचे मापन करण्यासाठी संवेदनक्षम मनाची गरज असते. पण सरकारी अधिकारी व राजकारणी यांच्याकडे असे संवेदनक्षम नसते. ते कायद्याच्या चौकटीत राहून काम करत असतात. परिणामी समाज हिताकडे दुर्लक्ष होते.

**६. आज हित/कल्याण ठरविणे अवघड:**

आपल्याकडे समाजहिताच्या वेगवेगळ्या संकल्पना अस्तित्वात आहेत. त्यामध्ये कोणाला भौतिक हित आवडते तर कोणाला सांस्कृतिक, कोणाला शैक्षणिक हित आवडते. त्यामुळे नेमके समाजहित ठरविणे अवघड आहे.

अशाप्रकारे महत्तम सामाजिक लाभ तत्त्वा च्या वरील मर्यादा आहेत. तरीही सरकारने उत्पन्न कसे मिळवावे आणि हे उत्पन्न समाजकल्याणासाठी कशा प्रकारे खर्च करावे याचे उत्कृष्ट मार्गदर्शन या तत्त्वामुळे निश्चितच कळते.

**महत्तम सामाजिक लाभाचा मसग्रेव यांचा सिद्धांत:**




**आकृती १.२**

munotes.in

आकृतीमध्ये OX अक्षावर सरकार कडून विविध सेवांवर खर्च होणाऱ्या पैशाची मात्रा किंवा संख्या दर्शविली आहे. आकृती मधील $LL_1$ ही वरील रेषा सरकारी सेवांमुळे समाजाला होणारा सीमांत सामाजिक लाभ दर्शविते. ही रेषा ऋणात्मक उताराची आहे. कारण वाढत्या सरकारी खर्चानुसार सीमांत सामाजिक लाभ हा घटत जातो.

OX अक्षरावरील $TT_1$ ही रेषा समाजाचा सीमांत सामाजिक त्याग दर्शविते. $SS_1$ ही तुटक रेषा सीमांत शुद्ध सामाजिक लाभ वक्र रेषा आहे. शुद्ध सामाजिक लाभ मोजण्यासाठी लाभा मधून त्याग वजा करावा लागतो.

$SS_1$ हा वक्र OX अक्षाला' 'N' बिंदूत शुद्ध सामाजिक लाभ महत्तम आहे. कारण याठिकाणी सीमांत सामाजिक लाभ हा सीमांत सामाजिक त्यागा बरोबर आहे.

## १.५ सारांश (SUMMARY)

- सार्वजनिक आयव्ययात सरकारचे उत्पन्न आणि सरकारचा होणारा खर्च यांचा प्रामुख्याने विचार केला जातो.
- सार्वजनिक आयव्ययाच्या व्याप्ती मध्ये प्रामुख्याने सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च सार्वजनिक कर्ज, वित्तीय व्यवस्थापन, संगीत वित्तव्यवस्था आणि स्थिरता व विकास यांचा समावेश होतो.
- महत्तम सामाजिक तत्वामध्ये प्रामुख्याने देशातील जनतेने सरकारला कर भरून जो सीमांत सामाजिक त्याग केला आणि त्या बदल्यात सरकारने जनतेला ज्या सेवा-सुविधा पुरविल्या त्यामुळे समाजाला किती सीमांत सामाजिक लाभ झाला हे पाहिले जाते. आणि ज्या बिंदू सामाजिक= सीमांत सामाजिक लाभ असे आढळते त्या बिंदूला महत्तम सामाजिक लाभ तत्त्व असे म्हणतात
- मसग्रेव यांनी सुद्धा आपले महत्तम सामाजिक लाभ तत्त्व मांडले.

## १.६ प्रश्न (QUESTIONS)

१. सार्वजनिक आय व्यय आची संकल्पना स्पष्ट करणे.

२. सार्वजनिक आयव्यय याची व्याप्ती विशद करा.

३. डाल्टन यांचे महत्त्व सामाजिक लाभ तत्व स्पष्ट करा.

४. मसग्रेव यांचे महत्तम सामाजिक लाभ तत्व स्पष्ट करा.

५. सार्वजनिक आय-व्यय आणि खाजगी आयव्यय यातील साम्य व भेद स्पष्ट करा.

*****

munotes.in

# २

# सार्वजनिक आयव्यय - II

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे
२.१ कार्यक्षमता म्हणजे काय?
२.२ बाजार यंत्रणा
२.३ बाजार अपयश : व्याख्या व अर्थ
२.४ सार्वजनिक वस्तू म्हणजे काय?
२.५ बाजार अपयश आणि सरकारची भूमिका
२.६ सारांश
२.७ प्रश्न

## २.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- कार्यक्षमतेची संकल्पना समजावून घेणे.
- कार्यक्षमता, बाजार व सरकार यातील संबंध अभ्यासणे.
- सार्वजनिक वस्तू म्हणजे काय तिची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
- सरकारच्या या भूमिकेचा अभ्यास करणे.

## २.१ कार्यक्षमता म्हणजे काय? (WHAT IS EFFICIENCY?)

कार्यक्षमता ही संकल्पना अर्थव्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. 'अर्थ व्यवस्थेतील कार्यक्षमता म्हणजे देशातील किंवा समाजातील लोक जेव्हा दुर्मिळ असणाऱ्या साधन संपत्तीचा कार्यक्षम वापर करून घेऊन जास्तीत जास्त फायदा मिळवितात, अशी अवस्था होय. मुळात मानवी समाजाच्या गरजा या अमर्यादित असतात. पण त्या गरजा पूर्ण करणारी साधन संपत्ती मात्र मर्यादित असते, कमी असते. तेव्हा मर्यादीत साधनांच्या सहाय्याने जेव्हा अमर्यादित गरजा भागवावे लागतात तेव्हा उपलब्ध असणाऱ्या साधन संपत्तीचा अतिशय काटकसरीने आणि कार्यक्षमतेने वापर करावा लागतो. आणि असे झाले तरच समाजाला जास्तीत जास्त फायदा मिळेल.

थोडक्यात "कार्यक्षमता म्हणजे अर्थव्यवस्थेतील उपलब्ध साधन सामुग्रीचे योग्य नियोजन करून आणि त्याचे वाटप करून त्याद्वारे समाजाला महत्तम लाभ मिळवून देणे होय."

कार्यक्षमतेची ही संकल्पना आपण उत्पादन शक्यता वक्राच्या आधारे समजावून घेऊ. सर्वसाधारणपणे समाजातील लोकांचे सामाजिक, आर्थिक कल्याण हे लोकांच्या उपभोग पातळीवर अवलंबून असते. समाजातील लोकांना विविध वस्तू व सेवांचा उपभोग जेवढ्या



munotes.in

मोठ्या प्रमाणावर येता येईल तेवढे समाजाचे हित, कल्याण हे वाढत जाते. उच्च पातळीवरील आर्थिक कल्याण साधण्यासाठी साधन संपत्तीचा कार्यक्षमपणे वापर व वितरण होणे हे आवश्यक असते. देशामध्ये उपलब्ध असणाऱ्या उत्पादन साधनांचे वितरण हे कार्यक्षम आहे कि नाही हे पाहण्यासाठी आपल्याला उत्पादन शक्यता वक्र या संकल्पनेचा आधार घ्यावा लागेल.

पुढील कोष्टकावरून व आकृती वरून आपण उत्पादन शक्यता वक्र ही संकल्पना समजावून घेऊ.

**उत्पादन शक्यता वक्र तक्ता**

**तक्ता क्र. २.१**

| उत्पादन शक्यता | उपभोग्य वस्तू ( कोटी) | भांडवली वस्तू (कोटी) |
|---|---|---|
| A | ० | १५ |
| B | १ | १४ |
| C | २ | १२ |
| D | ३ | ०९ |
| E | ४ | ०५ |
| F | ५ | ०० |

वरील कोष्टकात A या वस्तू समूहाच्या वेळेला देशातील सर्व साधन संपत्ती भांडवली वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी वापरली तर देशामध्ये १५ कोटी इतक्या भांडवली वस्तुचे उत्पादन होईल व ० कोटी (म्हणजे काहीच नाही) इतक्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन होईल.

नंतर 'B' या वस्तू समूहाच्या वेळेला काही साधन संपत्ती ही भांडवली वस्तूच्या उत्पादनासाठी वापरली जाईल तेव्हा १४ कोटी इतक्या भांडवली वस्तूंचे उत्पादन होईल. तसेच काही साधन संपत्ती ही उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरली जाईल आणि ०१ कोटी इतक्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन होईल.


पुन्हा C या वस्तू समूहाच्या वेळेला काही साधन संपत्तीभांडवली वस्तू आणि उपभोग्य वस्तू यांच्या उत्पादनासाठी वापरली जाईल तेव्हा बारा कोटी भांडवली वस्तू आणि २ कोटी उपभोग्य वस्तूंचे उत्पादन होईल.

त्यानंतर O या वस्तू समूहाच्या वेळेला ०१ कोटी भांडवली वस्तू आणि ०३ कोटी उपभोग्य वस्तूंचे उत्पादन होईल. नंतर E या वस्तू समूहाच्या वेळेला ०५ कोटी इतक्या भांडवली वस्तूंचे उत्पादन केले जाईल आणि ०४ कोटी इतक्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन केले जाईल.

आणि शेवटी F या वस्तू समूहाच्या वेळेला जेव्हा सर्वच साधनसंपत्ती उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरली जाईल तेव्हा ०५ कोटी इतक्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन होईल आणि ० कोटी (म्हणजे काहीच नाही) इतक्या भांडवली वस्तूंचे उत्पादन होईल.

आता वरील विश्लेषण....वरून आपल्याला पाहावे लागेल की जर त्या देशाने सर्वच्या सर्व साधन संपत्ती ही उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर खर्च केली तर ० कोटी (म्हणजे काहीच नाही) इतक्या भांडवली वस्तूंचे उत्पादन होईल आणि सर्वच्या सर्व साधन संपत्ती जर भांडवली वस्तूंच्या उत्पादनावर खर्च केली तर उपभोग्य वस्तूंचे उत्पादन हे शून्य होईल. पण देशाला दोन्ही वस्तूंच्या उत्पादनाची गरज आहे त्यामुळे हा देश उत्पादनासाठी A किंवा F ही शक्यता निवडणार नाही. तर तो देश B,C,D,E, यापैकी कोणतीतरी एक शक्यता निवडेल.

आता आपण उत्पादन शक्यता वक्राची आकृती पाहू.




**आकृती क्र. २.१**

वरील आकृतीमध्ये उत्पादन शक्यता ही B, C, D, E या चार पैकी कोणत्याही एका बिंदूवर असेल. A किंवा F बिंदूवर असणार नाही. कारण N हा बिंदू उत्पादन शक्यता वक्राच्या आतील बाजूस असल्याने या बिंदूवर उत्पादन केल्यास त्या देशातील सर्व साधन संपत्ती वापरली जाणार नाही ती पडून राहील. त्यामुळे उत्पादन अजून पुढे सरकेल व हा वक्र ABCDEF असा होईल.

तसेच या उत्पादन शक्यता वक्राच्या बाहेर एक M हा बिंदू आहे. तर या M हा बिंदू आहे. तर या M बिंदूपर्यंत उत्पादन शक्यता वक्र जाईल का? असा जेव्हा प्रश्न पडतो तेव्हा त्याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल कारण M हा वरच्या पातळीवरील बिंदू असल्याने तेथे पोहोचण्यास त्या देशाला जादा साधन संपत्ती हवी आहे.पण तेवढी त्या देशाकडे नाही. त्यामुळे आहे त्या उत्पादन शक्यता वक्रावरील BCDE या बिंदूतच उत्पादन हे कार्यक्षमपणे शक्य होईल.

## २.२ बाजार यंत्रणा (MARKET MECHANISM)

जगामधील प्रत्येक देशात सतत काहीना काही आर्थिक घडामोडी या चालू असतात. या घडामोडींमध्ये प्रामुख्याने विविध ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन, त्यांचे वाटप आणि उपभोग यांचा समावेश होतो. त्याच प्रमाणे अर्थव्यवस्थेत विविध वस्तूंचे उत्पादन करणारे उत्पादक,

वितरक आणि या विविध वस्तूंचा उपभोग घेणारे उपभोक्ते यांचा समावेश होतो. पण बराच वेळ अर्थव्यवस्थेतील उत्पादकांसमोर काही प्रश्न पडतात ते म्हणजे कोणत्या वस्तूचे उत्पादन करावे? उत्पादन कोणत्या पद्धतीने करावे? उत्पादन कुठे करावे? कोणासाठी उत्पादन करावे? आणि त्याचे वाटप कसे करावे? इ. प्रश्न निर्माण होतात आणि असे प्रश्न सोडविण्यासाठी जगात विविध आर्थिक यंत्रणा निर्माण झाल्या आहे. त्यामध्ये बाजार यंत्रणेचा समावेश होतो. बाजार म्हणजे असे ठिकाण की जेथे विविध वस्तूंच्या खरेदी-विक्री तिचे व्यवहार हे पार पडले जातात. कोणत्याही देशाला आर्थिक विकासामध्ये बाजार यंत्रणेची भूमिका अतिशय महत्वाची आहे.

## २.३ बाजार अपयश-व्याख्या व अर्थ (DEFINITION AND MEANING OF MARKET FAILURE)

'बाजार अपयश म्हणजे अशी स्थिती की जिथे मागणी व पुरवठा यामध्ये समतोल नसतो. म्हणजेच मागणीच्या प्रमाणात पुरवठा नसणे किंवा अतिरिक्त पुरवठा असणे अशी स्थिती होय.

तसेच बाजार अपयश म्हणजे अर्थव्यवस्थेला आदर्श किंवा पर्याप्त उत्पादन पातळी गाठण्यात अपयश येणे होय.

बाजार अपयशामुळे बाजार यंत्रणा अर्थव्यवस्थेत सर्वसाधारण समतोल प्रस्थापित करू शकत नाही. अपुरी संसाधने, मागणी पुरवण्यात असमतोल इ. कारणामुळे बाजार यंत्रणा कार्यक्षमपणे काम करू शकत नाही.

### २.३.१ बाजार अपयशाची कारणे - पुढील प्रमाणे:

**१. अपूर्ण स्पर्धा:**

बाजा यंत्रणेचे यश हे प्रामुख्याने पूर्ण स्पर्धेवर अवलंबून असते. पण आज बहुतेक एक अपूर्ण स्पर्धा, मक्तेदारी अशा प्रकारच्या बाजारपेठा असल्याने ग्राहकांना जादा किंमत मोजावी लागते परिणामी ग्राहकांचे नुकसान होते.

**२. बाह्यता:**

बाह्यता म्हणजे एखाद्या ठिकाणाच्या औद्योगिक विकासाचे किंवा आर्थिक विकासाचे लोकांवर तसेच पणपर्यावरणावर होणारे घनिष्ठ परिणाम होय. उदा; पर्यावरणाच्या प्रदूषणा मुळे विविध आजार होणे, जलप्रदूषण, हवा प्रदूषण, भूमीप्रदूषण इत्यादी या सर्वांचे अनिष्ट परिणाम हे समाजाला भोगावे लागतात.

**३. अपूर्ण माहिती:**

बाजाराच्या यशासाठी उत्पादक व उपभोक्ते यांना बाजाराचे पूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे पण बऱ्याच वेळा त्यांना हे ज्ञान असते परिणामी ग्राहक व उत्पादक या दोघांनाही नुकसान सहन करावे लागते.

### ४. सार्वजनिक वस्तू:

सार्वजनिक वस्तू किंवा सेवा या शासनाने लोकांनी भरलेल्या करातून निर्माण केल्या जातात. त्यामुळे त्यांची सार्वजनिक मालकी असते. त्यांचा सार्वत्रिक उपभोग घेतला जातो.

### ५. अनुदान रद्द करणे:

बऱ्याच वेळ सरकार सामान्य लोक, उद्योजक यांना काही अनुदाने देत असते आणि त्यामुळे बाजारयंत्रणा ही अपयशी ठरते. अशावेळी ही अनुदाने रद्द केली पाहिजेत.

### ६. सरकारचे कायदे:

बऱ्याच वेळ सरकार आर्थिक विषमता कमी करण्यासाठी, शोषण रोखण्यासाठी कायदे करते तेव्हाही बाजार यंत्रणा ही मोठ्या प्रमाणावर प्रभावित होते व अपयशी ठरते.

### ७. नियमांचे नियंत्रण:

जेव्हा सरकार बाजार यंत्रणेवर कायद्याच्या माध्यमातून उत्पादन, वाटप, संपत्ती, अधिकार करविषयक या संदर्भात बंधने आणते तेव्हा त्याचा अनिष्ठ परिणाम हा बाजारयंत्रणेवर होतो व बाजारयंत्रणा अपयशी ठरते.

अशाप्रकारे वरील कारणांमुळे बाजार यंत्रणा अपयशी ठरते.

## २.४ सार्वजनिक वस्तू म्हणजे काय? (WHAT IS PUBLIC GOODS?)

आज जगातील प्रत्येक राष्ट्राने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहेत. त्यामुळे आपल्या देशातील लोकांचे सामाजिक - आर्थिक कल्याण व्हावे म्हणून सरकार जनतेला ना काही सेवा- सुविधा पुरविते. त्याला सार्वजनिक वस्तू असे म्हणतात.

सार्वजनिक वस्तू म्हणजे अशा वस्तू की, ज्या सरकारने पुरविलेल्या असतात आणि त्यांचा उपयोग हा सामूहिकरीत्याला जातो. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक रस्ते, पाणी, स्वच्छता, विज, वाहतूक, दळणवळण इत्यादी. सोयी-सुविधांचा समावेश होतो.

सार्वजनिक वस्तूंची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:

### १ . सामूहिक उपभोग:

सार्वजनिक वस्तू या कोणा एका व्यक्तीच्या मालकीच्या नसतात. त्यावर संपूर्ण समाजाची मालकी असते. त्यामुळे या वस्तूंचा सामूहिक उपभोग घेतला जातो.

### २. उपभोगात समानता असते:

सार्वजनिक वस्तूचा उपभोग घेताना गरीब-श्रीमंत, उच- नीच असा भेद केला जात नाही. तर या वस्तूंचा सर्वांना समान उपभोग घेण्याची संधी असते .

**३. स्पर्धात्मकतेचा अभाव:**

सरकार सार्वजनिक वस्तू सर्वांना उपलब्ध करून देते. खाजगी वस्तू प्रमाणे त्यात वस्तू भेद केला जात नाही. सार्वजनिक वस्तु या अविभाज्य स्वरूपाच्या असतात. त्यांचा उपभोग घेण्याची सर्वांना समान संधी असते. त्यामुळे त्या मिळविण्यास स्पर्धा करावी लागत नाही.

**४. सार्वजनिक मालकी:**

सार्वजनिक वस्तूंची मालकी ही सार्वजनिक म्हणजे सरकारची असते. कारण या वस्तू व सेवांची निर्मिती ही जनतेने भरलेल्या करातून केली जाते.

**५. शासन नियंत्रण:**

सार्वजनिक वस्तूंची निर्मिती, देखभाल, वापराचे नियम, त्यांची किंमत ठरविणे इत्यादीवर संपूर्णपणे शासनाचे नियंत्रण असते.

**६. माफक मूल्य:**

बऱ्याच वेळा सार्वजनिक वस्तु या मोफत पुरविल्या जातात. उदा. मोफत लसीकरण इत्यादी पण काही सेवा पुरविताना मात्र माफक मूल्य आकारले जाते. उदा. पाणीपट्टी.

**७. सामाजिक कल्याण हा मुख्य हेतू असतो:**

बऱ्याच वेळा सार्वजनिक वस्तू उपलब्ध करून देताना सामाजिक कल्याण साधणे हा शासनाचा हेतू असतो. नफा मिळविणे हा हेतू नसतो. समन्याय, भाववाढ नियंत्रण सामाजिक हित असे उद्देश डोळ्यासमोर ठेवून सार्वजनिक वस्तु पुरविल्या जातात.

अशा प्रकारे वरील सर्व सार्वजनिक वस्तूंची वैशिष्ट्ये आहेत.

## २.५ बाजार अपयश आणि सरकारची भूमिका (MARKET FAILURE AND ROLE OF GOVERNMENT)

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये बाजार यंत्रणेची भूमिका ही अतिशय महत्त्वाची असते. कारण बाजार यंत्रणेच्या विकासामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते, उत्पादन वाढते. परंतु बऱ्याच वेळा बाजार यंत्रणेमुळे काही समस्याही उद्भवतात. उदा. प्रदुषण, बेरोजगारी, गरिबी, बाह्यता, सामाजिक खर्च इत्यादी त्यामुळे बाजार यंत्रणेतील अपयशाचे निराकरण करण्यासाठी शासनाची भूमिका ही अतिशय महत्त्वाची आहे. ही भूमीका बाजार यंत्रणेला अपयशापासून वाचविण्यास मदत करते सरकारची ही भूमिका पुढील प्रमाणे आहे:

**१. बाजार प्रणालीचे ज्ञान देणे:**

बऱ्याच वेळा ग्राहक आणि उपभोक्ते यांना बाजार प्रणालीचे योग्य ज्ञान असते. परिणामी बाजाराला अपयश येते. बाजार व्यवस्थेत उपभोक्ते व उत्पादक या दोघांनाही योग्य ज्ञान असणे आवश्यक आहे. अपुऱ्या व चुकीच्या माहितीमुळे बाजार यंत्रणा अपयशी ठरते. अशा वेळी सरकारने बाजारपेठेत हस्तक्षेप करून समतोल निर्माण करावा लागतो.

**२. कायदेशीर तरतूद:**

सरकारच्या कायदेशीर व्यवस्थेशिवाय बाजारयंत्रणा यशस्वी होऊ शकत नाही. उदा. साठेबाजी करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे, भाववाढीवर नियंत्रण ठेवणे इत्यादी.

**३.** सार्वजनिक व गुणवत्तेच्या वस्तूंचा पुरवठा हा सरकार मार्फत केल्यास बाजार यंत्रणा यशस्वी होण्यास मदत होते.

**४. बाह्यता समस्या दूर करणे:**

उत्पादन प्रक्रियेमुळे आणि आर्थिक विकासामुळे समाजावर हे अनिष्ट परिणाम होतात त्यांना बाह्यता असे म्हणतात उदा. प्रदूषण, जंगलचा नाश, विशेष प्रजातींचा नाश, आजारपण इत्यादी. अशा वेळी सरकारने आपल्या या पत्रकात तरतूद बाह्यता समस्या सोडविली पाहिजे.

**५. बाह्यता उत्पन्न आणि संपत्ती वाटपातील विषमता दूर करणे:**

आर्थिक विषमतेमुळे मोठ्या प्रमाणावर बाजार अपयश येते अशा वेळी सरकारने हस्तक्षेप करून खाजगी मालमत्तेवर नियंत्रण ठेवणे, मक्तेदारीवर नियंत्रण ठेवणे, तसेच किमान वेतन कायदा करून उत्पन्न संपत्ती वापरातील विषमता कमी केली पाहिजे.

**६.** सरकारने रोजगार संधी वाढविणे, किंमत स्थिरता राखणे, आर्थिक विकास, दारिद्र्य विकास, दारिद्र्य निर्मुलन अशी उद्दिष्टे गाठण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. त्यामुळे बाजार अभ्यास कमी होण्यास मदत होईल.

**७. आर्थिक विकास साधणे:**

विशिष्ट पातळीवरील आर्थिक विकास गाठण्यासाठी जेव्हा बाजार यंत्रणा अपयशी ठरते तेव्हा सरकारला जाणीवपूर्वक आर्थिक विकास साधण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

अशा प्रकारे वरील भूमिकांच्या माध्यमातून शासन बाजर यंत्रणेला अपयशापासून वाचवू शकेल.

## २.६ सारांश (SUMMARY)

- कार्यक्षमता ही संकल्पना आर्थिक व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण मानली जाते. कार्यक्षमता म्हणजे आर्थिक व्यवस्थेतील उपलब्ध साधन संपत्तीचे योग्य नियोजन व वितरण करून त्याच्या माध्यमातून समाजाचे जास्तीत जास्त हीत साधणे होय.
- उत्पादन शक्यता वक्राच्या आधारे एखादा देश त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या साधन संपत्तीचा कार्यक्षम वापर कसा करेल हे समजते.
- कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात बाजारयंत्रणेची भूमिका ही महत्त्वपूर्ण आहे.
- सार्वजनिक वस्तू म्हणजेच सामूहिक उपभोगासाठी सरकारने पुरविलेल्या वस्तू होय.

munotes.in

## २.७ प्रश्न (QUESTIONS)

१. कार्यक्षमताही ही संकल्पना स्पष्ट करा.

२. उत्पादन शक्यता वक्राची संकल्पना स्पष्ट करा.

३. बाजार अपयश म्हणजे काय? त्यांची कारणे सांगा.

४. सार्वजनिक वस्तू म्हणजे काय? वेशिष्ट्ये सांगा.

५. बाजारपेठ आणि सरकारची भूमिका स्पष्ट करा.

*****

munotes.in

**प्रकरण २**

# ३

# सार्वजनिक उत्पन्न

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना सार्वजनिक उत्पन्न म्हणजे काय?

३.२ सार्वजनिक उत्पन्नाचे मार्ग- कर आणि करेतर उत्पन्न

३.३ करांची उद्दिष्टे, कर कसोट्या

३.४ करांचे प्रकार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर

३.५ करांचे दर- प्रगतिशील, प्रमाणशिर व प्रतिगामी

३.६ कर संक्रमण: करभार, कराघात - कर संक्रमण ठरविणारे घटक

३.७ सारांश

३.८ प्रश्न

## ३.० उद्दिष्टे (OBEJECTIVES)

- सार्वजनिक उत्पन्नाचे विविध मार्ग समजावून घेणे.
- करांची व्याख्या, उद्दिष्टे व विविध कर कसोट्या जाणून घेणे.
- करांचे प्रकार- प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर या संकल्पना समजावून घेणे, करांचे गुण-दोष समजावून घेणे.
- करांचे प्रगतिशील, प्रमाणशीर व प्रतिगामी म्हणजे काय याची ओळख करून घेणे.
- कर संक्रमण, करभार वा कराघात तसेच कर संक्रमण ठरविणारे घटक जाणून घेणे.

## ३.१ सार्वजनिक उत्पन्न म्हणजे काय? (WHAT IS PUBLIC REVENUE?)

सार्वजनिक आयव्यय याच्या माध्यमातून देशातील सरकारला जनतेच्या कल्याणाची अनेक कामे करावी लागतात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, पाणीपुरवठा, रस्ते बांधणी, रेल्वेसेवा, धरण बांधणे, वीज प्रकल्प निर्मिती इत्यादी कामांचा यामध्ये समावेश होतो. अर्थात ही विविध कामे करण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणावर उत्पन्नाची गरज असते. आणि सरकार हे उत्पन्न कर, अनुदाने व देणग्या, प्रशासकीय उत्पन्न, व्यापारी उत्पन्न इत्यादी मार्गांनी उभे करते यालाच सार्वजनिक उत्पन्न असे म्हणतात.

munotes.in

## ३.२ सार्वजनिक उत्पन्नाचे विविध मार्ग (VARIOUS WAYS OF PUBLIC REVENUE)

**अ) कर:**

करांपासून सरकारला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. कर हा सरकारी उत्पन्नाचा प्रमुख मार्ग आहे.

**डॉक्टर डाल्टन यांच्या** मते 'कर म्हणजे सार्वजनिक सत्तेने लादलेले असे सक्तीचे देणे आहे की, ज्याचा सरकारी सेवेशी निश्चित संबंध नसतो व जे कायदेशीर गुन्ह्याबद्दल दंड या नात्याने कधीच घेतले जात नाही.'' करांमध्ये प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर अशा दोन्हींचा समावेश होतो.

**ब) अनुदाने व देणग्या:**

एक सरकार दुसऱ्या सरकारला जे अर्थसहाय्य देते त्यास अनुदाने म्हणतात. उदा. राज्य केंद्र सरकार कडून राज्य सरकारला तसेच राज्य सरकारकडून जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती इत्यादींना पाणी पुरवठा योजना, रस्ता बांधणे, झोपडपट्टी सुधारणा घरकुल योजना इत्यादी साठी अनुदान मिळत असते. तसेच बऱ्याच वेळा समाजातील श्रिमंत व दानशूर व्यक्तींकडून सरकारला भूकंप, महापूर, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती काळात देणग्या मिळतात.

**क) प्रशासकीय उत्पन्न:**

प्रशासकीय उत्पन्नात १) शुल्क २) परवाना शुल्क ३) दंड इत्यादींचा समावेश होतो.

**१) शुल्क:**

उदा. जन्म- मृत्यूची नोंदणी, विवाह नोंदणी इत्यादीसाठी शासकीय शुल्क आकारले जाते.

**२) परवाना शुल्क:**

उदा. वाहन चालविण्याचा परवाना मिळविण्यासाठी सरकारला शुल्क भरावे लागते.

**३) दंड:**

बेकायदेशीर वर्तन केल्यास व्यक्तीवर दंड आकारला जातो. उदा. लोकल ट्रेनने विना-तिकीट प्रवास केल्यास आपल्याला दंड भरावा लागतो. हे सर्व प्रशासकीय उत्पन्नाचे मार्ग आहेत

**ड) व्यापारी उत्पन्न:**

उदा. सरकारचे पुस्तक खाते, रेल्वे खाते यापासून मिळणारे उत्पन्न तसेच सरकारी प्रकल्पातून मिळणारा नफा हा व्यापारी उत्पन्नाचा भाग मानला जातो.

## ३.३ करांच्या विविध व्याख्या, वैशिष्ट्ये व उद्दिष्टे (DEFINITION, FEATURES AND OBJECTIVES OF TAX)

**१) पारंपरिक व्याख्या:**

परंपरावादी अर्थतज्ञ यांच्या मतानुसार'' कर म्हणजे नागरिकांनी सरकारला सरकारी सेवेबद्दल दिलेला मोबदला होय''.

**२) ॲडम स्मिथ:** ''कर म्हणजे राज्यासाठी नागरिकांनी केलेले अंशदान होय''.

**बॅस्टेबल:** ''कर म्हणजे व्यक्तीने किंवा संस्थेने स्वतःच्या संपत्तीचा सार्वजनिक सत्तेच्या सेवेसाठी दिलेला शक्तीचा भाग होय.''

वरील सर्व व्याख्यान वरून 'कर' या संकल्पनेची पुढील काही वैशिष्ट्ये आढळतात.

कर हे सरकारला द्यावे लागणारे सक्तीचे देणे आहे.

- करा पासून मिळणारे उत्पन्न हे सर्व जनतेच्या सामाजिक - आर्थिक कल्याणासाठी वापरले जाते.
- कर आकारणे व तो कर वसूल करणे हा अधिकार फक्त सरकारला आहे.
- कर वसूल करण्यास कायदेशीर मान्यता असल्याने कर चुकवेगिरी करणाऱ्यांना दंड किंवा शिक्षा किंवा दोन्ही भोगाव्या लागतात.

कर आकारणी ची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत:

**अ) सरकारच्या उत्पन्नात वाढ करणे:**

आज सरकारने मोठ्या प्रमाणावर कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्याने समाजाच्या कल्याणासाठी आणि हितासाठी सरकारला अनेक प्रकारची कामे करावी लागतात. आणि त्यासाठी प्रचंड पैसा लागतो. कर आकारणी करून सरकार मोठ्या प्रमाणावर आपला महसूल वाढविते.

**ब) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे:**

कररोपणामुळे व्यक्तींचे उत्पन्न कमी होते त्यामुळे प्रभावी मागणीत घट होऊ शकते. त्यामुळे त्याचा आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. अशावेळी कराद्वारे जमा झालेली रक्कम सामाजिक कार्यासाठी तसेच समाज कल्याणासाठी केल्यास त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढीला चालना मिळते.

**क) रोजगारात वाढ घडवून आणणे:**

कर आकारणी करून सरकार जी समाज कल्याणाची कामे सुरु करते उदा रस्ते बांधणी, आरोग्यव्यवस्था वाढविणे, शिक्षण सुविधा वाढविणे, विविध विकास प्रकल्प सुरू करणे इत्यादी मुळे देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार संधीत वाढ होते.

**द) आर्थिक स्थिरता निर्माण करणे:**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नेहमी तेजी आणि मंदी सारखी व्यापार चक्रे निर्माण होत असतात. परिणामी मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. अशा वेळी कर आकारणीच्या माध्यमातून देशात आर्थिक स्थैर्य निर्माण करता येते. उदा. तेजीच्या काळात करांचे दर वाढविले जातात तर मंदीच्या काळात करांचे दर कमी करण्यात येतात.

**ई) आर्थिक विषमता नष्ट करणे:**

आर्थिक विषमता म्हणजे समाजातील गरीब व श्रीमंत यांच्या उत्पन्नात जी तफावत आहे ती अवस्था होय. ही आर्थिक विषमता कमी करण्यासाठी श्रीमंतांच्या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणावर कर आकारून त्यांचे उत्पन्न काढून घेतले जाते आणि मिळालेल्या या उत्पन्नातून गरीब लोकांना सरकार विविध सोयीसुविधा पुरविते. व त्यामुळे समाजातील आर्थिक विषमता कमी होते.

**फ) अनावश्यक उपभोगावर नियंत्रण ठेवणे:**

ज्या वस्तू आरोग्याला घातक आहेत उदा दारू, अफू, गांजा, चरस इत्यादी वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर कर बसविले जातात. परिणामी या वस्तू महाग होतात. परिणामी अनावश्यक उपभोगाला आळा बसून लोकांच्या आरोग्याचे रक्षण होते.

अशा प्रकारे कर आकारण्याची वरील उद्दिष्टे आहेत.

## ३.४ करांचे विविध प्रकार: प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर (TYPES OF TAXES: DIRECT AND INDIRECT TAX)

प्रत्यक्ष कर म्हणजे काय? जेव्हा कराचा आघात व करभार हे दोन्ही एकाच व्यक्तीवर पडतात तेव्हा त्याला प्रत्यक्ष कर असे म्हणतात. उदा उत्पन्न कर, संपत्ती कर इत्यादी.

डॉक्टर डाल्टन यांच्या मते, “प्रत्यक्ष कर म्हणजे की, जो व्यक्तीवर वन कायद्यानुसार आकारण्यात येतो व त्याच व्यक्तीकडून खरोखरच भरला जातो.''

**अप्रत्यक्ष कर म्हणजे काय?:**

जेव्हा सुरुवातीला कराचा आघात एकावर होतो आणि प्रत्यक्षात दुसराच कोणीतरी कर भरतो अशा कर आला अप्रत्यक्ष कर म्हणतात. उदा विक्रीकर

**डॉक्टर डाल्टन यांच्या मते;** ''अप्रत्यक्ष कर हा ज्या व्यक्तीवर आकारला जातो त्या व्यक्तीकडून तो भरला जात नाही, तर परस्पर झालेल्या कराराच्या आधारे अंशतः किंवा पूर्णतः अप्रत्यक्ष करांचे संक्रमण दुसऱ्या व्यक्तीकडे केले जाते.”

**विविध कसोट्या पुढील प्रमाणे आहेत:**

ॲडम स्मिथ यांनी सांगितलेल्या कर कसोट्या पुढील प्रमाणे:



munotes.in

**१. समानता:**

समानता म्हणजे सर्वांनी समान कर भरावा असा अर्थ होत नाही. तर कर भरल्याने सर्वांनी सारखाच त्याग करावा असा अर्थ आहे. म्हणजेच  प्रत्येकाने आपापल्या उत्पन्न पातळीतुन कर भरला पाहिजे.

**२. सोयीस्करता:**

म्हणजे कर भरण्याची वेळ व जागा  ही कर भरणाऱ्यांना सोयीची असावी. म्हणजेच मुंबईच्या व्यक्तीला कर भरण्यासाठी दिल्लीला जावे लागू नये.

**३. मितव्ययता:**

मितव्ययता म्हणजे कर गोळा करण्यासाठी येणारा खर्च हा कमीत- कमी असावा जेणेकरून कर गोळा करणे हे फायदेशीर होईल.

**४. निश्चितता:**

कर पद्धतीत करण्याची वेळ, कर भरण्याची पद्धती आणि कराची रक्कम या सर्व बाबतीत निश्चितता असावी. ज्यामुळे कर  भरणाऱ्याचा गोंधळ होणार नाही.

**५. उत्पादकता:**

करांची उत्पादकता म्हणजे सरकारला कर आकारल्याने  जे उत्पन्न मिळते त्यापासून किमान सार्वजनिक खर्च हा भागला पाहिजे. त्यामुळे कमी उत्पन्न देणारे ज्यादा कर लावण्यापेक्षा ज्यादा उत्पन्न देणारे कमी कर लावणे केव्हाही चांगले असते.

**६. लवचिकता:**

करांची लवचिकता म्हणजे पाहिजे तेव्हा सरकार करांचे दर कमी जास्त करु शकते.  म्हणजे सरकारला ज्यादा उत्पन्न हवे असते तेव्हा करांचे दर वाढविते आणि गरज नसेल तेव्हा करांचे दर कमी करते.

**७. सरलता:**

सर्वसाधारण व्यक्तीला समजेल अशी करपद्धती असावी. करपद्धती गुंतागुंतीची असल्यास लाचलुचपतिला संधी मिळते.

**८.  विविधता:**

करांच्या मध्ये विविधता असावी. उदा. प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर दोन्ही प्रकारात विविधता असावी. म्हणजे वेगवेगळे निकष तयार करून त्या अंतर्गत कर आकारणी केल्यास देशातील एकही नागरिक कर भरण्यातून सुटणार नाही. आणि सरकारचे उत्पन्नही वाढेल.

munotes.in

**९. परीवर्तन क्षमता:**

करपद्धती ही सहज बदलता येण्यासारखी असावी. म्हणजेच एखादा करू नको असेल तर तो काढून टाकता आला पाहिजे आणि एखाद्या नवीन कराचा समावेशही सहज करता आला पाहिजे.

अशा प्रकारे वरील सर्व कर कसोट्या किंवा कराची तत्त्वे असून याला अनुसरून कर रचना केल्यास तरी आदर्श ठरेल यात शंका नाही.

**प्रत्यक्ष करांचे गुण/फायदे/महत्व:**

**१. समता तत्व असते:**

प्रत्यक्ष करात विशिष्ट उत्पन्न पातळीपर्यंत गरिबांना कर भरण्याची गरज नसते. पण त्या नंतर वाढत्या उत्पन्न पातळीला अनुसरून वाडी व कर भरावे लागतात. त्यामुळे यात समता तत्त्व असते.

**२. काटकसरीचे तत्त्व असते:**

प्रत्यक्ष कर वसूल करण्याचा खर्च हा कमी येतो. कारण करदाता स्वतःच कराची रक्कम भरतो.

**३. निश्चितता:**

प्रत्यक्ष पद्धतीमध्ये करदात्याला किती कराची रक्कम भरावयाची आहे, कराचे दर काय आहेत? तसेच हा कर केव्हा आणि कोठे भरावयाचा आहे याची निश्चित माहिती असते. तसेच सरकारलाही या करांपासून किती उत्पन्न व माहिती मिळणार याची माहिती असते.

**४. लवचिकता असते:**

प्रत्यक्ष करांच्या दरात लवचिकता असते. म्हणजेच करांचे दर वाढविल्यास सरकारला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते.

**५. प्रत्यक्ष करामुळे आर्थिक विषमता कमी होते:**

प्रत्यक्ष करपद्धती मध्ये जादा उत्पन्न असणाऱ्या श्रीमंता वर कर बसविले जातात आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून गरिबांना सोयी सुविधा पुरविल्या जातात.

**६. प्रत्यक्ष करांमुळे समाजात जागरूकता निर्माण होते:**

प्रत्येक प्रत्यक्ष कर भरणाऱ्या व्यक्तीला आपण सरकारला कर रूपाने पैसा देत असतो याची पूर्ण जाणीव असते. त्यामुळे असे सरकारच्या खर्चाविषयी जागरूक असतात. आणि याचा फायदा देशाला होतो.

**प्रत्यक्ष करांचे/दोष/तोटे/उणिवा:**

जसे प्रत्यक्ष करांचे काही गुण आहेत तसेच काही दोषही आहेत. असे काही दोष पुढील प्रमाणे आहेत.

**१. प्रत्यक्ष कर हे अप्रिय असतात:**

बहुतेक प्रत्यक्ष कर हे जन माणसांमध्ये अप्रिय असतात. कारण हे त्याच व्यक्तीला भरावा लागतो ज्याच्यावर करभार पडतो. हा कर दुसऱ्यावर ढकलता येत नाही.

**२. हे कर टाळले जाण्याची शक्यता असते:**

बऱ्याच वेळा भ्रष्ट व प्रामाणिक व्यक्ती ही खोटी माहिती आणि खोटे हिशोब दाखवून हा कर टाळू शकते.

**३. प्रत्यक्ष कर गैरसोयीचे असतात:**

प्रत्यक्ष करांमध्ये कराची रक्कम निर्धारित करण्यासाठी करदात्याला स्वतः पैसा खर्च करावा लागतो, कराची रक्कम एकाच हप्त्यात भरावी लागते त्यामुळे असे कर गैरसोयीचे असतात.

**४. या करारात काटकसरीचा अभाव असतो:**

प्रत्यक्ष कर वसूल करताना करदात्यांच्या अनेक कागदपत्रांची तपासणी व मूल्यांकन करावे लागते. त्यामुळे करवसुली चा खर्च वाढत जातो.

**५. अन्यायाची शक्यता:**

प्रत्यक्ष कर पद्धतीत बऱ्याच वेळा करतात करदात्यांच्या उत्पन्नाचे व संपत्तीचे अचूक मोजमाप होऊ शकत नाही. त्यामुळे प्रामाणिक करदात्यांना वर अन्याय होतो.

**अप्रत्यक्ष करांचे गुण स्पष्ट करा:**

**१. अप्रत्यक्ष करांमध्ये सोयीस्करपणा आहे:**

कारण या करांची रक्कम ही वस्तूंच्या किमतीत समाविष्ट असल्याने आपण कर भरत आहोत याची जाणीव कर भरणाऱ्यांना नसते.

**२. अप्रत्यक्ष कर चुकविता येत नाहीत:**

कारण हे कर वस्तूंच्या किमतीत समाविष्ट असल्याने जेव्हा ग्राहक वस्तू विकत घेतो तेव्हा तो कर भरुन मोकळा होतो.

**३. लवचिकता असते:**

अप्रत्यक्ष करांचे दर थोडेसे वाढविल्यास त्यापासून प्रचंड उत्पन्न मिळते.

munotes.in

**४. अप्रत्यक्ष कर पुरोगामी होऊ शकतात:**

श्रीमंत लोक वापरत असलेल्या चैनीच्या वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर कर बसविले जातात. तर याउलट सर्वसामान्य लोक वापरत असलेल्या जीवनावश्यक वस्तू या करमुक्त करून गरिबांचे जीवन सुखी केले जाते.

**५. अप्रत्यक्ष करांमध्ये मोठ्याप्रमाणावर उत्पादकता आहे:**

ज्या वस्तूंची मागणी लवचिक आहे अशा वस्तूंवर जादा कर आकारल्यास प्रचंड उत्पन्न मिळते.

**६. सामाजिक कल्याण साध्य होते:**

अमली पदार्थ उदा. दारू, अफू, गांजा, चरस इत्यादी वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर कर आकारून त्यांचा उपयोग कमी करता येतो. परिणामी जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली जाते.

**७. व्यापक आधार:**

अप्रत्यक्ष कर हा सर्वच व्यक्ती भरत असल्याने या करांचा आधार हा व्यापक आहे. परिणामी देशाला प्रचंड उत्पन्न मिळते.

अशा प्रकारे वरील सर्व अप्रत्यक्ष करांचे गुण आहेत.

**अप्रत्यक्ष करांचे/दोष/तोटे/उणिवा:**

**१. अप्रत्यक्ष कर हे प्रतिगामी होऊ शकतात:**

कारण अप्रत्यक्ष कर भरताना गरीब व श्रीमंत एकाच किमतीला वस्तू विकत घेतात. परिणामी दोघेही सारखाच भरतात. याचा अर्थ गरिबांवर अन्याय होतो.

**२. अनिश्चितता असते:**

अप्रत्यक्ष करापासून नेमके किती उत्पन्न मिळेल याचा नेमका अंदाज सरकारला येत नाही. कारण हे शेवटी लोक वस्तू- सेवांची मागणी किती करतात यावर हे अवलंबून असते.

**३. वसुली चा खर्च जास्त:**

बऱ्याच वेळा अप्रत्यक्ष कर गोळा करण्याचा खर्च हा मोठ्या प्रमाणावर येतो. कारण असे कर गोळा फार मोठी यंत्रणा उभी करावी लागते.

**४. बचतीवर प्रतिकूल परिणाम:**

अप्रत्यक्ष कर हे वस्तूंच्या किमतीत समाविष्ट असल्याने जेव्हा अप्रत्यक्ष करांचे दर वाढतात तेव्हा वस्तूंच्या किमती वाढतात. आणि  परिणामी उपभोगा वरील खर्च वाढून बचत कमी होते.

munotes.in

**५. अप्रत्यक्ष करात जागरुकता नसते:**

बऱ्याच वेळा अप्रत्यक्ष कर भरत असताना आपण  अप्रत्यक्ष कर भरत असताना आपण कर भरीत आहोत याची जाणीव लोकांना नसते त्यामुळे लोकांच्या मध्ये जागृती नसते.

याप्रकारे वरील सर्व अप्रत्यक्ष करांचे दोष आहेत.

## ३.५ करांचे दर - प्रमाणशीर - प्रगतिशील - प्रतिगामी (TAX RATES - PROPORTIONAL - PROGRESSIVE - REGRESSSIVE)

करांच्या दरावरून करांचे प्रमाणशिर कर, प्रगतिशील कर आणि प्रतिगामी कर असे तीन प्रकार पडतात.

**अ) प्रमाणशीर कर:**

प्रमाणशीर कर पद्धतीत सर्व करदात्यांना कराचा सारखाच दर आकारला जातो. उदा. सर्वच उत्पन्न गटातील लोकांना दहा टक्के दराने कर आकारणे म्हणजे प्रमाणशीर करपद्धती होय.

**ब) प्रगतिशील करपद्धती:**

समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी या प्रकारचे कर आकारणी केली जाते. या मध्ये वाढत्या उत्पन्नाबरोबर वाढत्या दराने कर आकारला जातो. यामध्ये कराचे दर वेगवेगळे असतात. तर हे कर भरल्याने वेगवेगळ्या उत्पन्न गटातील लोकांचा होणारा सीमांत सामाजिक त्याग हा कमीत समान होतो.

**क) प्रतिगामी कर:**

'जेव्हा वाढत्या उत्पन्नावर कमी कर आणि कमी होणाऱ्या उत्पन्नावर ज्यादा कर आकारला जातो तेव्हा त्याला प्रतिगामी कर असे म्हणतात.'

## ३.६ कर संक्रमण: कराघात-करभार-संक्रमण ठरविणारे घटक

**कराघात म्हणजे काय?:**

जेव्हा सरकार करो बसविण्यास संबंधी एखादा कायदा करते तेव्हा त्या कायद्यामध्ये सदर चा  कर  हा पुडा कडून वसूल करावयाचा याची स्पष्ट तरतूद करण्यात आलेली असते. ज्या व्यक्तीवर प्रथमतः बसविण्यात येतो त्या व्यक्तीवर कराचा आघात झाला असे म्हणतात. कराचा आघात हा करदात्यावर होत असतो. कारण हा त्यालाच भरावयाचा असतो, ज्या व्यक्तीवर कराचा आघात होतो तिनेच तो भरला तर त्याला'  करदाता'  असे म्हणतात.

**करसंक्रमण म्हणजे काय?:**

ज्या व्यक्तीवर पहिल्यांदा कराचा आघात झाला आणि ती व्यक्ती आपल्यावर लावलेला कर हा दुसऱ्यावर ढकलण्यात यशस्वी झाली तर त्याला कर संक्रमण म्हणतात. प्रत्यक्ष करांमध्ये करन संक्रमण शक्य नाही ज्या व्यक्तीवर पहिल्यांदा कराचा आघात झाला त्याच व्यक्तीला

हा कर भरावा लागतो. उदा. उत्पन्न कर, संपत्ती कर इत्यादी मात्र प्रत्यक्ष करांमध्ये कर संक्रमण शक्य असते. उदा.

**विक्रीकर:**

या करारामध्ये उत्पादक विक्रेत्यावर करभार ढकलतात. आणि शेवटी हा कर ग्राहक आपल्या खिशातून भरतात.

करसंक्रमणाचे अग्रभागी संक्रमण आणि ऊर्ध्वगामी कर संक्रमण असे दोन प्रकार पडतात.

**कर संक्रमण ठरविणारे घटक पुढीलप्रमाणे:**

**१. वस्तूंच्या किमतीत बदल करणे:**

कराचा रकमेचा वस्तूंच्या किमतीत समावेश करून कर संक्रमित केले जाते. उदा विक्रेते कराची रक्कम ग्राहकांकडून वसूल करा.

**२. वस्तूंच्या मागणीची लवचिकता:**

ज्या वस्तूची मागणी ताठर आहे अशा वस्तूंच्या बाबतीत १०० % करसंक्रमण हे ग्राहकांवर होते.

**३. वस्तूंच्या पुरवठ्याची दुर्मिळता:**

वस्तूचा पुरवठा जेवढा कमी किंवा दुर्मिळ असेल तेवढे कर संक्रमण ग्राहकांवर केले जाते. आणि वस्तूचा पुरवठा मुबलक असेल तर हरभरा ची विभागणी ही ग्राहक व विक्रेता या दोघांच्या मध्ये होते.

**४. कर संक्रमणाचा कालावधी:**

अल्पकाळात कर संक्रमण शक्य नसते. तर दीर्घ काळात कर संक्रमण शक्य असते.


**५. अर्थव्यवस्थेची परिस्थिती:**

अर्थव्यवस्थेत तेजीचे वातावरण असेल तर कर संक्रमण मोठ्या प्रमाणावर ग्राहकांवर होईल. आणि मंदीचे वातावरण असेल तर कर संक्रमण हे विक्रेत्यावर होईल.

**मागणीची लवचिकता आणि करभार:**

वस्तू साठी असणारी मागणी पूर्ण लवचिक असेल तर सर्वच्या सर्व कारभार हा ग्राहकांवर पडतो. पुढील आकृतीवरून हे स्पष्ट होईल.

munotes.in




आकृती क्र.३.१


आकृती मधील RG हा कारभार पूर्णपणे 100% ग्राहकांवर पडेल कारण मागणी पूर्ण अलवचिक असल्याने किंमत वाढूनही मागणी कमी होत नाही.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| पुरवठा वक्र | SS | $S_1 S_1$ |
| मागणी वक्र | DM | DM |
| किंमत | OP | $OP_1$ |

RQ हा १००% करभार हा ग्राहकावर पडेल.

**२. पूर्ण लवचिक मागणी व करभार:**

मागणी पूर्ण लवचिक असताना १००% करभार हा विक्रेत्यावर पडेल. ग्राहकांवर करभार पडणार नाही. पुढील आकृतीवरून हे समजेल.




आकृती क्र.३.२


आकृती मधील $SS_1$ किंवा $RR_1$ हा पूर्ण १००% करभार हा विक्रेत्यावर पडतो. कारण कर आकारून किंमत हि पूर्वीइतकी म्हणजे OP इतकीच राहते. त्यामुळे पूर्ण लवचिक मागणी असताना संपूर्ण करभार विक्रेत्यावर पडतो.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| पुरवठा वक्र | SS | $S_1$ $S_1$ |
| मागणी वक्र | PD | PD |
| किंमत | OP | OP |

कराची रक्कम $SS_1$ किंवा $RR_1$ पूर्ण १००% करभार हा विक्रेत्यावर पडतो.

**3) अधिक लवचिक मागणी:**

अधिक लवचिक मागणी असताना करभार हा ग्राहक आणि विक्रेता यांच्यावर विभागला जातो. यामध्ये कमी करभार हा ग्राहकांवर आणि ज्यादा करभार हा विक्रेत्यांवर पडतो. हे पुढील आकृतीवरून स्पष्ट होईल.




**आकृती क्र.३.३**

आकृती मधील RT हा एकूण करभार ग्राहक RS आणि विक्रेता ST असा विभागला आहे RS<ST. म्हणजेच ग्राहकांवर कमी व विक्रेत्यावर ज्यादा करभार आहे.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| पुरवठा वक्र | DD | DD |
| मागणी वक्र | SS | $S_1$ $S_1$ |
| किंमत | OP | $OP_1$ |

आकृतीमध्ये सरकारने लावलेला कर RT किंवा $SS_1$


ग्राहकां वरील करभार SR

विक्रेत्यां वरील करभार ST

∴ SR<ST म्हणजेच आकृतीत विक्रेत्यावर ज्यादा कर भार आहे तर ग्राहकांवर कमी करभार आहे.

**४. लवचिक मागणी व करभार:**

कमी लवचिक मागणी असताना करभार हा ग्राहकांवर जास्त आणि विक्रेत्यांवर कमी कर भर पडतो. हे पुढील आकृतीवरून स्पष्ट होईल.




**आकृती क्र.३.४**

आकृती मधील एकूण कारभार हा RT इतका आहे त्यापैकी RS हा कर भार ग्राहकांवर तन ST इतका करभार विक्रेत्यांवर आहे. म्हणजेच कमी लवचिक मागणी असताना जादा करभार हा ग्राहकांवर तर कमी करभार हा विक्रेत्यांवर पडतो.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| पुरवठा वक्र | DD | DD |
| मागणी वक्र | SS | $S_1 S_1$ |
| किंमत | OP | $OP_1$ |


सरकारने लावलेला एकूण कर =SS1 किंवा RT

ग्राहका वरील करभार = PP1 किंवा SR

विक्रेत्या वरील कारभार = ST ∴ SR > ST

**५. एकक लवचिक मागणी व करभार:**

एकक लवचिक मागणी असताना करभार हा विक्रेते व ग्राहक यांच्यावर समान ५०-५० % इतका पडतो. आकृतीवरून हे स्पष्ट होईल.




**आकृती क्र.३.५**

आकृतीत एकूण कारभार हा ST इतका कारभार ग्राहकांवर आणि RT इतका करभार हा विक्रेत्यांवर पडतो. SR=RT

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| मागणी वक्र | DD | DD |
| पुरवठा वक्र | SS | $S_1 S_1$ |
| किंमत | OP | $OP_1$ |

सरकारने लावलेला एकूण कर = ST


ग्राहकांवरील करभार = SR

विक्रेत्यांवरील करभार = RT ∴ SR = RT

**पुरवठा वक्र आणि करभार:**

**१. पूर्ण लवचिक पुरवठा आणि कर भार:**

पुरवठा वक्र पूर्ण लवचिक असताना संपूर्ण कारभार हा ग्राहकांवर पडतो तर विक्रेत्यांवर शून्य करभार पडतो. पुढील आकृतीवरून हे स्पष्ट होते.




आकृती क्र.३.६

आकृतीत एकूण कारभार हा $PP_1$ किंवा $BB_1$ इतका आहे. अर्थातच हा १०० % करभार पूर्णपणे ग्राहकांवर आहे. मात्र विक्रेत्यांवर शून्य करभार आहे.


| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| मागणी वक्र | PS | $P_1S_1$ |
| पुरवठा वक्र | DD | DD |
| किंमत | OP | $OP_1$ |

सरकारने लावलेला कर $PP_1$ किंवा $BB_1$

ग्राहकांवरील करभार $BB_1$ - विक्रेत्यांवरील करभार ० शून्य

**२. पूर्ण अलवचिक पुरवठा आणि करभार:**

पुरवठा पूर्ण असताना १०० % करभार हा विक्रेत्यांवर तर ० शून्य करभार हा ग्राहकांवर पडतो.




आकृती क्र.३.७

पूर्ण अलवचिक पुरवठा असताना एकूण कारभार हा $E_1$ $E_2$ इतका आहे. अर्थात हा संपूर्ण करभार १००% विक्रेत्यांवर आहे. व ग्राहकांवर शून्य कारभार आहे.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| मागणी वक्र | SN | $P_1S_1$ |
| पुरवठा वक्र | $D_1D_1$ | $D_1D_1$ |
| किंमत | OP | OP |


सरकारने लावलेला एकूण कर $E_1$ $E_2$

विक्रेत्यां वरील एकूण कर $E_1$ $E_2$ = १००%

ग्राहकांवरील एकूण कर शून्य %

**३) अधिक लवचिक पुरवठा:**

अधिक लवचिक पुरवठा असताना ज्यादा करभार हा ग्राहकांवर तर कमी करावा हा विक्रेत्यांवर असतो पुढील आकृतीवरून हे स्पष्ट होईल.




**आकृती क्र.३.८**

आकृतीमध्ये पुरवठा वक्र हा अधिक लवचिक आहे. सरकारने लावलेला एकूण कर $SS_1$ किंवा $CC_2$ इतका आहे. त्यापैकी ग्राहकांवर इल करभार हा CC1 इतका आहे. विक्रेत्या वरील कर भार हा $C_1C_2$ आहे. म्हणजे इथे ग्राहकांवर जादा करभार आणि विक्रेते यांच्यावर कमी करभार आहे.

सरकारने लावलेला कर = $SS_1$ किंवा $CC_2$


वरील एकूण कर = $CC_1$

विक्रेत्यां वरील एकूण कर = $C_1C_2$

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| मागणी वक्र | SS | $S_1S_1$ |
| पुरवठा वक्र | DD | DD |
| किंमत | OP | $OP_1$ |

**४) कमी लवचिक पुरवठा आणि करभार:**

पुरवठा कमी लवचिक असताना विक्रेत्यांवर जादाकर भार ग्राहकांवर कमी करभार पडतो. आकृती पहा:




**आकृती क्र ३.९**

आकृतीत कमीत कमी लवची पुरवठा वक्र असून सरकारने लावलेला एकूण कर हा $FF_2$ इतका आहे. त्यापैकी ग्राहकांवरील करभार हा $FF_1$ इतका असून विक्रेत्यांवरील करभार हा $F_1F_2$ इतका आहे. म्हणजेच ग्राहकांवर कमी तर विक्रेत्यांवर जादा करभार आहे.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| पुरवठा वक्र | SS | $S_1 S_1$ |
| मागणी वक्र | DD | DD |
| किंमत | OP | $OP_1$ |


सरकारने लावलेला कर = $SS_1$ किंवा $FF_2$

वरील एकूण कर = $FF_1$

विक्रेत्यां वरील एकूण कर = $F_1F_2$  $F_1F_2 > FF_1$

**५. एकक लवचिक पुरवठा आणि करभार:**

पुरवठा वक्राची लवचिकता एक असताना ग्राहक आणि विक्रेते या दोघांवर कर भारत समसमान म्हणजे ५०-५०% असतो. आकृती पहा.




**आकृती क्र ३.१**

आकृतीत सरकारने लावलेला एकूण कर हा RT इतका असून त्यापैकी ST इतका करभार विक्रेत्यांवर आणि RS इतका करभार ग्राहकांवर पडतो.

| तपशील | कर लावण्यापूर्वीची स्थिती | कर लावल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|
| पुरवठा वक्र | SS | $S_1 S_1$ |
| मागणी वक्र | DD | DD |
| किंमत | OP | $OP_1$ |

सरकारने लावलेला एकूण कर = $S_1 S_1$ किंवा RT

ग्राहकांवरील एकूण कर = RS


विक्रेत्यांवरील एकूण कर = ST ∴ RS=ST

**खर्च परिस्थिती आणि करभार:**

**१) वाढती खर्च परिस्थिती आणि करभार:**

वाढत्या खर्चामुळे करभार हा ग्राहक आणि विक्रेते या दोघांना सहन करावा लागतो पण करभार कमी की जास्त हे मागणी वक्राच्या लवचिकते वर अवलंबून असते.


मागणी वक्राची लवचिकता जर जास्त असेल तर करभार हा ग्राहकाला कमी तर विक्रेत्याला जादा कर भार सहन करावा लागतो. हे पुढील आकृतीत दर्शविले आहे.




**आकृती क्र ३.११**

वरील आकृती मधील मागणीवक्र हा जास्त लवचिक आहे. सरकारने लावलेला एकूण कर RT इतका आहे. त्यापैकी RS इतका कारभार हा ग्राहकांवर असून ST इतका करभार विक्रेत्यांवर आहे. म्हणजेच विक्रेत्यांवर जादा करभार आहे. आणि ग्राहकांवर कमी करभार आहे.

मागणी वक्राची लवचिकता कमी असेल तर करभार हा ग्राहकांना ज्यादा आणि विक्रेत्यांना कमी कर भार सहन करावा लागतो. हे पुढील आकृतीत दर्शविले आहे.





**आकृती क्र ३.१२**

आकृतीमधील मागणी वक्र हा कमी लवचिक असून सरकारने लावलेला एकूण कर हा RT इतका असून त्यापैकी RS इतका कर भार ग्राहकांवर पडतो तर ST इतका कारभार हा विक्रेत्यांवर पडतो. म्हणजे ग्राहकांवर जादा आणि विक्रेत्यांवर कमी कर भार पडतो.

**२) स्थिर खर्चाची स्थिती आणि करभार:**

स्थिर खर्चाच्या स्थितीत सर्व १०० % करभार हा ग्राहकांवर शून्य करभार हा विक्रेत्यांवर पडतो. पुढील आकृतीवरून हे स्पष्ट होईल.





**आकृती क्र ३.१३**

बाजूच्या आकृती मधील मागणी वक्र हा DD असून खर्च स्थिर आहे. या स्थितीत एकूण करभार हा $BB_1$ असून हा १०० % विक्रेत्यांवर शून्य करभार पडतो.

**३) घटत्या खर्चाची स्थिती:**

घटत्या खर्च स्थितीमध्ये ग्राहकाला कराच्या रकमेपेक्षा ही जादा कर भरावा लागेल. बाजूच्या आकृतीत घटत्या खर्च स्थितीत सरकारने लावलेला एकूण कर हा $E_1 E_2$ इतका आहे. ग्राहकाला त्यापेक्षा जास्त म्हणजे $E_1 E_3$ इतका कर भरावा लागतो.




**आकृती क्र ३.१४**

munotes.in

## ३.७ सारांश (SUMMARY)

- सरकारला जनतेचे सामाजिक, आर्थिक कल्याण साधण्यासाठी अनेक कल्याणकारी कामे करावी लागतात. आणि त्यासाठी लागणा रे उत्पन्न हे कर आकारणी, अनुदाने व देणग्या, व्यापारी उत्पन्न व प्रशासकीय उत्पन्न इत्यादी माध्यमातून जमा केले जाते. यास सार्वजनिक उत्पन्न म्हणतात.
- सरकारला विविध मार्गांनी जे उत्पन्न मिळते ते समाजाच्या कल्याणासाठी विविध बाबींवर खर्च केले जाते त्यांना सार्वजनिक खर्च असे म्हणतात.
- करांपासून सरकारला सर्वात जास्त उत्पन्न मिळते. कर म्हणजे सरकारला द्यावे लागणारे शक्तीचे देणे होय.
- एक सरकार दुसऱ्या सरकारला जी मदत करते त्यास अनुदान म्हणतात.
- प्रशासकीय उत्पन्नामध्ये परवाना शुल्क, दंड आणि शुल्क यांचा समावेश होतो.

## ३.८ प्रश्न (QUESTIONS)

१. सार्वजनिक उत्पन्न म्हणजे काय? सार्वजनिक उत्पन्नाचे मार्ग सांगा?

२. कर म्हणजे काय? करांची वैशिष्ट्ये आणि उद्दिष्टे स्पष्ट करा?

३. विविध कर कसोट्या स्पष्ट करा.

४. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे गुण/ दोष स्पष्ट करा.

५. कर संक्रमण म्हणजे काय? कर संक्रमण ठरविणारे घटक सांगा.

६. मागणीची लवचिकता आणि करभार ही संकल्पना स्पष्ट करा.

७. पुरवठ्याची लवचिकता आणि करभार ही संकल्पना स्पष्ट.

८. खर्चाची स्थिती व करभार ही संकल्पना स्पष्ट करा.

*****

munotes.in

# ४

# करांचे विविध परिणाम

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ करांचे उत्पन्न व संपत्ती वाटपावर होणारे परिणाम

४.३ करांचे उपभोग, बचत व गुंतवणूक या वर होणारे परिणाम

४.४ करांचे पुनर्वाटप परिणाम

४.५ करांचे चलनवाढ विरोधी स्वरूप

४.६ सारांश

४.७ प्रश्न

## ४.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

- करांचे होणारे विविध परिणाम प्रथमदर्शनी जाणून घेणे.
- करांचे उत्पन्न व संपत्ती वाटपावर होणारे परिणाम अभ्यासणे.
- करांचे उत्पादनावर होणारे परिणाम अभ्यासणे.
- करांची चलनवाढ विरोधी भूमिका व उत्पन्नाच्या पुनर वितरणाची भूमिका अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

कोणताही कर लावला तर त्याचे विविध प्रकारचे परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसून येतात हे परिणाम अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये कमी-अधिक प्रमाणात जाणवतात. प्रत्येक कराचे चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम असतात. त्यामुळे करांचे होणारे वाईट परिणाम टाळणे व चांगले परिणाम वाढवणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे करांचे उत्पन्न व संपत्ती वाटपावर परिणाम होतात. त्याच बरोबर करांचे उपभोग, बचत व गुंतवणूक तसेच उत्पादन यावरही परिणाम होतात. करांचा विविध चांगल्या-वाईट परिणामांचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

## ४.२ करांचे उत्पन्न व संपत्ती वाटपावर होणारे परिणाम (EFFECTS OF TAXES ON DISTRIBUTION OF INCOME AND PROPERTY)

साधारणपणे कर हे दोन प्रकारचे असतात. या प्रत्येक कर या दोन्हींचा समावेश होतो. तसे पाहिले तर प्रत्यक्ष करांमध्ये उत्पन्न कर, संपत्ती कर, मालमत्ता कर, भांडवली गुंतवणुकीवरील कर इत्यादीचा समावेश होतो. प्रत्यक्ष कर हा पुरोगामी असल्याने या

munotes.in

करारात जसे उत्पन्न वाढेल तसे वाढत्या दराने कर आकारले जातात. त्यामुळे श्रीमंतांवर हे कोण मोठ्या प्रमाणावर आकारले जातात. आणि या करांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न जमा केले जाते. आणि त्यापासून मिळणाऱ्या रकमेतून गरीब लोकांसाठी विविध योजना आखल्या जातात आणि गरिबांना याचा फायदा मोठ्या प्रमाणावर होतो. गरिबांना मोफत घरे, मोफत शिक्षण, कमी किमतीत प्राथमिक वस्तूंचा पुरवठा केला जातो. परिणामी गरिबांची स्थिती सुधारण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्यक्ष करांच्या माध्यमातून समाजातील आर्थिक विषमता कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होते.

सरकार लोकांवर अप्रत्यक्ष कर सुद्धा आकारते यामध्ये प्रामुख्याने विक्रीकर सेवाकर, उत्पादन शुल्क आयात कर निर्यात कर वस्तू व सेवांवरील कर इत्यादी करांचा समावेश होतो. या अप्रत्यक्ष करामुळे श्रीमंत लोक वापरत असणाऱ्या चैनीच्या वस्तूंवरील करांचे दर वाढवून अनावश्यक उपभोगावर आळा घातला जातो. अशाच चैनीच्या वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर कर लावल्याने सरकारला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर करून त्यातून गरीब लोकांना विविध सोयी- सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. आणि अशा रीतीने संपत्तीचे पुनर वाटप केले जाते आणि त्यातून आर्थिक विषमता कमी होते.

## ४.३ करांचे उपभोग, बचत व गुंतवणूक या वर होणारे परिणाम (EFFECTS OF TAXES ON CONSUMPTION, SAVING AND INVESTMENT)

### अ) करांचे उपभोगावर होणारे परिणाम:

जर प्रत्यक्ष करांचे दर जादा असतील तर त्याचे अनिष्ट परिणाम हे उपभोगावर होतात. जर सरकारने प्रत्यक्ष करांचे दर मोठ्या प्रमाणावर वाढविले तर लोकांना पूर्वीपेक्षा जादा कर भरावे लागतील. त्यामुळे लोकांचा विविध वस्तूंचा उपभोग हा कमी होऊन परिणामकारक मागणीमध्ये घट होते. आणि परिणामकारक मागणीच्या अभावी उत्पादनात घट होऊन रोजगार संधी कमी होऊन देशात बेकारी वाढेल. या याउलट प्रत्यक्ष करांचे दर कमी झाल्यास लोकांना कमी कर भरावा लागेल. परिणामी लोकांचा विविध वस्तूंचा उपभोग वाढेल आणि त्यामुळे देशात परिणाम कारक मागणीत वाढ होऊन उत्पादन वाढेल आणि रोजगारही वाढेल.

अप्रत्यक्ष करांचा ही परिणाम हा लोकांच्या उपभोग प्रवृत्तीवर होतो. जर सरकारने अप्रत्यक्ष करांचे दर मोठ्या प्रमाणावर वाढविले तर लोकांचा उपभोग खर्च वाढेल मात्र महागाईमुळे विविध वस्तूंचा उपभोग कमी होऊन एकूण मागणी कमी होते. परिणामी उत्पादन कमी व रोजगार संधी कमी अशी अवस्था निर्माण होते.

या उलट सरकारने अप्रत्यक्ष करांचे दर मोठ्या प्रमाणावर कमी केल्यास वस्तू व सेवा स्वस्त होऊन लोकांचा विविध वस्तू व सेवांचा उपभोग वाढतो. परिणामी एकूण मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे उत्पादनात आणि पर्यायाने रोजगार संधीत मोठ्या प्रमाणावर वाढ होते.

**ब) करांचा बचत आणि गुंतवणूक या वर होणारा परिणाम:**

सरकारचा कर आकारणीचा बचत व गुंतवणूक यावरही परिणाम गुंतवणुकीसाठी लागणारे भांडवल हे प्रामुख्याने लोकांच्या बचतीतून निर्माण होते. आणि भांडवल गुंतवणूकीवर कराच्या दरांचा चांगला वाईट परिणाम होतो. सर्वसाधारणपणे करांच्या दराचा सुरुवातीला बचतीवर परिणाम होतो आणि त्यानंतर गुंतवणुकीवर परिणाम होतो.

**क) करांचा बचतींवर होणारा परिणाम पुढील प्रमाणे आहे:**

करांचा बचतींवर होणारा परिणाम हाच तो विशिष्ट कर कोणत्या प्रकारचा आहे यावर अवलंबून असतो. जर अप्रत्यक्ष करांचे दल मोठ्या प्रमाणावर वाढले तर त्यामुळे वस्तूंच्या किमती वाढवून लोकांचा उपभोग खर्च वाढेल आणि ते आता बचत करू शकणार नाहीत. आणि बचत करण्याच्या प्रवृत्तीवर अनिष्ट परिणाम होईल. याउलट प्रत्यक्ष करांचे दर वाढविले तरी बचतीवर विपरीत परिणाम होईल. परंतु सरकारने कर सवलत मिळविण्यासाठी विविध बचत योजना लोकांना उपलब्ध करून दिल्यास बचतीला प्रोत्साहन मिळेल.

**ड) करांचा गुंतवणुकीवर होणारा परिणाम:**

करांच्या दरांचा चांगला-वाईट परिणाम हा गुंतवणुकीवर होत असतो. मुळात गुंतवणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. पण मुळात भांडवल हे बचती पासुन निर्माण होते. परंतु जर सरकारने अप्रत्यक्ष करांचे दर वाढविल्यास विविध वस्तूंच्या किमती या मोठ्या प्रमाणावर वाढते. आणि त्या त्यामुळे लोकांचा उपभोग खर्च वाढेल परिणामी लोकांची बचत कमी होईल. आणि बचत कमी झाल्याने भांडवल गुंतवणूक ही कमी होईल. त्यामुळे उद्योगधंद्यांना भांडवल कमी पडेल. आणि उद्योगधंद्यांच्या विकासावर त्याचा अनिष्ट परिणाम होईल.

**इ) करांचा उत्पादनावर होणारा परिणाम:**

करांच्या दराचे उत्पादनावरही चांगले वाईट परिणाम होतात. सर्वसाधारणपणे करांचे उत्पादनावर होणारे परिणाम लक्षात देताना डॉक्टर डाल्टन म्हणतात की, करआकारणी मुळे उत्पादनावर अनिष्ट परिणाम व्हायला नकोत. त्यांच्या मते ती करपद्धती श्रेष्ठ आहे जी चे चांगले परिणाम जास्त आणि वाईट परिणाम हे कमीत कमी होतात.

जर करांचे दर जादा असतील तर व्यक्तींच्या काम करण्याच्या शक्तीवर अनिष्ट परिणाम होतात. कारण करांच्या जादा दरामुळे लोक नाराज होतात. तर वाढ अप्रत्यक्ष अप्रत्यक्ष करांच्या दरामुळे लोकांचे जादा उत्पन्न कराची रक्कम भरण्यात जाते. आणि उपभोगासाठी त्यांच्याकडे कमी रक्कम शिल्लक राहते. आणि क्रयशक्ती कमी झाल्याने लोक चांगल्या वस्तूंचा उपभोग घेऊ शकत नाहीत. परिणामी याचा अनिष्ट परिणाम हा लोकांच्या काम करण्याच्या शक्तीवर आणि पर्यायाने उत्पादनावर होतो. तसेच ज्यादा करांच्या दरामुळे बचत आणि गुंतवणूक या दोन्हींवर ही अनिष्ट परिणाम होतो. आणि उत्पादनावर याचा अनिष्ट परिणाम होतो.

munotes.in

**ई) करांचे उत्पादनाच्या रचनेवर होणारे परिणाम:**

कोणत्याही देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे वस्तूंचे उत्पादन आणि लोकांच्या काम करण्याच्या इच्छेवर अवलंबून असते. देशातील उपलब्ध असणाऱ्या साधन संपत्तीचे निरनिराळ्या उद्योगांमध्ये तसेच क्षेत्रांमध्ये वितरण होत असते. यावर उद्योगधंद्याची रचना अवलंबून असते. पण कर आकारणीमुळे उद्योगधंद्यांची ही रचना बदलते.

समजा एखाद्या उद्योगात तयार होणाऱ्या वस्तू व कर लावला आणि वस्तूची मागणी लवचिक व पुरवठा लवचिक असेल तर कराचा जास्त भार हा ग्राहकांवर कमी भार हा विक्रेत्यांवर पडतो. याउलट तयार होणाऱ्या मालाची मागणी लवचिक आणि पुरवठा अलवचिक असेल तर जादा करभार हा विक्रेत्यांवर पडतो. त्यामुळे उत्पादकांचा नफा हा कमी होतो.

तेव्हा अशा उद्योगातून उत्पादनाची साधने काढून घेतली जातात आणि ही उत्पादन साधने फायदेशीर उद्योगात गुंतवली जातात.

अशा प्रकारे करांचे विविध परिणाम हे होत असतात.

## ४.४ करांचे पुनर्वाटप परिणाम (REDISTRIBUTION EFFECTS OF TAXES)

किमतीच्या यंत्रणेद्वारे उत्पन्नाचे ड्रायव्हर पुनर्वितरण सामान्यतः ज्यांचे वेतन उच्च पातळीवरील आहे त्यांच्या बाजूने झुकते याचा अर्थ असा होतो की, सरकारी हस्तक्षेपाशिवाय, समाजातील काही लोक ज्यांना कमी दर्जाचे शिक्षण आणि प्रशिक्षण मिळाल्याने कमी क्षमता आहे, जे वयस्कर आहेत, ज्यांना मोठी मालमत्ता संसाधने मिळू शकली नाहीत किंवा वारसा मिळू शकला नाही, आणि जे शारीरिक आणि मानसिक अपंगत्वामुळे किंमत यंत्रणेमार्फत कोणतेही उत्पन्न प्राप्त करू शकले नाहीत. अशाप्रकारे/ बाजार किंवा किंमत प्रणाली उत्पन्नातील क्षमतेला प्रोत्साहन देते ज्यामुळे अर्थव्यवस्थेत एकूण भर दारिद्र्य आणि असमानता निर्माण होते.

अशाप्रकारे आधुनिक काळातील सरकारे कर प्रणालीच्या प्रणालीचा प्रारंभ....तून उत्पन्नातील अन्यायकारक विषमता दुरुस्त करण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या कार्यात हस्तक्षेप करतात. आणि अशा योजना तयार केल्या जातात की, यामध्ये श्रीमंतांवर जादा कर लावला जातो आणि त्या रकमेतून गरिबांना सोई सवलती पुरविल्या जातात. अशाप्रकारे करांच्या माध्यमातून उत्पन्नाचे पुनर वाटप केले जाते. आणि ज्या पुनर वाटपा मार्फत आहे समाजातील आर्थिक विषमता कमी होते. कर ही एक अशी संकल्पना आहे त्यामध्ये सार्वजनिक यंत्रणेमार्फत जनतेवर सक्तीने काही फी आकारली जाते.

सरकार मार्फत विविध करविविध प्रकारे लोकांच्यावर आकारले जातात. आणि हे सर्व करून विविध उपक्रमांसाठी योगदान देतात. अशाप्रकारे काही कव्हर हे उत्पन्न आणि संपत्तीचे अधिक न्याय्य पद्धतीने पुनर्वितरण करण्यास मदत करतील. तथापि, उत्पन्नातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न करणारा कर बचत आणि गुंतवणूक कमी करू शकतो आणि त्यामुळे भांडवल संचय आणि आर्थिक वाढ मंदावू शकते. म्हणूनच, करांचे विवेकी मिश्रण निवडणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांचे अनिष्ट परिणाम कमी होतील

आणि अर्थव्यवस्थेसाठी त्यांचे फायदेशीर प्रभाव मजबूत होतील. भारतात सध्या उत्पन्नावर विविध करांचे दर आहेत, म्हणजेच १०%, २०% आणि ३०% दराने कर आकारणी केली जाते. अति श्रीमंतांवर अजूनही जास्त दराने कर आकारण्याची सूचना आहे. तसेच आय करा व्यतिरिक्त, संपत्ती कराच्या रूपात संपत्तीवर कर लादला जातो. तसेच अप्रत्यक्ष करांच्या माध्यमातून जे उत्पन्न मिळते त्याचा वापर हा गरिबांच्या कल्याणासाठी केला जातो. पण कराची आकारणी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे कर आकारणीचा अनिष्ट परिणाम हा बचत गुंतवणूक आणि उत्पादन यावर होता कामा नये. काही चांगल्या सेवांच्या निर्मितीसाठी गुंतवणुकीवर करस व ल ती....च्या च्या माध्यमातून प्रोत्साहन देऊन उत्पन्नाचे पुनर्वितरण देखील केली जाऊ शकते. तसेच, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या भागात गुंतवणुकीसाठी स्थगिती व करसवलत देऊ शकतात. अशा गुंतवणुकीमुळे विषमता कमी होऊन गरिबांना अधिक रोजगार आणि उत्पन्न मिळू शकते.

## ४.५ करांचे चलनवाढ विरोधी स्वरूप

चलनवाढ ही वैश्विक घटना आहे. चलनवाढ हा अतिरिक्त मागणी किंवा वाढत्या खर्चाचा परिणाम आहे. करामुळे लोकांच्या खरेदी शक्तीवर बंधने येतात. ती कमी होते आणि त्यामुळे काही प्रमाणात चलन वाढीला आळा बसतो. भांडवली नफ्या वरील कर, उच्च उत्पन्नावरील कर आणि चैनीच्या वस्तू वरील करांमुळे उत्पन्न कमी होऊन मागणी कमी होते. त्याच प्रमाणे आवश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठी जीकर सवलत दिली जाते त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. त्यामुळे पुरवठादारांना आपला पुरवठा वाढविण्यास प्रोत्साहन मिळते. सरकार आपल्या कर धोरणानुसार मागणी व पुरवठा यामध्ये समतोल साधला जातो.

कराच्या कमी दरामुळे आणि करसवलतींमुळे करांपासून मिळणारे उत्पन्न कमी होऊ शकते. त्यामुळे सरकारचा खर्चही कमी होतो. आणि या सर्वांचा परिणाम होऊन पैशाचा पुरवठा आणि परिणामकारक मागणी दोन्ही कमी होतात.

ज्या करविषयक धोरणांमुळे चलन वाढीला आळा बसतो त्याचे काही चांगले परिणामही होतात. वस्तूंच्या कमी होण्याच्या किमतीमुळे आपली निर्यात वाढवून विदेशी व्यापारातील तूट कमी होण्यास मदत होऊन आंतरराष्ट्रीय व्यापार हा फायद्याचा ठरतो.

करांमुळे चलनवाढीवर नियंत्रण येण्याव्यतिरिक्त ज्या करामुळे अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त खरेदी शक्ती कमी होते त्याचे काही फायदे पुढीलप्रमाणे होतात:

- त्यामुळे महागड्या प्रशासकीय नियंत्रणाची गरज कमी होते.
- जर सरकारने पैशाचा पुरवठा कमी करण्यासाठी सार्वजनिक कर्ज वाढविण्याचा प्रयत्न केला, तर सार्वजनिक कर्जावरील व्याजाचा भार कमी होतो.
- युद्धकाळात कर युद्धकाळात वाढणाऱ्या महागाईला रोखण्यासाठी मदत करतो. म्हणजेच युद्धकाळात सरकारने करांच्या ऐवजी मोठ्या प्रमाणावर रोख्यांची विक्री केली

तर युद्ध थांबल्यावर या रोख्यांमध्ये गुंतविले ला  पैसा लोक काढून घेतात त्यामुळे नंतरच्या काळात महागाई वाढून त्रासदायक होते.

## ४.६ सारांश (SUMMARY)

- सरकार जनतेवर जे विविध कर आकारते त्याचे विविध परिणाम अर्थव्यवस्थेवर होतात.
- ज्यादा करांमुळे लोकांच्या कार्य करण्याच्या शक्तीवर अनिष्ट परिणाम होतो.
- अप्रत्यक्ष करांच्या वाढत्या दरांमुळे लोकांची बचत प्रवृत्ती कमी होते.  त्यामुळे भांडवल उभारणे वर अनिष्ट परिणाम होतो.
- प्रगतिशील कर आकारणीमुळे समाजातील संपत्तीचे पुन....र वाटप होऊन आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.
- ज्यादा अप्रत्यक्ष करांच्या दरामुळे अनावश्यक वस्तूंचा उपभोगावर आळा बसून देशातील जनतेच्या आरोग्याचे रक्षण होते.
- करांच्या  ज्यादा दरांमुळे लोकांची क्रयशक्ती कमी झाल्याने मागणी कमी होऊन चलन वाढीला आळा बसतो.

## ४.७ प्रश्न (QUESTIONS)

१. करांचे बचत व गुंतवणूक यावर होणारे परिणाम स्पष्ट करा.

२. करांचे उत्पादनावर होणारे परिणाम स्पष्ट करा.

३. करांचे उत्पन्न व संपत्ती वाटपावर होणारे परिणाम स्पष्ट करा.

४. करांचे उपभोगावर होणारे परिणाम स्पष्ट करा.

५. करांचे पुनर्वाटप परिणाम विशद करा.

६. करांचे चलनवाढ विरोधी स्वरूप स्पष्ट करा.

*****

munotes.in

**प्रकरण ३**

# ५

# सार्वजनिक खर्च

**घटक रचना**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ सार्वजनिक खर्चाचा अर्थ व व्याख्या

५.३ सार्वजनिक खर्चाची उद्दिष्ट्ये

५.४ सार्वजनिक खर्चाची वैशिष्ट्ये

५.५ सार्वजनिक खर्चाची तत्त्वे

५.६ सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण/प्रकार

५.७ सार्वजनिक खर्चाच्या वाढीची कारणे

५.८ सार्वजनिक खर्चाचे परिणाम

५.९ ॲडॉल्फ वॅगनर यांचा राज्याच्या कार्यातील वाढीचा नियम (सिद्धांत)

५.१० वाईजमन पीकॉक यांचा सार्वजनिक खर्चाचा आधुनिक सिद्धांत

५.११ सारांश

५.१२ प्रश्न

## ५.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. सार्वजनिक खर्चाचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्ट्ये, वैशिष्ट्ये व तत्त्वे यांचा अभ्यास करणे.

२. सार्वजनिक खर्चाचे विविध प्रकार अभ्यासणे.

३ सार्वजनिक खर्चाच्या वाढीच्या कारणांचा व परिणामांचा अभ्यास करणे.

४. ॲडॉल्फ वॅगनर यांचा राज्याच्या कार्यातील वाढीचा नियम अभ्यासणे.

५. वाईजमन पीकॉक यांचा सार्वजनिक खर्चाचा आधुनिक सिद्धांत अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

सार्वजनिक खर्चाची संकल्पना ही राजस्व अंतर्गत अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते. सार्वजनिक खर्च म्हणजे सरकारने किंवा सार्वजनिक सत्तेने केलेला खर्च. यामध्ये प्रामुख्याने भारतात केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांचा समावेश केला जातो. १९ व्या शतकात सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी सार्वजनिक खर्चाच्या संकल्पनेला फारच कमी प्रमाणात महत्त्व दिले होते. सुरुवातीला काळात सरकारची कार्ये म्हणून शांतता

munotes.in

व न्यायव्यवस्था, संरक्षण यांसारख्या प्रमुख बाबींचा सार्वजनिक खर्चात समावेश केला जात होता. आधुनिक काळात तर सार्वजनिक खर्चाच्या संकल्पनेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परिस्थिती पूर्णतः बदलून आर्थिक प्रणाली ही विकासाला आणि सार्वजनिक खर्चाला अधिक महत्त्व देणारी ठरली.

सार्वजनिक खर्चाची संकल्पना ही विकास साध्य करणाऱ्या अर्थव्यवस्थेला प्रेरणा देणारी असते. विकसनशील व अविकसित देशात सरकारच्या कल्याणाकारी कार्यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ झाल्याची दिसून येते. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी सरकारच्या कार्यात वाढ झाली आहे. रेल्वे, रस्ते, बंदरे, विमानतळ, धरणे , पूल , सार्वजनिक दवाखाने, शाळा व महाविद्यालये, सार्वजनिक आरोग्य, पिण्याचे पाणी व स्वच्छता, कुटुंब नियोजन, माहिती व तंत्रज्ञान, सामाजिक सुरक्षितता यासारखी विकासात्मक कामे सरकारला पार पाडावी लागतात.

आर्थिक आणि सामाजिक कल्याणात वाढ करणे तसेच नागरिकांना संरक्षण देणे यासाठी सार्वजनिक खर्चाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## ५.२ सार्वजनिक खर्चाचा अर्थ व व्याख्या (MEANING AND DEFINITION OF PUBLIC EXPENDITURE)

सार्वजनिक खर्चाला आपण सरकारी खर्च किंवा शासकीय खर्चअसे म्हणतो. भारतामध्ये संघराज्य पद्धतीत केंद्र सरकार, राज्यसरकार, स्थानिक स्वराज्यसंस्था यांचा समावेश होतो. सार्वजनिक खर्च हा विकासात्मक व विकासेतर, योजना व योजनेतर खर्च, आणि महसुली खर्च आणि भांडवली खर्च अशा बाबींवर केला जातो.

**सार्वजनिक खर्चाची व्याख्या:**

सार्वजनिक खर्चाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली जाते:

१) केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून संरक्षण, अंतर्गत सुरक्षितता आणि सामाजिक कल्याण इ. कार्यासाठी केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

२) शासकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी शासनाकडून जो खर्च केला जातो त्यास सरकारचा खर्च किंवा सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

## ५.३ सार्वजनिक खर्चाची उद्दिष्ट्ये (OBJECTIVES OF PUBLIC EXPENDITURE)

सार्वजनिक खर्चाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतात:

१. सरकार हे सार्वजनिक गरजा आणि गुणात्मक गरजा गरजा पूर्ण करणे हे कार्य करू शकते. शासनाकडून ज्या विविध सेवा पूरविल्या जातात उदा.- अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, वाहतूक व दळणवळणाच्या सोयी, विजपूरवठा, पाणी पुरवठा, बागबगीचे,



munotes.in

पर्यटन केंद्र, पोष्ट सेवा, दूरध्वनी सेवा. इ. सेवा शासन समाजासाठी पूरवित असते. या सेवांचा उपभोग समाजातील लोक सामुहिक रितीने घेत असतात. म्हणून त्यांना सामाजिक सेवा किंवा सार्वजनिक गरजा म्हणतात.

शिक्षण, आरोग्य, राहणीमान या ज्या गरजा असतात त्यांना गुणात्मक गरजा म्हणतात. लोकांमध्ये गुणात्मक व दर्जात्मक विकास करण्यासाठी शासन या गरजा पूरवित असते. शिक्षणामुळे मानवी विकास, साक्षरतेचा प्रसार, मोफत शिक्षण, आरोग्य सेवेसाठी नाममात्र फी, गरीब लोकांना कमी दराने अन्नधान्याचा पुरवठा, शाळामधून पोषक आहाराचे वाटप, बेघरांना घरे इ. याचप्रमाणे लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाकडून खर्च केला जातो. अशा रितीने मानवी विकासासाठी शासन जो खर्च करीत असते त्याचा समावेश गुणात्मक गरजेत केला जातो.

२. प्रादेशिक विषमता म्हणजे देशातील काही राज्ये विकसित तर काही राज्ये अविकसित असणे होय. देशाचा सर्वांगीण आर्थिक विकास हा सर्व राज्यांच्या एकत्रित प्रयत्नातून होतो. देशातील काही राज्ये अविकसित असतील तर देशाचा आर्थिक विकासाचा दर कमी असतो. अशा राज्यांना केंद्रसरकार विकसित राज्यांच्या तुलनेने जास्तीचे अर्थसहाय्य पूरविते. सरकार अनेक राज्यात अनेक सवलती पूरवून अविकसित राज्यांचा विकास करण्यासाठी मोठया प्रमाणावर सार्वजनिक खर्च केला जातो.

३. देशात आर्थिक विषमता जास्त असेल तर दारिद्र्याचे प्रमाण जास्त राहून निरक्षरतेचे प्रमाण वाढते. अशारितीने आर्थिक विषमता आर्थिक विकासातील फार मोठा अडथळा ठरत आहे. गरीब लोकांसाठी कल्याणकारी योजना, अर्थसाहाय्य, कर्जपूरवठा, स्वयंरोजगार उपलब्ध करून गरीब लोकांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न सरकार सार्वजनिक खर्चातून करते .

४. अर्थव्यवस्थेत तेजी मंदीच्या व्यापारचक्रामुळे अस्थिरता निर्माण होवून त्याचा परिणाम आर्थिक विकासाच्या दरावर होतो. म्हणून व्यापारचक्राचे निर्मूलन करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे. सार्वजनिक खर्च हे एक राज्यवित्तीय धोरणाचे साधन आहे. मंदीच्या परिस्थितीत सार्वजनिक खर्चात वाढ केल्याने सार्वजनिक क्षेत्रात प्रकल्प, उद्योगधंदे आणि रोजगार पूरविणाऱ्या योजना राबविण्यात आल्या तर लोकांची खरेदीशक्ती वाढून मागणीत वाढ होईल. त्यामुळे उत्पादनात व रोजगारात वाढ होते याउलट तेजीच्या परिस्थितीत किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक खर्चावर नियंत्रण ठेवले जाते.

५. देशाचा विकासाचा साध्य करणे हे उद्दिष्ट सार्वजनिक खर्चाचे असते. आर्थिक विकास हा प्रामुख्याने पायाभूत सोयींवर अवलंबून असतो. म्हणून पायाभूत सोयींवर उदा. वाहतूक, दळणवळण, वीजपूरवठा, पाणीपुरवठा, वित्तपूरवठा, मानवी संसाधनाचा विकास इ. साठी मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक खर्च केला जातो. पायाभूत संरचनेच्या सोयीतून देशाचा सर्वांगीण विकास साध्य होण्यास मदत होते.

देशातील लोकांच्या वस्तू सेवांच्या उपभोगावर त्यांचे आरोग्य व कार्यक्षमता अवलंबून असते. सरकार जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मितीसाठी अनुदान पूरविले जाते तर मादक

द्रव्य, मादक पेय यांचा उपभोग लोकांनी कमी घ्यावा म्हणून त्यांच्यावर करांचे दर जास्त दराने आकारते. देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप योग्य रितीने करण्याचे कार्य देशाचा सार्वजनिक खर्च करतो. देशातील साधनसंपत्तीची गुंतवणूक करतांना जीवनावश्यक वस्तूंना प्राधान्य आणि नंतर चैनीच्या वस्तू, मादक पेय यांच्यामध्ये गुंतवणूक केली जाते.

अशारितीने सार्वजनिक खर्चाची प्रमुख उद्दिष्ट्ये सांगता येतात.

## ५.४ सार्वजनिक खर्चाची वैशिष्ट्ये (FEATURES OF PUBLIC EXPENDITURE)

सार्वजनिक खर्चाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात:

१) सरकारचा सार्वजनिक खर्च आवश्यक व सक्तीचा असल्याने तो करावाच लागतो.

२) सार्वजनिक खर्चामुळे सामाजिक हित किंवा कल्याण साध्य केले जाते.

३) सार्वजनिक खर्चाच्या सहाय्याने पुढील कार्य केली जातात. उदा. शिक्षण, स्वास्थ्य, वृद्धापकाळाची तरतूद, संरक्षण, वाहतूक व दळणवळण इ.

४) सार्वजनिक खर्च आवश्यक व अनावश्यक बाबींवरही मोठया प्रमाणावर केला जातो.

५) सरकारच्या कल्याणकारी कार्यात वाढ झाल्याने सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे.

## ५.५ सार्वजनिक खर्चाची तत्त्वे (CANONS OF PUBLIC EXPENDITURE)

सार्वजनिक खर्च योग्य रितीने होण्यासाठी काही अर्थतज्ञांनी सार्वजनिक खर्चाची काही तत्त्वे सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे:

### १) महत्तम सामाजिक लाभ तत्त्व:

प्रा. पिगू यांच्या मते समाजहितासाठी राज्य व समाजहितासाठी सार्वजनिक खर्च करणे हे राज्याचे कर्तव्य असते. म्हणून सार्वजनिक आयव्ययाचे महत्तम सामजिक लाभ तत्त्व हे महत्त्वाचे तत्त्व आहे. सार्वजनिक खर्च महत्तम सामाजिक लाभतत्त्वानुसार करण्यात यावा याचा अर्थ शासनाने उत्पन्न मिळवितांना आणि खर्च करतांना असे धोरण ठेवावे की जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण साधले जाईल. कर आकारणीमुळे लोकांना जो त्याग सहन करावा लागतो तो कमीत कमी असावा आणि सार्वजनिक खर्चामुळे लोकांना जो लाभ मिळतो तो जास्तीत जास्त असावा.

### २) काटकसर किंवा मितव्ययतेचे तत्त्व:

काटकसर म्हणजे सरकारने सार्वजनिक खर्च करताना आपले प्राधान्यक्रम ठरवावे. सार्वजनिक खर्च विचारपूर्वक करून साधनसंपत्तीचा अपव्यय होणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यक बाबींवर सरकारने खर्च करावा परंतु अनावश्यक कारणासाठी पैसा खर्च

होणार नाही याची दक्षता घ्यावी. तोटयात चालणारे प्रकल्प, अनावश्यक कर्मचाऱ्यांची भरती, वारंवार करावी लागणारी बांधकामे, प्रतिष्ठेच्या नावाखाली केला जाणारा अनावश्यक खर्च कटाक्षाने टाळला पाहिजे.

**३) शिलकीचे किंवा वाढाव्याचे अंदाजपत्रक:**

सनातनवादीच्या काळात अंदाजपत्रक शिलकीचे असणे महत्त्वाचे मानले जात. परंतू अलिकडील काळात शिलकीचे अंदाजपत्रक हे महत्त्वाचे मानले जात नाही. उलट मंदीच्या परिस्थितीत तुटीचे अंदाजपत्रक आवश्यक असते कारण मंदीच्या परिस्थितीत सार्वजनिक खर्चात वाढ करावी लागते. म्हणून तुटीचे अंदाजपत्रक लक्षात ठेवून सार्वजनिक खर्चात वाढ केली जाते. थोडक्यात शिलकीच्या अंदाजपत्रक नेहमीच शक्य नाही तर गरज पडली तर तुटीचे अंदाजपत्रक योग्य ठरते.

**४) मान्यतेचे तत्त्व:**

कायदेमंडळाच्या परवानगीशिवाय सरकारला सार्वजनिक खर्च करता येत नाही. शासनाजवळील पैशाचा उपयोग अधिकाऱ्यांच्या मर्जीनुसार न करता लोकप्रतिनिधींनी ठरवून दिलेल्या प्रमाणे करावा. कारण अधिकाऱ्यांच्या तुलनेने लोकप्रतिनिधींना लोकांच्या समस्याची अधिक जाण असते. मान्यतेच्या तत्त्वामुळे शासकीय खर्चाच्या उधळपट्टीला आळा बसू शकतो.

**५) लवचिकतेचे तत्त्व:**

युद्ध, भूकंप, महापूर, चक्रीवादळ, साथीचे रोग यासारख्या बाबींवर अचानक खर्च करावा लागल्यास तो विनाविलंब करता आला पाहिजे. बदलत्या परिस्थितीनुसार सरकारच्या सार्वजनिक खर्चात बदल करता आला पाहिजे सार्वजनिक खर्च ताठर नसावा तर तो लवचिक असावा.

**६) उत्पादकतेचे तत्त्व:**

सरकारच्या सार्वजनिक खर्चामुळे उत्पादनावर अनुकूल परिणाम होत असतो. सार्वजनिक खर्चामुळे उत्पादनात वाढ, रोजगारात वाढ, भांडवलात वाढ, श्रमिकांच्या कार्यक्षमतेत वाढ होत असते. अशा उत्पादन खर्चाला प्राधान्य द्यावे असे उत्पादकतेचे तत्त्व सांगते.

**७) समान वितरणाचे तत्त्व:**

सार्वजनिक खर्चामुळे देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप समान होईल अशा रितीने करण्यात यावा. त्यासाठी सरकारने गरीब लोकांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी जास्त खर्च करावा. गरीब वर्गाला मोफत शिक्षण, आरोग्य, स्वस्तात घरे, विशेष सवलती पूरविण्यात आल्या आहेत.

**८) समन्वयाचे तत्त्व:**

भारतातील संघराज्य पद्धतीत केंद्रसरकार, राज्यसरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे अस्तित्त्व असते. केंद्रसरकार, राज्यसरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या कार्यावर

munotes.in

खर्च करताना सरकारच्या खर्चामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. सरकारच्या खर्चात्त समन्वय नसेल तर सार्वजनिक खर्चाचा अपव्यय होण्याची शक्यता असते.

### ९) सोयीचे तत्त्व:

सरकारचा सार्वजनिक खर्च करतांना लोकांची गैरसोय होणार अशा पद्धतीने करावा. सार्वजनिक खर्चामुळे समाजाची सोय व्हावी समाजाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जावी.

## ५.६ सार्वजनिक खर्चाचे वर्गिकरण/प्रकार (CLASSIFICATION / TYPE OF PUBLIC EXPENDITURE)

### १) योजना खर्च:

विकसनशील देशांपैकी काही देशांनी आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नियोजन तंत्राचा वापर सुरू केला आहे. योजना खर्चात  शेती, ग्रामीण विकास, जलसिंचन उद्योग, वाहतूक, दळणवळण, विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण, पूरनियंत्रण, सामाजिक सोयी सुविधा, शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण इ. वरील खर्चाचा समावेश केला जातो.

### २) योजनेतर खर्च:

सरकारला जो चाल खर्च टाळता येत नाही, त्याची जबाबदारी सरकारवर असते व जो खर्च सरकारला करावाच लागतो त्याला योजनेत्तर खर्च असे म्हणतात. योजनेतर खर्चात व्याज, संरक्षणावरील महसूली खर्च व भांडवली खर्च, अर्थसाहाय्य, निवृत्ती वेतन, पोलिस यंत्रणा, नैसर्गिक आपत्ती निवारण अनुदान, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना अनुदाने, आर्थिक सेवा, सामाजिक सेवा, सामान्य सेवा, पोष्ट खाते केंद्रशासित प्रदेशांचा खर्च, राज्यांना कर्ज, सार्वजनिक उपक्रमांना कर्ज, विदेशी सरकारला कर्ज इ. वरील खर्चाचा समावेश योजनेतर खर्चात केला जातो.

### ३) महसुली सार्वजनिक खर्च :

जो सार्वजनिक खर्च चालू खात्यावर किंवा महसुली खात्यावर केला जातो किंबहुना जो सार्वजनिक खर्च संबंधित कामासाठी दरवर्षी पुनः पुन्हा केला जातो त्यास महसुली खर्च असे म्हणतात. असा खर्च शक्यतो चालू उत्पन्नातून म्हणजे कर महसुलातून केला जातो.

### ४) भांडवली सार्वजनिक खर्च:

भांडवली सार्वजनिक खर्च हा नव्या योजनांसाठी की ज्यातून महसुली उत्पन्नाचे स्रोत निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा भांडवली प्रकल्पावर भांडवली सार्वजनिक खर्च केला जातो. भांडवली सार्वजनिक खर्च करण्यासाठी सरकार शक्यतो कर्जाऊ निधीचा वापर करते व अशा कर्जाऊ निधीची परतफेड करण्यासाठी संबंधित प्रकल्पापासून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग वापरला जातो.

munotes.in

**५) विकास खर्च:**

देशाचा विकास घडवून आणणाऱ्या बाबींवर केलेला खर्च म्हणजे विकासात्मक सार्वजनिक खर्च होय. यामध्ये आरोग्य, कुटुंब कल्याण, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, पाणीपुरवठा, घरबांधणी, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, शास्त्रीय सेवा व संशोधन, माहिती व प्रसारण, वाहतूक व दळणवळण, रोजगारविनिमय केंद्रे, रोजगारनिर्मिती, कामगार कल्याण, शेती व शेतीशी निगडित सेवा, उद्योगधंदे, खनिजे, परराष्ट्रीय व्यापार, सामाजिक व समाजविकास योजना, नागरी विकास इत्यादी देशाचा विकास घडवून आणणाऱ्या बाबींवर केलेल्या खर्चाचा समावेश होतो.

**६) विकासेतर सार्वजनिक खर्च:**

ज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला प्रत्यक्ष हातभार लागणार नाही तरीही जो खर्च सरकारला आवश्यक म्हणून करावा लागतो त्याला विकासेत्तर सार्वजनिक खर्च असे म्हणतात.यामध्ये सरकारी कर्जावरील व्याज, कर व अन्य शुल्क गोळा करण्याचा खर्च, सार्वजनिक बांधकामे, पोलीस, न्यायदान, देशाचे संरक्षण, नाणी व नोटा छपाईचा खर्च, निवृत्ती वेतन, टपाल व सेवा खर्च इत्यादींचा समावेश होतो.

## ५.७ सार्वजनिक खर्चाच्या वाढीची कारणे (CAUSES OF INCREASING PUBLIC EXPENDITURE)

आधुनिक काळात जगातील बहुसंख्य देशांत सार्वजनिक खर्च सतत मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. तो आवश्यक असल्याचे अनेक अभ्यासावरून सिद्ध झाले आहे. ॲडॉल्फ वॅग्नर, पीकॉक, वाईजमन, एफ. एस. निट्टी, जे. एम. केन्स इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी या वाढत्या सरकारी खर्चाची कारणे दिली असून त्याचे समर्थन केले आहे. सार्वजनिक खर्चाच्या बाढीची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. २० व्या शतकात जगातील अनेक देशाची लोकसंख्या वेगाने वाढलेली आहे. लोकसंख्येतील वाढीबरोबर सरकारी सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे. शिक्षण, आरोग्याच्या सोयी, रस्ते. वाहतूक व दळणवळणाच्या सोयी, घरबांधणी इत्यादीसाठीचा सरकारी खर्च खूपच वाढलेला आहे. आर्थिक विकासाबरोबर लोकसंख्या वाढीमुळे शहरीकरणातही वाढ होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, झोपडपत्यांचे निर्मूलन, क्रीडांगणे, दिवाबत्ती, पोलीस व न्यायालये इत्यादींसाठीचा सरकारचा खर्च वाढत आहे. अलीकडे प्रदूषण टाळून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सरकारी खर्चात मोठी वाढ होत आहे.

२. अलीकडच्या काळात सर्व देशांच्या संरक्षण खर्चात वाढ होत असल्याचे दिसून येत्ते. देशाचे संरक्षण करणे, सार्वभौमत्व टिकविणे यासाठी सर्वच देशांचा संरक्षणावर मोठया प्रमाणात सार्वजनिक खर्च होतो. अत्याधुनिक शस्त्रास्त्रे बनविणे, त्यावर संशोधन करणे, महागडी अण्वस्त्रे बनविणे, विमानवाहू बोटी खरेदी करणे, आधुनिक लढाऊ विमाने बनविणे, रणगाडे बनविणे, तोफखाना सज्ज ठेवणे इत्यादींसाठी सरकारला कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. नौदल, हवाई दल, पाणदल इत्यादींसाठीही

सरकारला सार्वजनिक खर्च मोठया प्रमाणात करावा लागतो. परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करण्यासाठीचा सरकारचा खर्च वाढत आहे.

३. देशाच्या संरक्षणाबरोबर देशांतर्गत शांतता व सुरक्षितता तितकीच महत्त्वाची मानली जाते. म्हणूनच अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे. न्यायालयीन यंत्रणा, पोलीस यंत्रणा, होमगार्ड यंत्रणा, तुरुंग व्यवस्था इत्यादींवर होणारा सरकारचा सार्वजनिक खर्च मोठया प्रमाणात वाढत आहे.

४. आज जगातील बहुसंख्य देशांनी कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारलेली आहे. त्यामुळे लोकांच्या कल्याणाची कामे सरकारने करावी लागतात.त्यामुळे जास्तीतजास्त लोकांना रोजगार, दुर्बल घटकांना आर्थिक मदत, कुटुंब कल्याण, मोफत शिक्षण, वैद्यकीय सेवा, आयुर्विम्याच्या सेवा, भविष्य निर्वाह, पेन्शन, अपघात विमा यांसारख्या सोई पुरवून सार्वजनिक गरजा भागविण्यासाठी सरकारला खर्च करावा लागतो.

५. २० व्या शतकात अनेक देशांत लोकशाही पद्धतीने राज्यकारभार चालविला जातो. ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, ग्रामसभा, त्यातील नोकरवर्ग व लोकप्रतिनिधी तसेच विविध खात्यांतील सचिव व त्यांच्या कचेरीतील नोकरवर्गांचा खर्च, कायदेमंडळाच्या सभासदांचे भत्ते, मंत्र्यांचे पगार इत्यादींवरील खर्च खूपच वाढला आहे. देशातील विविध राजकीय पक्ष व निवडणुका होतात यावरील खर्चातही वाढ झालेली आहे.

६. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांचा नियोजनाद्वारे आर्थिक विकास साध्य करणे शक्य आहे. नियोजनाच्या सहाय्याने विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शेती,उद्योग,व्यापार व बँकिग, मूलभूत उद्योगांची निर्मिती, सार्वजनिक सेवांची निर्मिती इत्यादींमुळे सरकारी खर्चात वाढ होत आहे.

७. किंमत पातळीत सातत्याने होणारी वाढ ही सार्वजनिक खर्च वाढवण्यास कारणीभूत ठरते. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील विविध देशांत किंमत पातळीमध्ये प्रचंड वाढ झाली. सरकारला विविध प्रकारच्या वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी जादा किंमत द्यावी लागते. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ते द्यावे लागतात. त्यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होते आहे.

८. जागतिक महामंदीमध्ये अनेक देशांतील उद्योगसंस्था, बँकां व वित्तीय संस्थांना अनेक समस्याना सामोरे जावे लागले. अर्थव्यवस्थेतील बेरोजगारी वाढली. महामंदीतून अर्थव्यवस्थाबाहेर काढण्यासाठी सरकारने रस्ते दुरुस्ती, पूल बांधणे, सार्वजनिक इमारती बांधणे असे अनेक कार्यक्रम हाती घेतल्याने सरकारी खर्चात प्रचंड वाढ झाली. अर्थव्यवस्थेत उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी सरकारला शेती, उद्योग, बांधकाम इत्यादीसाठी मोठा सार्वजनिक खर्च करावा लागला.

९. अलीकडील काळात सार्वजनिक क्षेत्र विस्तृत व विकसित झाले आहे. लोखंड-पोलाद उद्योग, विद्युतनिर्मिती अणुशक्ती उत्पादन, रस्तेनिर्मिती, रेल्वे उभारणी, जहाजबांधणी, विमान बांधणी, बहुउद्देशीय धरणांचे प्रकल्प इत्यादी सरकारच्या ताब्यात आहेत.

लोकांच्या हितासाठी बँकिंग, विमा-व्यवसाय, पोस्ट, तार, टेलिफोन व्यवसायही सरकारकडून चालतात. या उद्योग-व्यवसायांच्या उभारणीसाठी, देखभालीसाठी व त्यांच्या प्रशासनासाठी सरकारला मोठयाप्रमाणात सार्वजनिक खर्च करावा लागतो.

१०. सरकारला कराव्या लागणाऱ्या कल्याणकारी व विकास कार्यासाठी सार्वजनिक कर्ज उभारावे लागते. आधुनिक काळात सरकारी उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन म्हणून सार्वजनिक कर्जाला मानले जाते. सार्वजनिक कर्जाचे हिशेब, परतफेड, त्यावर व्याज देणे यासाठी सरकारच्या खर्चात वाढ झाली आहे.

११. रस्त्यांची उभारणी, आजारी उद्योगांना अर्थसाहाय्य, दुर्बल घटकांसाठी मोफत घरांची सोय, कमी दराने रेशनची व्यवस्था, पुरेसा पाणीपुरवठा इत्यादीसाठी सरकारवर देशातील नागरिक अवलंबून असतात. लोकांच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकारी खर्चात वाढ करावी लागत आहे.

१२. आजच्या बदलत्या काळात विविध देशा देशांतील आंतरराष्ट्रीय संबंध वाढत आहेत. त्यामुळे यूनो, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी इत्यादी संस्थांत प्रतिनिधी पाठविणे इत्यादींवरील सरकारचा खर्च प्रचंड वाढलेला आहे.

## ५.८ सार्वजनिक खर्चाचे परिणाम (EFFECTS OF PUBLIC EXPENDITURE)

सार्वजनिक खर्चाचा अभ्यास करीत असतांना सार्वजनिक खर्चाचा उत्पादनावर, विभाजनावर, रोजगारावर होणारा परिणाम आभ्यासणे महत्त्वाचे असते.

**सार्वजनिक खर्चाचा उत्पादनावरील परिणाम (Effects of Public Expenditure on Production):**

सार्वजनिक खर्चाचा (व्ययाचा) उत्पादनावर अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम होत असतो. म्हणजेच सार्वजनिक खर्चामुळे उत्पादनात वाढ होते किंवा घट होते. सार्वजनिक खर्चामुळे उत्पादनात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वाढ होत असते. डॉ. डॉल्टन यांच्या मते सार्वजनिक खर्चाचा उत्पादनावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी सार्वजनिक खर्चाचे पुढील तीन घटकांवर होणारे परिणाम अभ्यासले पाहिजेत.

१) काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या क्षमतेवरील परिणाम

२) काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छेवरील परिणाम

३) आर्थिक साधनसामुग्रीच्या प्रवाहात होणारे बदल

**१) काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या क्षमतेवरील परिणाम:**

सार्वजनिक खर्चातील वाढीमुळे लोकांच्या काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या क्षमतेत वाढ होते पर्यायाने उत्पादनात वाढ होते. काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या क्षमतेवरील अनुकूल परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतात.

सरकारने सार्वजनिक खर्च केल्यामुळे शिक्षण, आरोग्य, राहणीमान, निवाऱ्याच्या सोयी, स्वस्त दरात अन्नधान्य इ. चा समाजातील लोकांना फायदाहोत असतो. शिक्षणावरील खर्चामुळे साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होऊन लोकांच्या उत्पन्नात वाढून त्यांची बचत वाढते व बचतीत वाढ झाल्याने गुंतवणूकीत वाढ होऊन उत्पादनात वाढ होते. सरकारच्या आरोग्यावरील खर्चामुळे लोकांच्या आरोग्याच्या दर्जात सुधारून होऊन कार्यक्षमतेत सुधारणा होऊन  काम करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे उत्पन्न व बचतीत वाढ होते त्याचा परिणाम गुंतवणूकीत वाढ होऊन उत्पादनात वाढ होते. गरीबांसाठी स्वस्त दरात अन्न . धान्य, मोफत निवारा, पिण्यासाठी शुद्ध पाणी पूरविले जाते त्यामुळे लोकांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन त्यांच्या उत्पन्नात व राहणीमानात वाढ होते उत्पन्नातील वाढीमुळे बचत वाढते. त्याचा परिणाम गुंतवणूकीत वाढ होऊन उत्पादनात वाढ होते.

### २) काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छेवरील परिणाम:

सार्वजनिक खर्चाचा काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर होणारा परिणाम होत असतो. सार्वजनिक खर्चाचे काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर खालील परिणाम होतात.

अ) अपघात नुकसान भरपाई, आजारपणासाठी मदत, वैद्यकीय व बेकारी भत्ते, पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड, इ. मुळे लोकांना सामाजिक सुरक्षिततेचा लाभ मिळतो. पण त्यामुळे व्यक्तीची काम, बचत करण्याची इच्छा कमी होऊ शकते. पेंशन, प्रॉव्हीडंट फंड यासारख्या सोयी, सुविधांमुळे व्यक्तीला उतारवयातील चिंता नसते. यावरील सार्वजनिक खर्चामुळे लोकांची काम करण्याची इच्छा कमी होते. उतारवयात काही तरतूद करावी असे व्यक्तीला वाटत नाही. त्यामुळे व्यक्तीची बचत कमी होऊन पर्यायाने गुंतवणूक कमी होते.

ब) भविष्यकाळाच्या काळजीमुळे व्यक्तीला जास्त काम करून जास्त उत्पन्न व बचत करावी असे वाटत असते. परंतू शासनाकडून सामाजिक सुरक्षितता मिळत असल्यामुळे व्यक्तीची काम, बचत करण्याची इच्छा कमी होते. व्यक्ती उत्पन्न वाढीसाठी जास्त काम करीत नाही. बचतही कमी करते त्यामुळे गुंतवणूक कमी होते.

वरील स्पष्टीकरणावरून सार्वजनिक खर्चाचे काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर प्रतिकूल परिणाम होतात असे दिसून येते. परंतू सार्वजनिक खर्चामुळे लोकांची काम, बचत, करण्याची इच्छा कमी होते असे ठामपणे म्हणता येत नाही. विकसीत देशांचा असा अनुभव आहे की तेथे सार्वजनिक खर्चामुळे लोकांची काम, बचत करण्याची इच्छा कमी झालेली नाही.

### ३) आर्थिक साधनसामुग्रीच्या प्रवाहात होणारे परिणाम:

सार्वजनिक खर्च हा जनतेच्या पैशातून होत असतो म्हणून सार्वजनिक खर्चाचे प्रमाण ठरविण्यात यावे. सार्वजनिक खर्च मर्यादेपेक्षा जास्त नसावा तसेच तो मर्यादेपेक्षा कमी नसावा हा खर्च अतिरिक्त प्रमाणात केला जाणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेतील वापरात नसलेली  साधनसामग्री

munotes.in

वापरात आणली जाते. जलसिंचन, वीज व वाहतूक विकास, संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण इ.वरील खर्चामुळे उत्पादकतेत वाढ होते.

प्रादेशिक विषमतेची समस्या सर्व विकसनशील राष्ट्रांसमोर समस्या आहे. उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक, दळणवळणाच्या सोयी यामुळे काही प्रदेश अधिक प्रगत तर इतर प्रदेश मागासलेले राहतात. ही प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी सार्वजनिक उद्योगांची स्थापना, वाहतूक दळणवळणाच्या सोयी, औद्योगिक वसाहती स्थापन करणे यावर जर सरकारने पैसा खर्च केला तर मागासलेल्या प्रदेशांचा विकास होऊन प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत होते.

**ब) सार्वजनिक खर्चाचे विभाजनावरील परिणाम:**

देशातील सरकारने सार्वजनिक  खर्च योग्य मार्गाने व योग्य प्रमाणात केला तर उत्पन्नातील विषमता कमी होण्यास मदत होईल. सरकारी खर्चाचा हेतू आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदत करणे व सोईसवलती उपलब्ध करून देणे हा असेल तर त्यांचे वास्तव उत्पन्न वाढेल, जीवनमान उंचावून  व आर्थिक विषमता कमी होईल. भूमिहीन शेतमजूर, सीमांत शेतकरी, बंधनात असणारे मजूर, अपंग व  आर्थिकदृष्ट्या निराधार व्यक्ती, सामाजिकदृष्ट्या पददलित, आदिवासी यांना सरकारी खर्चाच्या योजनांचा अधिक लाभ होतो. कमी उत्पन्न गटातील व्यक्तींना अल्प खर्चात घरे बांधून देणे, रास्त दराने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, रोजगार संधी उपलब्ध करून देणे इत्यादींसाठी सरकारी खर्च अधिक झाल्यास देशातील गरिबी कमी होण्यास मदत होईल.

**(क) सार्वजनिक खर्चाचे इतर परिणाम:**

**१. रोजगारावरील परिणाम:**

सार्वजनिक खर्चाचा रोजगारावर परिणाम होत असतो. सरकारने लोखंड व पोलाद, कोळसा,अवजड आभियांत्रिकी ,पाणीपुरवठा, वीज , दूरसंचार सेवा,बँकिग इ. क्षेत्रात केलेल्या सार्वजनिक खर्चामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार वाढला आहे. सरकारच्या विविध योजनांवरील खर्च, मोठ्या प्रकल्पांवरील खर्च व विकास कार्यावरील खर्च इत्यादींमुळे रोजगारात वाढ होते.

**२. आर्थिक स्थैर्य:**

आर्थिक विकास निर्माण करण्यासाठी कोणत्याही देशात आर्थिक स्थैर्य असणे आवश्यक असते. अर्थव्यवस्थेवर होणारे तेजी-मंदीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी सार्वजनिक खर्च महत्त्वाची भूमिका पार पाडतो. केन्स, ए. पी. लर्नर यांनी सार्वजनिक खर्च नीतीला विशेष महत्त्व दिले आहे.

**३. आर्थिक विकास:**

देशाच्या आर्थिक विकासासाठी सार्वजनिक खर्च महत्त्वाची भूमिका पार पाडतो. विकसनशील देशात विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाला पुढाकार घ्यावा लागतो. शेती, उद्योग व सेवा क्षेत्राबरोबर आर्थिक विकास दर, रोजगारात वाढ, आर्थिक विषमत्तेत घट, पाणीपुरवठा, वीज, दूरसंचार सेवा, बँकिग, शिक्षण, संशोधन इ. साठी सरकारला

सार्वजनिक खर्च करावा लागतो. योग्य रीतीने सार्वजनिक खर्चाची आखणी व अंमलबजावणी केल्यास आर्थिक विकासाला साहाय्य होते.

## ५.९ ॲडॉल्फ वॅगनर यांचा राज्याच्या कार्यातील वाढीचा नियम (सिद्धांत) (ADOLPH WAGNER'S LAW OF INCREASING STATE ACTIVITIES)

१९ व्या शतकात म्हणजेच १८८०-९० च्या दरम्यान जर्मन वित्तीय अर्थशास्त्रज्ञ अडॉल्फ वॅगनर यांनी आपल्या लिखाणात आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक पातळीवरील सरकारच्या वाढत्या कार्याबद्दलचा किंवा वखर्चाचा नियम मांडला. त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, जपान, जर्मनी, आणि अमेरिका सारख्या विकसित व उद्योग प्रधान राष्ट्राच्या आर्थिक इतिहासाचा मागोवा घेतला.वॅगनर यांनी 'सार्वजनिक खर्च' हा सरकारच्या वाढत्या कार्याचे मानले आहे. यालाच वॅगनरचा "राज्याच्या (शासनाच्या) कार्यातील वाढीचा नियम" म्हटले जाते. वॅगनरचा हा सिद्धांत अनुभवावर आधारित आहे. आर्थिक बदल किंवा आर्थिक विकास व राष्ट्रीय उत्पन्नात सरकारी खर्चाचे प्रमाण यांच्यातील प्रत्यक्ष सहसंबंध शोधून काढणे व तो सिद्ध करणे हा त्यांचा मुख्य हेतू होता. हाच सिद्धांत सरकारी खर्चाच्या वाढीसंबंधीचा 'जैविक सिद्धांत' म्हणूनही ओळखला जातो. 'जगातील विविध देशांतील कार्यावरून असे लक्षात येते की, ज्या देशातील सरकार विकासाचा मार्ग अवलंबिते अशा विकसनशील देशातील केंद्र सरकार, घटक राज्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्ये विस्तृत होत आहेत. अशी आर्थिक कार्ये विस्तृत व अधिक व्यापक असल्याने सार्वजनिक खर्चाचे स्वरूप व व्याप्ती वाढत आहे. सरकार नवीन कार्ये हाती घेत असताना प्रचलित व नवीन कार्य अधिक कार्यक्षमतेने करण्याचा प्रयत्न करते. अशा कार्यातूनच सामाजिक हिताशी संबंधित राज्याची भूमिका व्यापक स्वरूपाची झाल्याने त्याचा सार्वजनिक खर्चाशी घनिष्ठ संबंध आहे.

राज्याच्या कार्यातील वाढीचा किंवा वाढत्या सरकारी खर्चाचा नियम वॅगनरच्या शब्दांत पुढीलप्रमाणे देता येईल. वॅगनरच्या या नियमानुसार, "विविध देशांची व विविध कालखंडांची विस्तृत तुलना केली असता दिसून येते की प्रगतिशील राष्ट्रात केंद्रीय व स्थानीय अशा दोन्ही सरकारच्या कार्यामध्ये नियमितपणे वाढ होत आहे. ही वाढ विस्तृत स्वरूपात होत आहे. केंद्रीय व स्थानिक सरकारे सातत्याने नवीन कार्ये आपल्याकडे घेत आहेत. तसेच ते जुनी व नवीन अशी दोन्ही प्रकारची कार्ये अधिक प्रभावीपणे करीत आहेत. म्हणजेच लोकांच्या आर्थिक गरजा अधिक वाढत्या प्रमाणात व अधिक समाधानकारक पद्धतीने केंद्रीय व स्थानिक सरकारकडून भागविल्या जातात."

ॲडॉल्फ वॅगनर यांच्या विधानाप्रमाणे केंद्र सरकार व स्थानिक सरकार यांच्या कार्यात वाढ होणे म्हणजेच त्यांच्या कार्यामध्ये वाढ होणे. याचा अर्थ, सरकारी कार्याचा म्हणजेच सरकारी खर्चाचा विस्तार होणे असा होतो. सध्याच्या सरकारमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवां व त्याच सरकारकडून ५० वर्षांपूर्वी पुरविल्या गेलेल्या सेवा यांची तुलना केल्यास वरील विधानाची निर्विवादपणे सत्यता मिळते. तसेच जुनी व नवीन कार्ये अधिक कार्यक्षमतेने पूर्ण करण्याचा प्रयत्न जेव्हा सरकार करते तेव्हा सरकारी कार्यात व खर्चात मोठया प्रमाणात वाढ झाली असे म्हणता येईल. पोलीस व्यवस्थेची सुधारणा, आधुनिक रस्ते,

दळणवळणासाठी अंतरिक्ष कक्षेतील यानाचा व टेलिव्हिजनचा वापर, टेलिफोन यातून जुन्या सरकारी कार्यात सुधारणा झाली हे स्पष्ट होते. उच्च शिक्षण व संशोधन प्रशिक्षण, सेवायोजन कार्यालये, वेधशाळा, कुटुंबनियोजन, वनसंरक्षण यांसारख्या नव्या कार्यात सततहोणारी सुधारणा ही सरकारी कार्यात किंवा खर्चात होणाऱ्या वाढीची उदाहरणे आहेत. वॅगनरने असे गृहीतक मांडले की उद्योगीकरणामुळे दरडोई उत्पन्नाबरोबर सरकारी खर्चाचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्साही वाढत जातो.

थोडक्यात, वॅगनर यांचा हा सिद्धांत संक्षिप्त स्वरूपात असा मांडता येईल की, "राज्याच्या कार्यात विस्तृत व गहन स्वरूपात वाढ झाल्याने सार्वजनिक खर्चात वाढ झाली."

**वॅगनरच्या नियमावरील मर्यादा:**

१. वॅगनरचा सिद्धांत हा औद्योगिकीकरण झालेल्या पुरोगामी अशा इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, जपान यांसारख्या देशांना लागू करण्यात आला परंतु त्यात अविकसित आशियाई किंवा आफ्रिकन किंवा दक्षिण अमेरिकन राष्ट्रांचा विचार केला नाही.

२. सरकारच्या वाढत्या कार्याला किंवा खर्चाला शासनव्यवस्थेत अपरिहार्यपणे विकसित होत गेलेल्या राज्यशास्त्रीय रचनांचा व प्रक्रियांचा कितपत हातभार लागला हे वॅगनर स्पष्ट करीत नाही.

३. सरकारच्या कार्यात झालेली वाढ नेमकी कोणत्या कारणांनी झाली याची सैद्धांतिक मीमांसा वॅगनरच्या विवेचनात नाही.

४. सरकारच्या वाढत्या खर्चास जबाबदार ठरणारे प्रभावी घटक कोणते याविषयी स्पष्टता नाही.

५. २० व्या शतकात आधुनिक विज्ञान युगात हा सिद्धांत लागू पडतो का या प्रश्नाविषयी विचार केला नाही.

वॅगनरच्या नियमावर काही मर्यादा पडत असल्या तरी या नियमाच्या साहाय्याने भूतकालीन समस्या व वर्तमानकालीन समस्या यांचा मागोवा घेऊन भविष्यकालीन आर्थिक नियोजनाचा वेध घेण्यासाठी हा नियम/सिद्धांत मार्गदर्शक व उपयुक्त ठरतो.

## ५.१० वाईजमन - पीकॉक यांचा सार्वजनिक खर्चाचा आधुनिक सिद्धांत (PUBLIC EXPENDITURE MODERN THEORY OF WISEMAN PEACOCK)

इंग्लंडमध्ये १९६१ मध्ये जॅक वाईजमन व प्रा. ॲलन पीकॉक या दोन अर्थशास्त्रज्ञांनी 'The Growth of Public Expenditure in the United Kingdom' हा ग्रंथ प्रकाशित केला. सरकारी खर्चात होणारी वाढ योग्य आहे की अयोग्य आहे हे दाखविण्यापेक्षा सरकारी खर्चात वाढ का होते याची मूलभूत कारणमीमांसा करणे किंवा त्याचे स्पष्टीकरण करणे हा त्याच्या संशोधनाचा मुख्य हेतू होता. इंग्लंडच्या बाबतीत या दोघांना हे दिसून आले की १९०१ ते १९५० या वर्षांत दरडोई ते सरकारी खर्च (स्थिर किंमतपातळी गृहीत धरता) ७ पट वाढला व राष्ट्रीय उत्पन्नातील सरकारचा खर्चाचा हिस्सा ९ टक्क्यांवरून ३७ टक्के इतका झाला.

वाईजमन-पीकॉक यांच्या मते, आर्थिक विकासामुळे कर आकारणी व सरकारी खर्च यात संथ, मर्यादित वाढ होणे राजकीयदृष्ट्या स्वागतार्ह होऊ शकेल. पण प्रत्यक्षात कर आकारणीत व सरकारी खर्चात झालेली वाढ ही संथ व मर्यादित आहे असे दिसत नाही. सरकारी खर्चासंबंधीच्या राजकीय प्रक्रियेने निर्णय घेतले जातात त्यामुळे सरकारी खर्चाकडे बघण्याची लोकांची प्रवृत्ती ज्याप्रमाणे बदलते त्यापेक्षा वेगळ्या प्रेरणांनी करपातळी किती असावी या बद्दलच्या लोकांच्या प्रवृत्ती ठरत असतात.

वाईजमन-पीकॉक यांच्या गृहीतकात (सिद्धांतात) पुढील गोष्टींचा समावेश होतो:

१. युद्ध व आर्थिक मंदी यांसारख्या सामाजिक-राजकीय संकटकाळात सरकारी खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ करणे अपरिहार्य ठरते.

२. संकटकाळातील तणावाच्या अनुभवामुळे अधिक वरची करपातळी (जादा कर आकारणी) आणीबाणीनंतर देखील मान्य होते. म्हणून सरकारच्या वाढत्या खर्चाचा मार्ग जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणे असतो.

वाईजमन-पीकॉक यांच्या मते, सामाजिक व आर्थिक किंवा राजकीय संकट परिस्थितीमुळे. सरकारी अर्थकरणावर मुख्यतः तीन प्रकारे परिणाम होतो. हे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**(अ) विस्थापन परिणाम (Displacement Effect):**

युद्ध किंवा आर्थिक मंदीसारख्या राष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थितीत सरकारला लष्करी व नागरीकरणासाठी फार मोठ्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक होते. तसे पाहता, युद्ध किंवा मंदीमुळे सरकारी खर्च वाढतो. अशा परिस्थितीत वाढलेल्या सरकारी खर्चाची पूर्तता करण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात सरकारला कर गोळा करावे लागतात. त्या परिस्थितीत अशा करवाढीला नागरिकांचा फारसा विरोधही असत नाही. युद्ध समाप्तीनंतर किंवा मंदीची अवस्था संपल्यानंतर वाढलेली करपातळी किंवा वाढलेली सरकारी खर्चाची पातळी कमी करावी असा आग्रह क्वचितच धरला जातो. म्हणजेच पूर्वीची कर व खर्चपातळी या तात्कालिक संकटांमुळे कायमची विस्थापित होते व त्याऐवजी वरची करपातळी व खर्चपातळी सामाजिकदृष्ट्या स्वीकृत होते. यालाच वाईजमन-पीकॉक "विस्थापन परिणाम" असे नाव देतात.

**(ब) केंद्रीकरण परिणाम (Concentration Effect):**

युद्ध किंवा आर्थिक मंदीसारख्या राष्ट्रीय स्वरूपाच्या संकटामुळे केंद्रीय सरकारच्या कार्याची अधिक प्रमाणात व वेगाने वाढ होते असे वाईजमन-पीकॉक यांना आढळून आले. परिणामतः कर आकारणी व सरकारी खर्च यांचा वाढता हिस्सा राष्ट्रीय सरकारच्या हातात केंद्रित होतो. म्हणजेच अशा राष्ट्रीय संकटानंतर सरकारी अर्थकरणाचे अधिक प्रमाणात केंद्रीकरण होते. या बदलास वाईजमन-पीकॉक "केंद्रीकरण परिणाम" असे नाव देतात.

**(क) अंतर्निरक्षण परिणाम (Introspection Effect):**

राष्ट्रीय संकटानंतरच्या काळात पूर्वीच्या व्यवस्थेतील अनेक दोष, विषमता असमतोल लक्षात येऊ लागतात. अनेक प्रकारच्या सामाजिक व राजकीय सुधारणा अशा

munotes.in

संकटानंतरच सहजासहजी स्वीकृत होण्यासारखी परिस्थिती निर्माण होते म्हणजेच राष्ट्रीय स्वरूपाच्या बिकट संकटाबाबत एक प्रकारचे 'सामाजिक शिक्षण' उपयुक्त ठरते. सरकारला देखील अधिक कर गोळा करण्याचे मार्ग व त्यांची कार्यक्षम व्यवस्था उपलब्ध होऊ शकते. सरकारी खर्च कार्यक्षम व सामाजिकदृष्ट्या उपकारक पद्धतीने करता येऊ शकेल याची जाणीव होते. सरकारी अर्थकरणाकडे बघण्याच्या सामाजिक प्रवृत्तीत सरकारच्या जाणिवात होणाऱ्या या बदलास वाईजमन-पीकॉक 'अंतर्निरक्षण परिणाम' असे नाव देतात.

थोडक्यात असे म्हणता येईल की, वाईजमन-पीकॉक यांच्या सरकारी खर्चासंबंधीच्या गृहीतकामुळे (सिद्धांतामुळे) सरकारी खर्च वाढण्याची कारणे शोधण्यासाठी आवश्यक ती विश्लेषण रचना उपलब्ध होते. तात्कालिक राष्ट्रीय संकटानंतर (युद्ध, मंदी इ.) विस्थापन परिणाम, केंद्रीकरण परिणाम व अंतर्निरक्षण परिणामामुळे सरकारी कार्ये व खर्च कायम स्वरूपात वाढतात असा वाईजमन-पीकॉक यांच्या गृहीतकाचा (सिद्धांताचा) अर्थ आहे.

## ५.११ सारांश (SUMMARY)

आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये सरकारकडून म्हणजेच केंद्र-राज्ये व स्थानिक सरकारे यांच्याकडून केलेला खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय. १९५१ पासून नियोजन स्वीकारल्यामुळे सरकारची विविध कार्ये वाढली म्हणून खर्च वाढत गेला याशिवाय योजनेतर खर्च सुद्धा वाढत गेला आहे. विकास व विकासेत्तर खर्चात ही वाढ होत गेली आहे. आपल्या देशात सार्वजनिक खर्च वाढण्यात लोकसंख्या, संरक्षण खर्च, शिक्षण, आरोग्य, प्रशासन खर्च, लोकशाही, कर्जावरील व्याज, किंमतवाढ इ. कारणे खर्चवाढीस जबाबदार आहेत.

सार्वजनिक खर्चातील वाढ स्पष्ट करण्यासाठी विविध सिद्धांत मांडण्यात आले. त्यात वॅगनर, वाईझमन-पिकॉक, यांचे सिद्धांत महत्त्वाचे आहेत. याशिवाय सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण विविध अर्थशास्त्रज्ञांनी केली आहेत. याव्यतिरिक्त सार्वजनिक खर्चाबाबत काही मूलभूत तत्त्वे सुचविण्यात आली.

## ५.१२ प्रश्न (QUESTIONS)

१. सार्वजनिक खर्चाचा अर्थ सांगून सार्वजनिक खर्चाची उद्दिष्ट्ये सांगा.

२. सार्वजनिक खर्चाचा व्याख्या सांगून सार्वजनिक खर्चाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३. सार्वजनिक खर्चाची तत्त्वे स्पष्ट करा.

४. सार्वजनिक खर्चाच्या वर्गीकरणाचे प्रकार सांगा.

५. सार्वजनिक खर्चाच्या वाढीची कारणे विशद करा.

६. सार्वजनिक खर्चाच्या परिणामांचा आढावा घ्या.

७. अॅडॉल्फ वॅगनर यांचा राज्याच्या कार्यातील वाढीचा नियम (सिद्धांत) स्पष्ट करा.

८. वाईजमन-पीकॉक यांचा सार्वजनिक खर्चाचा आधुनिक सिद्धांत सांगा.

*****

# ६

# सार्वजनिक कर्ज

**घटक रचना**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ सार्वजनिक कर्जाचा अर्थ आणि व्याख्या

६.३ सार्वजनिक कर्जाचे प्रकार किंवा वर्गीकरण

६.४ सार्वजनिक कर्जाची उद्दीष्ट्ये

६.५ सार्वजनिक कर्ज उभारणीचे स्त्रोत/मार्ग

६.६ सार्वजनिक कर्जाच्या वाढीची कारणे

६.७ सार्वजनिक कर्जाचे परिणाम

६.८ सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्याच्या पद्धती

६.९ देशांतर्गत कर्जाचा आणि परकीय कर्जाचा भार

६.१० सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन

६.११ सारांश

६.१२ प्रश्न

## ६.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. सार्वजनिक कर्जाचा अर्थ व व्याख्या समजावून घेणे.

२. सार्वजनिक कर्जाचे प्रकार व वर्गीकरण अभ्यासणे.

३. सार्वजनिक कर्जाची उद्दीष्ट्ये अभ्यासणे.

४. सार्वजनिक कर्ज उभारणीचे स्त्रोत/मार्ग यांचा अभ्यास करणे.

५. सार्वजनिक कर्जाच्या वाढीची कारणे समजावून घेणे.

६. सार्वजनिक कर्जाचे परिणामांचा अभ्यास करणे.

७. सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्याच्या पद्धतींचा अभ्यास करणे.

८. देशांतर्गत कर्ज व परकीय कर्जाचा भार अभ्यासणे.

९. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

अलीकडील काळात सरकारच्या कार्यात मोठया प्रमाणात वाढ झाल्याने सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे. युद्ध काळात युद्ध खर्च भागवण्यासाठी किंवा नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सरकारला उत्पन्न पेक्षा अधिक खर्च करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी सरकारला कर्ज घ्यावे लागते. देशातील नागरिक व वित्तीय संस्था यांच्याकडून घेतलेलं कर्ज म्हणजे अंतर्गत कर्ज होय. सरकार विदेशातील नागरिक, विदेशातील सरकार, व विदेशातील वित्तीय संस्थांकडून घेतलेले कर्ज म्हणजे परकीय कर्ज होय.

आधुनिक काळात सार्वजनिक कर्जाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. १९ व्या शतकात सनातनपंथीय, अर्थशास्त्रज्ञांचा सार्वजनिक कर्जाला पूर्णपणे विरोध होता. त्यांच्यामते सरकारने उत्पन्न कमी व खर्च देखील कमी करावा आणि कर्ज घेवू नये. जागतिक महामंदी दूर करणे हे सार्वजनिक खर्चामुळे शक्य झाले. सार्वजनिक खर्चात वाढ झाल्यामुळे सार्वजनिक कर्जातही वाढ होऊ लागली. आर्थिक विकासाचा दर वाढवणे, व्यापार चक्राचे निर्मूलन, मानवी कल्याण इ. साठी सार्वजनिक खर्च आवश्यक असतो. परंतू सार्वजनिक खर्चासाठी गरज पडल्यास सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

## ६.२ सार्वजनिक कर्जाचा अर्थ आणि व्याख्या (MEANING AND DEFINITION OF PUBLIC DEBT)

सार्वजनिक कर्ज सरकार दोन प्रकारे घेते:

१) देशांतर्गत कर्ज किंवा अंतर्गत कर्ज.

२) परकीय कर्ज किंवा बाह्य कर्ज.

देशांतर्गत कर्ज हे देशातील नागरिक, बँका, वित्तीय संस्था, रिझर्व्ह बँक यांच्याकडून घेतले जाते. तर परकीय कर्ज परकीय सरकार, विदेशातील वित्तीय संस्था, आंतरराष्ट्रीय संस्था यांच्याकडून घेतले जाते.

**सार्वजनिक कर्जाची व्याख्या:**

सार्वजनिक कर्जाची व्याख्या वेगवेगळ्या अर्थतज्ञांनी पुढीलप्रमाणे केली आहे:

**१) डॉ. डॉल्टन -** “सार्वजनिक सत्तेच्या उत्पन्नाचे प्रभावी साधन म्हणजे सार्वजनिक कर्ज होय.”

**२) प्रो. फिंडले शिरास -** “केंद्र सरकार स्वदेशातून किंवा परकीय देशातून जे कर्ज घेते ते सार्वजनिक कर्ज होय."

**३) प्रा. जे. के. मेहता -** “सार्वजनिक उत्पन्न अशी प्राप्ती असते की जी देणाऱ्यांना परत करावी लागत नाही. तर दुसरीकडे सार्वजनिक कर्ज असा भाग तो देणाऱ्यांना परत करावा लागतो."

**४) प्रा. टेलर -** "सरकारी कर्ज म्हणजे सरकारी तिजोरीने मूळ मुद्दल व त्यावरील व्याज देण्याबाबत दिलेले वचन होय."

## ६.३ सार्वजनिक कर्जाचे प्रकार किंवा वर्गीकरण (TYPES OF PUBLIC DEBT OR CLASSIFICATION OF PUBLIC DEBT)

सार्वजनिक कर्जाचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत:

**१) अंतर्गत कर्ज आणि परकीय कर्ज:**

सरकार देशांतील नागरिक, वित्तीय संस्था, रिझर्व्ह बँक यांच्याकडून जे कर्ज घेते त्यास अंतर्गत कर्ज म्हणतात. तर परकीय देशातील नागारिक, वित्तीय संस्था, सरकार यांच्याकडून जे कर्ज घेतले जाते त्यास परकीय कर्ज असे म्हणतात. सरकारला आर्थिक विकास, नवीन यंत्रसामुग्री, तंत्रज्ञान खरेदी, व्यवहारतोलातील तूट कमी करण्यासाठी परकीय कर्जाची आवश्यकता असते.

**२) उत्पादक कर्ज व अनुत्पादक कर्ज:**

ज्या कर्जामुळे उत्पादनात वाढ किंवा त्याचा उपयोग उत्पादक कारणासाठी केला जातो. त्या कर्जाला उत्पादक कर्ज म्हणतात. उदा. शेती, उद्योगधंदे, जलसिंचन, विद्युत निर्मिती, रेल्वे बांधणी, वाहतूक दळणवळण इ.

ज्या कर्जामुळे उत्पन्नात किंवा वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होत नाही अशा कर्जास अनुत्पादक कर्ज म्हणतात. उदा. युद्ध खर्च व प्रशासनावरील खर्च. अनुत्पादक कर्जामुळे उत्पन्नात वाढ होत नसल्यामुळे सरकारला या कर्जाची परतफेड करण्यासाठी करआकारणी करावी लागते त्याचा भार सर्वसामान्य लोकांवर पडतो.

**३) ऐच्छिक व सक्तीचे कर्ज:**

कर्जरोख्यांची विक्री करून सरकार जे कर्ज घेते त्या कर्जास ऐच्छिक कर्ज म्हणतात. जेव्हा सरकार कर्जरोखे विक्रीला काढते तेव्हा देशातील नागरिक, बँका ते कर्जरोखे स्वेच्छेने खरेदी करतात. परंतू आणिबाणीच्या किंवा युद्धाच्या परिस्थितीत, नैसर्गिक आपत्ती काळात सरकार लोकांकडून सक्तीने कर्ज घेते. त्या कर्जास सक्तीचे कर्ज म्हणतात.

**४) अल्पकालीन, मध्यकालीन व दिर्घकालीन कर्ज:**

ज्या सार्वजनिक कर्जाची परतफेड १ वर्षाच्या आत केली जाते. ते अल्पमुदतीचे सार्वजनिक कर्ज असते. ज्या सार्वजनिक कर्जाची परतफेड १ वर्ष ते ५ वर्ष या मुदतीत केली जाते ते मध्यमुदतीचे कर्ज असते आणि ज्या कर्जाची परतफेड ५ वर्षापेक्षा अधिक काळाने केली जाते त्याला दिर्घमुदतीचे कर्ज म्हणतात.

**५) शोध्य व अशोध्य कर्ज:**

सरकारने भविष्यकाळातील एका निश्चित तारीख किंवा दिवसाला कर्जाची परतफेड करण्याचे मान्य करून कर्ज घेतले असेल तर त्याला शोध्य कर्ज म्हणतात. शोध्य कर्जालाच

munotes.in

निश्चित काळासाठी घेतलेले कर्ज असेही म्हणतात. याउलट कर्जाच्या परतफेडीबाबत निश्चित काळ ठरलेला नसेल तर ते अशोध्य कर्ज होय.

**६) विक्रेय व अविक्रेय कर्ज:**

ज्या कर्जरोख्यांची खुल्या पद्धतीने खरेदी विक्री होत असते त्या सार्वजनिक कर्जास विक्रेय सार्वजनिक कर्ज म्हणतात. ज्या सरकारी कर्जरोख्यांची खुल्या पद्धतीने खरेदी विक्री होत नसेल तर त्या सार्वजनिक कर्जाला अविक्रेय सार्वजनिक कर्ज असे म्हणतात.

**७) निधिक व प्रवाही सार्वजनिक कर्ज:**

देशामध्ये विविध प्रकल्पांवर सरकारला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो या कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकार विशिष्ट निधीची स्थापना करते. या निधीत त्या प्रकल्प किंवा कर उत्पन्नातून मिळालेली रक्कम जमा केली जाते. अशारितीने कर्जाची परतफेड करण्याची व्यवस्था केली जाते त्या कर्जास निधिक कर्ज म्हणतात. याउलट प्रवाही कर्ज अल्पमुदतीचे असते सरकार चालू खर्च भागविण्यासाठी हे कर्ज घेत असते. मुदत संपल्यानंतरही सरकार या कर्जाची मुदत वाढवू शकते. या कर्जास प्रवाही कर्ज म्हणतात.

**८) सक्रिय व निष्क्रीय कर्ज:**

देशाच्या उत्पादकतेत ज्या कर्जामुळे वाढ होत असते त्या कर्जास सक्रिय कर्ज म्हणतात. ज्या कर्जामुळे उत्पादनात किंवा उत्पन्नात वृद्धी होत नसून लोकांना आनंद व उपयोगिता मिळत असते अशा कर्जास निष्क्रिय कर्ज म्हणतात. उदा. सार्वजनिक बाग बगिचे, प्राणी संग्रहालय, वस्तुसंग्रहालय, पर्यटन केंद्रे इ.

## ६.४ सार्वजनिक कर्जाची उद्दीष्ट्ये (OBJECTIVES OF PUBLIC DEBT)

१) जगामधील अनेक देशामध्ये कल्याणकारी राज्याचा स्विकार केला असल्यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त केला जातो. कर किंवा उत्पन्नाच्या इतर साधनापासून हा खर्च भरून काढणे शक्य नाही. अशावेळेला सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते म्हणून अंदाजपत्रकातील तूट भरून काढणे हे सार्वजनिक कर्जामागील उद्दिष्ट असते.

२) अर्थव्यवस्थेत व्यापारचक्र येत असते. मंदीच्या परिस्थितीत रोजगारातील घटीमुळे उत्पन्नात, मागणीत, उत्पादनात घट होते. मागणीतील वाढीसाठी लोकांच्या हातामध्ये उत्पन्न असणे आवश्यक असते अशा वेळेस विविध प्रकल्प,रोजगार योजना, स्वयंरोजगारासाठी कर्जपूरवठा करून अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढता येते. हा खर्च करण्यासाठी सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

३) देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी शासनाला मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. हा खर्च करण्यासाठी सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते. देशात नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, भूकंप, चक्रीवादळ, साथीचे रोग यासारख्या

आपत्तीचे निवारण करण्यासाठी सरकारला खर्च करावा लागतो. हा खर्च भागविण्यासाठी सरकारला सार्वजनिक कर्ज उभारावे लागते.

४) अविकसित व विकसनशील राष्ट्रामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती व मानवी साधनसंपत्ती न वापरता पडून आहे. या साधनसंपत्तीचा वापर करून उत्पादनवाढीसाठी सरकारला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

५) आर्थिक विकास करणे हे सार्वजनिक कर्जाचे उद्दीष्ट असते. आर्थिक विकास करण्यासाठी सरकारला पायाभूत संरचनेच्या सोयींचा विकास करावा लागतो, म्हणून सार्वजनिक कर्जाद्वारे आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

६) सरकार नव्याने कर्ज घेते आणि जुन्या कर्जाची परतफेड करते अशारितीने या कर्जामागे जुन्या कर्जाची परतफेड करणे हा एक उद्देश असतो.

७) एखाद्या देशात दारिद्र्य जेवढे जास्त तेवढा आर्थिक विकासाचा दर कमी असतो. म्हणून शासनाकडून दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सार्वजनिक कर्ज घेतले जाते.

## ६.५ सार्वजनिक कर्ज उभारणीचे स्रोत/मार्ग (SOURCES OF PUBLIC DEBT)

**अ) अंतर्गत कर्जाचे मार्ग:**

सरकार देशांतील नागरिक, वित्तीय संस्था, रिझर्व्ह बँक यांच्याकडून जे कर्ज घेते त्यास अंतर्गत कर्ज म्हणतात.

१. कोणत्याही देशातील लोक जी बचत करतात त्या बचतीतून सरकारला अंतर्गत कर्ज प्राप्त करता येते. सरकार बचतीतून कर्ज उभारते उदा. पोष्टातील बचत खाते, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, किसान विकास पत्रे, भविष्यनिर्वाह निधी इ. द्वारे सरकार अंतर्गत कर्ज उभारत असते.

२. व्यापारी बँकेचे ठेवी स्विकारणे व कर्ज देणे हे मुख्य कार्य आहे, व्यापारी बँका ज्याप्रमाणे ठेवीदारांना कर्जपूरवठा करतात त्याचप्रमाणे सरकारलाही कर्जपुरवठा करतात. व्यापारी बँका सरकारी कर्जरोख्यांची खरेदी करून सरकारला कर्जपुरवठा करीत असतात.

३. भारतीय आयुविमा महामंडळ, गुंतवणूक संस्था, बचत संस्था, युटीआय, म्युच्युअल फंड, फायनान्स कंपन्या इ. संस्था सरकारी कर्जरोख्यांची खरेदी करतात. सरकारी कर्जरोख्यांमध्ये विश्वसनियता, रोखता व वेळेवर पैसे मिळण्याची हमी असते. म्हणून बँकेतर वित्तीय संस्था सरकारी कर्जरोख्यांमध्ये आपले पैसे गुंतवतात.

४. कोणत्याही देशाची मध्यवर्ती बँक ज्याप्रमाणे व्यापारी बँकांची बँक म्हणून कार्य करते त्याचप्रमाणे सरकारची बँक म्हणून कार्य करते. सरकारचे अंदाजपत्रक जेव्हा तूटीचे असते किंवा सरकारचा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असतो तेव्हा सरकार मध्यवर्ती

munotes.in

बँकेकडून कर्ज घेते. तसेच सरकारी कर्जरोख्यांची मध्यवर्ती बँकेला विक्री करून कर्ज घेतले जाते.

**ब) बर्हिगत कर्जाचे मार्ग:**

सरकारने परकीय देशातून कर्ज घेतल्यास त्याला बर्हिगत कर्ज किंवा बाह्य कर्ज म्हणतात.

१. परकीय नागरिकांकडून सरकार परकीय कर्ज घेते. सरकारी रोख्यांची विक्री परकीय देशातील नागरिकांना केली जाते आणि परकीय कर्जाची उभारणी केली जाते.

२. परकीय सरकारकडून कोणत्याही देशातील स्थानिक सरकारला कर्जाची गरज भासल्यास कर्ज घेत असते. व्यवहारतोलात तूट दूर करण्यासाठी परकीय चलनाची गरज भासल्यास किंवा विदेशी तंत्रज्ञान, शोध, संशोधन प्राप्त करण्यासाठी परकीय सरकारकडून कर्ज घेतले जाते.

३. जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, आंतरराष्ट्रीय विकास संघटना, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था इ. संस्थांकडून जगातील अनेक देशांना कर्जपुरवठा केला जातो. वाहतूक, दळणवळण, पिण्याचे पाणी, विजनिर्मिती, आरोग्यविषयक योजना ग्रामीण विकास, इ. कारणासाठी या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था कर्जपुरवठा करतात.

## ६.६ सार्वजनिक कर्जाच्या वाढीची कारणे (CAUSES OF INCREASING OF PUBLIC DEBT)

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगातील अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली त्यातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी कल्याणकारी राज्याचा स्विकार केला. त्यामुळे या राष्ट्रांच्या सार्वजनिक खर्चात प्रचंड प्रमाणावर वाढ झाली. सार्वजनिक खर्चाच्या मानाने सार्वजनिक उत्पन्न कमी असल्यामुळे या राष्ट्रांना कर्ज घ्यावे लागले व त्यामुळे सार्वजनिक कर्जात वाढ झाली याचप्रमाणे सार्वजनिक कर्जाच्या वाढीस पुढील कारणे जबाबदार असतात.

**१) आर्थिक विकास:**

आर्थिक व सामाजिक विकासासाठी नियोजन काळात मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला. आर्थिक विकासासाठी देशात शोध, संशोधन, नवीन तंत्रज्ञान,अवजड उद्योगांची उभारणी, जलसिंचन, वाहतूक सुधारणा, आरोग्य व शिक्षण, नैसर्गिक साधनसंपत्ती व मानवी साधनसंपत्तीचा पर्याप्त व कार्यक्षम वापर करणे हे मार्ग असतात परंतू त्यासाठी भांडवलाची गरज असते एवढे भांडवल देशाजवळ नसेल तर कर्ज घ्यावे लागते त्यातून सार्वजनिक कर्जात वाढ होते.

**२. युद्ध व संरक्षण खर्च:**

देशात अंतर्गत शांतता व सुव्यवस्था व परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य असते त्यासाठी शासनाला पोलिसदल, सैन्यदल, युद्ध साहित्य, शस्त्रास्त्र

निर्मिती यावर मोठा खर्च करावा लागतो. अशारितीने युद्ध सुरू असतांना किंवा युद्धकालीन खर्च करण्यासाठी बऱ्याचवेळा सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

### ३. अंदाजपत्रकीय तूट:

सार्वजनिक उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल आणि हा खर्च कर किंवा उत्पन्नाच्या इतर स्त्रोतांद्वारे भरून काढणे शक्य नसेल तर अंदाजपत्रकातील तूट सार्वजनिक कर्ज घेऊन भरून काढली जाते अशारितीने तुटीच्या अंदाजपत्रकामुळेही सार्वजनिक कर्जात वाढ होत जाते.

### ४. किंमत वाढ:

सर्वसामान्य जनतेच्या वस्तू खरेदीवर वाढत्या किंमत पातळीचा परिणाम होत असतो. शासनाला अनेक वस्तू व सेवांची खरेदीसाठी खर्च करावा लागतो. विविध प्रकल्प व योजनांवर खर्च करावा लागतो. हा खर्च करण्यासाठी सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

### ५. नैसर्गिक आपत्ती:

चक्रीवादळ, महापूर, रोगराई, दुष्काळ, अपघात यामुळे देशातील लोकांना नुकसान सहन करावे लागते. या लोकांना शासनाकडून नुकसान भरपाई दिली जाते. त्यामुळे शासनाच्या खर्चात वाढ होऊन सरकारी सार्वजनिक कर्जात वाढ होते.

### ६. कर्जाची परतफेड:

अनेक राष्ट्रासमोर प्रश्न निर्माण होतो की, घेतलेले कर्ज कसे फेडावे त्यासाठी शासनाजवळ पैसा नसतो. देशांतर्गत किंवा परकीय कर्ज असो शासनासमोर हा प्रश्न निर्माण होतो. कर्ज वेळेवर फेडण्यासाठी सरकार नव्यान कर्ज घेते आणि नव्या कर्जातून जुन्या कर्जाची परतफेड करते. अशारितीने सार्वजनिक कर्जात वाढ होते.

### ७. राष्ट्रीय उत्पन्न:

देशातील राष्ट्रीय उत्पन्नावरच आर्थिक विकास अवलंबून असतो. देशातील राष्ट्रीय उत्पन्न जेवढे जास्त तेवढे उत्पन्न जास्त याउलट राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्यास सरकारला उत्पन्न कमी मिळते त्यामुळे सरकारला विविध प्रकारचे कर आकारून उत्पन्न मिळवावे. परंतू राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी असल्यास करआकारणीला मर्यादा येऊन पुरेसे उत्पन्न प्राप्त होत नाही. आणि शासनाला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

### ७) लोकांची बचत करण्याची क्षमता:

देशातील लोकांची बचत क्षमता कमी असेल तर भांडवल गुंतवणूकही कमी राहते व पर्यायाने उत्पादनात व रोजगारात घट होऊन लोकांचे उत्पन्न कमी राहते. लोकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे सरकारला कर कमी मिळतो. त्यामुळे शासनाला सार्वजनिक कर्ज घ्यावे लागते.

munotes.in

### ८) सामाजिक सोई व सुविधा:

आधुनिक काळात अनेक देशातील सरकारने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे. लोकांचे कल्याण करण्यासाठी सरकारला शिक्षण, आरोग्य,दवाखाने, मोफत औषधोपचार, सार्वजनिक उद्याने, ग्रंथालये,इ.साठी प्रचंड खर्च करावा लागतो. तो खर्च करण्यासाठी कर्ज काढावे लागते.

### ९) मंदीचे निर्मुलन:

मंदीच्या काळात सरकार रस्ते, घरबांधणी, कारखाने इ.साठी सरकारी खर्च मोठ्या प्रमाणात करते.त्यामुळे लोकांना रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढते.त्यांची खरेदी शक्ती वाढून प्रभावी मागणी वाढते. यामुळे सरकारला सार्वजनिक खर्च करण्यासाठी कर्ज काढावे लागते.

### १०) उत्पादक गुंतवणूक:

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी नियोजनाचा वापर केला जातो. रस्ते, रेल्वे, तार, टेलिफोन, दळणवळण, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, इ. पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी सरकारला मोठा खर्च करावा लागतो. त्यासाठी कर्ज उभारणी करावी लागते.

## ६.७ सार्वजनिक कर्जाचे परिणाम (EFFECTS OF PUBLIC DEBT)

### १. उत्पादनावरील परिणाम:

सरकारने सार्वजनिक कर्जाची रक्कम उत्पादक व विकास कार्यासाठी खर्च केल्यास लोकांची काम, बचत व गुंतवणूक करण्याची क्षमता वाढते.सरकारने कर्जाची रक्कम अशा प्रकारे खर्च केल्यास त्यामुळे गरिबांच्या उत्पन्नात वाढ झाली तर त्यांची कार्यक्षमता वाढून उत्पादन वाढेल. रेल्वे, वाहतूक, वीज, जलसिंचन, धरण प्रकल्प इ. वरील खर्चामुळे साधन सामुग्रीचा कार्यक्षमतेने वापर होऊन अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेत वाढ होईल.अशा प्रकारे सरकारने सार्वजनिक कर्ज विकास प्रकल्प निर्माण करण्यासाठी खर्च केले तर उत्पादकता वाढण्यास मदत होते. मात्र कर्जफेडीसाठी करआकारणी केली तर उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो.

### २. उपभोगावरील परिणाम:

सरकारने सार्वजनिक कर्ज हे जर रेल्वे, वाहतूक, वीज, जलसिंचन, धरण प्रकल्प इ. सार्वजनिक कामासाठी वापरले तर त्याचा लाभ ज्यांना मिळेल त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचा उपभोग वाढेल.तसेच सरकारने सार्वजनिक कर्जाचा वापर वस्तूंच्या उत्पादनासाठी केला तर त्यांचा उपभोग वाढेल. जर लोकांनी आपल्याकडील पूर्वीच्या उत्पन्नातून सरकारी कर्जरोखे विकत घेतले तर त्यांच्या उपभोगात घट होत नाही कारण या कर्ज रोख्यांच्या खरेदीमुळे चालू खर्चावर परिणाम होत नाही मात्र जर लोकांनी आपला चालू खर्च कमी करून कर्ज रोख्यांच्या खरेदी केली तर त्यांच्या उपभोगात घट होईल.

**३. विभाजनावरील परिणाम:**

सरकारने सार्वजनिक कर्ज कोणत्या कारणासाठी खर्च करण्यात आले याच्यावर उत्पन्नाच्या विभाजनावर होणारा सार्वजनिक कर्जाचा परिणाम अवलंबून असतो.जर सरकारने सार्वजनिक कर्ज कमी उत्पन्न गटातील लोकांना फायदेशीर असलेल्या सामाजिक सुरक्षितता, सामाजिक कामे, विकास योजना यासाठी खर्च केले, तर सार्वजनिक कर्ज उत्पन्नातील विषमता कमी करण्यास मदत करते.

**४. रोखतेवरील परिणाम:**

समाज्यातील लोक सरकारी कर्जरोखे विकत घेतात ते तरल स्वरुपाची मालमत्ता धरण करतात. सरकारी रोख्यांमध्ये रोखता मोठया प्रमाणात असते. भाववाढीच्या काळात कोणत्याही देशाची मध्यवर्ती बँक खुल्या बाजारातील व्यवहार आणि इतर साधनांचा वापर करून व्यापारी बँकांची पतपैसा निर्माण करण्याची क्षमता नियंत्रित करत असतात.

**५. गुंतवणुकीवरील परिणाम:**

देशातील व्यापारी बँका किंवा मध्यवर्ती बँक यांच्याकडून सरकारने कर्ज घेतले तर गुंतवणुकीच्या निधीत घट होत नाही. सरकाच्या अशा कर्जामुळे समाजातील खरेदीशक्तीत भर पडते. मात्र बँकांनी अतिरिक्त राखीव निधी नसताना कर्जरोखे खरेदी केल्यास, तर त्याचा प्रतिकूल परिणाम गुंतवणुकीवर होत असतो.

**६. खाजगी क्षेत्रावरील परिणाम:**

वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होऊन खाजगी क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी सरकार सार्वजनिक कर्जाचा वापर खाजगी क्षेत्राकडून वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी करते. जर सरकारने सार्वजनिक कर्जाचा वापर खाजगी क्षेत्रातील उद्योगांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी केला तरत्यांचा विकास होण्यास मदत होते.

**७. परकीय कर्जाचे परिणाम:**

कोणत्याही देशातील सरकार परकीय देशातील व्यक्ती,वित्तीय संस्था व सरकार यांच्याकडून कर्ज घेत असते. त्यामुळे विकसनशील देशात अवजड यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान आयात करता येते.त्यामुळे अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढून परकीय कर्जाचा उपभोग व गुंतवणूक यावर अनुकूल परिणाम होतो.परकीय वस्तूंच्या आयातीमुळे लोकांच्या राहणीमानात सुधारणा होते.

**८. राष्ट्रीय उत्पन्नावरील परिणाम:**

सरकारी रोख्यांची विक्री मध्यवर्ती बँकेला केल्यास आणि व्यापारी बँकांची पतनिर्मिती वाढवली तर गुंतवणूक वाढून उत्पादनात वाढ होते.त्याचा अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

munotes.in

## ६.८ सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्याच्या पद्धती

सार्वजनिक कर्जाच्या परतफेडीसाठी सरकार पुढील मार्गांचा वापर करू शकते:

**१. भांडवली कर:**

सरकार सार्वजनिक कर्जाच्या परतफेडीसाठी भांडवलावर कर आकारते. युद्धजन्य परिस्थितीत किंवा विकास कार्यात कारखानदार व व्यापारी यादोघांना मोठा फायदा होतो. हे भांडवल उद्योगात किंवा व्यापारात गुंतविल्यामुळे लोकांची करदेय क्षमता वाढते. अशा करामुळे श्रीमंत लोकांच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होत नाही.

**२. कर्जफेड निधी:**

सरकार सार्वजनिक कर्जाच्या परतफेडीसाठी कर उत्पन्न किंवा कर्जातून उभारलेल्या प्रकल्पाच्या फायद्याचा काही भाग स्वतंत्र निधीमध्ये जमा करून मुदत पूर्ण होताच अशा निधीतून कर्जाची परतफेड केली जाते. परंतु काही वेळेस अशा निधीचा वापर सरकार चालू खर्चासाठी करण्याचीही शक्यता असते.

**३. कर्जाचे परिवर्तन:**

सरकारनला जुने कर्ज घेतले असेल त्याचे नवीन कर्जात रुपांतर करून कर्जाची परतफेड करणे शक्य होते. जुन्या कर्जाची परतफेड न करता कर्जरोखे धारकांना सरकार नवे कर्जरोखे नव्या मुदतीसाठी व काहीशा जादा व्याजदराने देते तेव्हा कर्जाचे परिवर्तन केले असे म्हणतात.

**४. अनुक्रमे रोखे फेड:**

सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकार प्रत्येक कर्जरोख्याला अनुक्रम नंबर देते व कमी अनुक्रम नंबरच्या कर्जरोख्यांची परतफेड प्रथम या तत्त्वानुसार सार्वजनिक कर्ज परत केले जाते तेव्हा त्यास अनुक्रमे रोखे फेड म्हणतात.

**५. कर्ज खरेदी:**

सरकारच्या महसुली अंदाजपत्रकात शिल्लक असते तेव्हा सरकार त्या शिलकीच्या आधारे लोकांकडील काही कर्जरोखे विकत घेते व सार्वजनिक कर्जाचे प्रमाण कमी होते. या परतफेड पद्धतीस कर्जखरेदी असे नाव दिले जाते.

**६. परकीय चलन साठ्याचा वापर:**

निर्यात जास्त व आयात कमी असते त्यावेळी आंतरराष्ट्रीय व्यापारात देशाला फायदा होतो. तेव्हा सरकारजवळचा परकीय चलनाचा साठा वाढल्याने सरकार परकीय कर्जाची परतफेड करते.

**७. कर्ज नाकारणे:**

सार्वजनिक अंतर्गत कर्ज व विशेषतः बाह्य किंवा परकीय कर्जाची परतफेड करण्याचा हा अतिरेकी व क्वचितच वापरला जाणारा प्रकार म्हणजे कर्ज परत करण्यास नकार देणे.

## ६.९ देशांतर्गत कर्जाचा आणि परकीय कर्जाचा भार (BURDEN OF INTERNAL AND EXTERNAL DEBT)

सार्वजनिक कर्जाचे देशांतर्गत कर्ज आणि परकीय कर्ज असे दोन भागात वर्गीकरण केलेले असल्यामुळे देशांतर्गत कर्जाचा भार आणि परकीय कर्जाचा भार यांचा वेगळा विचार करणे आवश्यक असते.

**देशांतर्गत कर्जाचा भार:**

जर सरकारने उत्पादक कारणासाठी घेतलेले कर्ज हे अनुउत्पादक कारणासाठी वापरले तर त्यातून उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार वाढणार नाही.आर्थिक नियोजन काळात योजनेत्तर खर्च वाढल्यामुळे महसुली अंदाजपत्रकात तुट निर्माण होते. ही तुट भरून काढण्यासाठी भांडवली प्राप्तीचा म्हणजेच कर्जाचा वापर केला जातो. अशा परिस्थितीतउत्पादक कर्जे ही अनुउत्पादकतेकडे जातात.जुनी कर्जे व व्याज भरण्यासाठी नवीन कर्जे काढावी लागतात.

सार्वजनिक कर्जामुळे अप्रत्यक्ष प्रभाव उत्पन्न विषमत्तेवर पडतो.कारण सरकारने रिझर्व्ह बँक किंवा बँका व वित्तीय संस्थाकडून कर्ज घेतले तर पैशाची संख्या वाढून पतपैशाचा विस्तार होतो. मागणीत वाढ होऊन किंमती वाढू लागतात. याचा फायदा व्यापारी व उद्योजक यांना जास्त होतो.

सार्वजनिक कर्जामुळे किंमत पातळी वाढते. कर्जामुळे पैशाचे प्रमाण वाढून पैशाचे मुल्य होऊन खरेदीशक्ती कमी होते. लोकांकडील उत्पन्न वाढल्यामुळे मागणीत वाढ होऊन भाववाढ निर्माण होते.

सरकारला आपल्या वाढत्या खर्चासाठी अंदाजपत्रक धोरणात बदल करावा लागतो. वाढता खर्च नियंत्रित करण्यासाठी कराचे दर वाढवणे,कर सवलतीत बदल करणे,विकास खर्च कमी करणे चलनविषयक आणि वित्तीय धोरणात बदल करणे या उपायांचा वापर करावा लागतो. परिणामी भाववाढ नियंत्रित न झाल्यामुळे सार्वजनिक कर्जाचा भार वाढतो.

**परकीय कर्जाचा भार:**

विदेशातून घेतलेल्या कर्जामुळे विदेशातील वित्तीय प्रवाह आपल्या देशात येतो आणि कर्ज व त्यावरील व्याज दिल्याने हा प्रवाह परत विदेशात जातो. त्याच प्रमाणे विदेशी कर्जाचा भार कसा पडेल हे विदेशी कर्जाचा आकार, स्वरूप आणि वापर यावर अवलंबून असतो. जर आपण या कर्जाचा वापर जीवनाश्यक वस्तू , तंत्रज्ञान, औषधी व भांडवली वस्तू , इ. च्या आयातीसाठी वापरले तर विदेशी भार कमी पडेल. परंतु जर आपण अनावश्यक आयातीसाठी या कर्जाचा वापर केला तर विदेशी कर्जाचा भार वाढेल. विदेशी कर्जाचा भार हा कर्जावरील व्याज व परतफेड, निर्यात क्षमता व उत्पादन क्षमतेत वाढ किंवा घट यावर अवलंबून असतो.

परकीय कर्ज उत्पादक कारणासाठी घेतले तर त्यातून उत्पादन, उत्पन्न व रोजगार यामध्ये वाढ होते व वाढलेल्या उत्पादनातून निर्यात वाढून परकीय चलन मिळेल व कर्जाची

परतफेड करता येईल. परकीय कर्ज जर युद्धासारख्या अनुत्पादक कारणासाठी घेतले तर त्याचा भार जास्त पडतो. अशा कर्जाची परतफेड करण्यासाठी निर्यात वाढ करणे आवश्यक आहे. परंतू निर्यात जास्त झाली तर देशातील मागणीपेक्षा पूरवठा कमी होऊन किंमतपातळीत वाढ होईल. जर सरकारने विकास कामासाठी घेतलेले कर्ज जर अनावश्यक कामांसाठी वापरले तर सार्वजनिक कर्जाचा अपव्यय होतो. विदेशी कर्जातून जर निर्यातदारांना प्रोत्साहन केले परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही तर कर्जाचा भार वाढतो.

परकीय कर्जाची परतफेड ही परकीय चलनात करावी लागते त्यासाठी आपल्याकडे तेवढे परकीय चलन देशाजवळ असावे लागते. परकीय चलन नसेल तर आंतरराष्ट्रीय संस्थांकडून कर्ज घ्यावे लागेल. त्यामुळे विदेशी कर्जाचा भार मोठया प्रमाणात पडतो.

## ६.१० सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन (PUBLIC DEBT MANAGEMENT)

कोणत्याही देशात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास सार्वजनिक कर्जाचा वापर केला जातो. पण युद्ध समाप्तीनंतर त्या देशातील सरकारची जबाबदारी वाढत जाते. पण अशा प्रकारच्या सार्वजनिक कर्जामुळे आर्थिक नियमन व नियंत्रणाचे साधन शासनाला मिळते. या प्रकारच्या साधनाचा वापर व जबाबदारी यांचा मेळ म्हणजे कर्ज व्यवस्थापन होय. दरम्यान काळात सरकारला कोणत्या वेळी, कोणते धोरण योग्य की अयोग्य याचा विचार करावा लागतो.

**सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचे धोरणाची तीन पैलू:**

१. सार्वजनिक कर्जाची उभारणी कमीत कमी खर्चात करावी.

२. व्याजदराचा परिणाम दीर्घकालीन कर्जावर होणार नाही याची दक्षता घेणे.

३. देशातील चलनामध्ये आर्थिक स्थैर्य धोरण निर्माण करून पूरक धोरणाची आखणी करणे.

उत्पादक कारणासाठी सार्वजनिक कर्ज घेतल्यास वाढलेल्या उत्पादनातून या कर्जाची परतफेड करता येते.परंतु युद्ध सारख्या अनुउत्पादक कारणांसाठी सार्वजनिक कर्ज घेतल्यास देशातील लोकांना जादा करआकारणी केल्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे गरज असेल तरच अशा प्रकारच्या कर्जाचा वापर सरकारने करावा. कारण जादा कर आकरणी केली असता त्याचा परिणाम उत्पादक व क्रियाशील लोकांवर पडतो. लोकांच्या काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छा व क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

**सार्वजनिक कर्ज व्यवस्थापनाचे उद्देश:**

१. सार्वजनिक कर्जाच्या व्याजाचे ओझे टाळण्याकरिता रोख्याचा व्याजाचा दर कमीत कमी असावा.

२. व्याजदर असा कमी करणे की ज्यामुळे तो दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीला पोषक ठरेल.

३. कर्जरोख्यांची मालकी निर्माण करताना वितरण, उत्पादन या धोरणांना अनुसरून असावी.

४. पूर्ण रोजगार हे उद्दिष्ट साध्य करणे.

५. व्याजाची रक्कम आर्थिक दृष्ट्या श्रीमंत लोकांच्या हाती जाते का ते पाहणे गरजेचे आहे.

६. सार्वजनिक कर्जाची मर्यादा पाळणे अन्यथा त्यामुळे भाववाढ निर्माण होऊ शकते.

७. सार्वजनिक कर्जाचा वापर उत्पादक कामासाठी केला जावा.

८. सार्वजनिक कर्जाची परतफेड वेळेवर व मुदतीमध्ये केली जावी .

९. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन करण्यासाठी दक्ष व कार्यक्षम अधिकाऱ्याची गरज असते.

१०. सार्वजनिक कर्जाचा वापर हा आर्थिक विकास व आर्थिक धोरणाची पूर्तता करण्यासाठी करता येतो.

## ६.११ सारांश (SUMMARY)

सदर प्रकरणामध्ये सार्वजनिक कर्जाचे प्रकार, उद्दिष्टे, स्त्रोत व वर्गीकरण, सार्वजनिक कर्जाची करणे व परिणाम, सार्वजनिक कर्जाचा भार, कर्ज व्यवस्थापनाची व परतफेडीची तत्वे यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## ६.१२ प्रश्न (QUESTIONS)

१. सार्वजनिक कर्जाचा अर्थ सांगून सार्वजनिक कर्जाचे प्रकार स्पष्ट करा.

२. सार्वजनिक कर्जाची व्याख्या सांगून सार्वजनिक कर्जाची उद्दीष्ट्ये सांगा.

३. सार्वजनिक कर्ज उभारणीचे स्त्रोत/मार्ग सांगा.

४. सार्वजनिक कर्जाच्या वाढीची कारणे विशद करा.

५. सार्वजनिक कर्जाचे विविध परिणाम स्पष्ट करा.

६. सार्वजनिक कर्जाची परतफेड करण्याच्या पद्धती सांगा.

७. देशांतर्गत कर्जाचा आणि परकीय कर्जाचा भार यावर टीप लिहा.

८. सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन यावर थोडक्यात माहिती लिहा.

*****

प्रकरण ४

# ७

# राजकोषीय धोरण

**घटक रचना**

७.० उद्दिष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ राज्यवित्तीय धोरणाची व्याख्या
७.३ राज्यवित्तीय धोरणाची उद्दीष्ट्ये
७.४ राज्यवित्तीय धोरणाची साधने
७.५ राज्यवित्तीय धोरणाच्या मर्यादा
७.६ सार्वजनिक अंदाजपत्रक: अर्थ व व्याख्या
७.७ अंदाजपत्रकांचे प्रकार
७.८ अंदाजपत्रकीय धोरणाचे महत्त्व
७.९ तुटीचे अंदाजपत्रक विषयक काही संकल्पना
७.१० तुटीचा अर्थभरणा
७.११ सारांश
७.१२ प्रश्न

## ७.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. राज्यवित्तीय धोरणाची व्याख्या समजावून घेणे.

२. राज्यवित्तीय धोरणाच्या उद्दीष्टांचा अभ्यास करणे.

३. राज्यवित्तीय धोरणासाठी वापरण्यात आलेल्या साधनांचा अभ्यास करणे.

४. राज्य वित्तीय धोरणांच्या मर्यादा अभ्यासणे.

५. सार्वजनिक अंदाजपत्रकाचा अर्थ, व्याख्या, प्रकार यांचा अभ्यास करणे.

६. तुटीचा अर्थभरणा म्हणजे काय याचा सविस्तर अभ्यास करणे.

## ७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

राजकोषिय धोरण सार्वजनिक आयव्यय धोरणाचा एक अविभाज्य भाग समजला जातो. राज्यवित्तीय धोरणालाच राजकोषिय धोरण असेही म्हणतात. अर्थव्यवस्थेचे कार्य सुरळीत सुरू राहण्याच्या दृष्टीने राज्यवित्तीय धोरणाला महत्त्वाचे स्थान असते. राज्यवित्तीय

धोरणाला हे महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देण्यात लॉर्ड जे.एम. केन्सचा यांचा सिहांचा वाटा आहे. अर्थव्यवस्थेचे कार्य सुरळीतपणे चालू राहण्याच्या दृष्टीने राजकोषीय धोरणाला जागतिक आर्थिक महामंदीनंतरच्या काळात फार मोठे महत्त्व प्राप्त झाले.

## ७.२ राज्यवित्तीय धोरणाची व्याख्या (DEFINITION OF FISCAL POLICY)

राज्यवित्तीय धोरणाची व्याख्या विविध तज्ञांनी पुढीलप्रमाणे केली आहे:

**१) आर्थर स्मिथीज:**

"राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगार यावर सरकार आपल्या उत्पन्न व खर्चाच्याद्वारे अपेक्षित परिणाम घडवून आणणाऱ्या धोरणाला राज्यवित्तीय धोरण म्हणतात".

**२) के. ई. बोल्डींग:**

"पैसे देणे आणि पैसे घेणे यांच्याशी स्थूलमानाने संबंधित अशा सरकारी कृतीचा समावेश ज्यात असतो त्यास राज्यवित्तीय धोरण असे म्हणतात."

**३) प्रा. सॅम्युअल्सन:**

सकारात्मक राजकोषिय निती म्हणजे करारोपण व सार्वजनिक खर्च यांना रूप देण्याची अशी प्रक्रिया की ज्यांच्याद्वारे व्यापार चक्राचे चढ उतार कमी करण्यास मदत होईल. तसेच पूरोगामी उच्च रोजगार पातळीअसलेल्या अर्थव्यवस्थेला भाववाढ आणि भावघट राजकोषिय धोरण म्हणतात.

## ७.३ राज्यवित्तीय धोरणाची उद्दीष्ट्ये (OBJECTIVES OF FISCAL POLICY)

राज्यवित्तीय धोरणाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे:

१. राज्यवित्तीय धोरणाचे आर्थिक स्थैर्य निर्माण करणे हे प्रमुख उद्दीष्ट असते. अर्थव्यवस्थेतील वाढत्या किंमती किंवा टत्या किंमती विविध घटकांवर विपरीत परिणाम करतात. किंमती सातत्याने वाढत असतील तर राज्यवित्तीय धोरणाद्वारे करांच्या दरात वाढ व सार्वजनिक खर्च कमी आणि कर्ज रोख्यांची विक्री केली जाते याउलट किंमती घटत असतील तर करांचे दर कमी व सार्वजनिक खर्चात वाढ केली जाते.

२. आर्थिक विषमता अर्थव्यवस्थेच्या प्रचंड त्रासदायक असते. म्हणून उत्पन्नाचे व संपत्तीचे समान वाटप करून आर्थिक विषमता कमी करणे आवश्यक असते. राज्यवित्तीय धोरणाद्वारे प्रगतीशील स्वरूपाची कर आकारणी करून ज्यांच्याकडे उत्पन्न जास्त असेल त्यांच्याकडील उत्पन्न करांद्वारे काढून मिळालेल्या उत्पन्नाचा वापर गरीबांच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी केला जातो त्यांना रोजगार व व्यवसाय उभारणीसाठी अनुदान व कर्जपूरवठा केला जातो.

३. राज्यकोषीय धोरणाचे प्रादेशिक विषमता कमी करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सर्व राज्यांच्या एकत्रित विकासातून संपूर्ण देशाचा विकास होत असतो. राज्यकोषीय धोरणाद्वारे देशाचा मागासलेल्या राज्यांचा विकास करण्यासाठी आर्थिक साहाय्य पूरविले जाते.

४. देशाची साधनसंपत्ती मर्यादीत व पर्यायी उपयोगाची असल्याने देशासमोर आर्थिक प्रश्न निर्माण होतो. राज्यकोषीय धोरणाद्वारे देशातील साधनसंपत्तीचा पर्याप्त व काळजीपूर्वक वापर व्हावा म्हणून चैनीच्या वस्तू, मादक पदार्थ यांच्या निर्मितीवर जास्त दराने कर व जीवनावश्यक वस्तूंच्या निर्मितीवर कमी दराने कर आकारले जातात. त्याचा परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर राहतात.

५. राज्यकोषीय धोरण केवळ सरकारी क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्राचाही विचार करते. भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्रे अस्तित्वात असते. राज्यवित्तीय धोरणाद्वारे खाजगी क्षेत्रातील उत्पादन संस्थांना प्रोत्साहन, करविषयक सवलती, कमी व्याजदराने कर्जपूरवठा केला जातो. अशारितीने खाजगी क्षेत्राच्या विकासाचे कार्य राज्यवित्तीय धोरण करते.

६. देशाच्या व्यवहारतोलात असमतोलपणा असणे म्हणजे अनेक समस्यांना तोंड देणे होय. अविकसीत किंवा विकसनशील राष्ट्रांची आयात जास्त व निर्यात कमी असते म्हणून त्यांचा व्यवहारतोल प्रतिकूल असतो. राज्यवित्तीय धोरणाद्वारे निर्यात करणाऱ्या उद्योगांना व आयात पर्यायीकरण करणाऱ्या उद्योगांना अनेक सवलती दिल्या जातात अशारितीने देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलातील असमतोलपणा राज्यवित्तीय धोरणाच्या साहाय्याने दूर करता येते.

## ७.४ राज्यवित्तीय धोरणाची साधने (INSTRUMENT OF FISCAL POLICY)

केंद्रसरकारकडून राज्यवित्तीय धोरणाची आखणी व अंमलबजावणी केली जाते. त्यासाठी पुढील साधनांचा वापर केला जातो:

### १) कर:

राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जी साधने वापरतात त्यामध्ये कर आकारणी हे एक महत्त्वाचे साधन आहे.ज्यावेळेस अर्थव्यवस्थेत तेजी असते तेव्हा प्रत्यक्ष करांच्या दरात वाढ केल्यामुळे लोकांची क्रयशक्ती कमी होते. तेजीच्या काळात मागणी कमी व्हावी म्हणून लोकांच्या हातातील पैसा काढून घेणे आवश्यक असते. याउलट मंदीच्या परिस्थितीत लोकांच्या हातामध्ये पैसा नसल्यामुळे त्यांची मागणी कमी असते म्हणून लोकांच्या हातात पैसा राहावा यासाठी करांचे दर कमी केले जातात. अशारितीने प्रत्यक्ष करांच्या दरात बदल करून सरकार तेजी मंदीच्या परिस्थितीचे नियंत्रण करत असते.

### २) खर्च:

देशात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारला सहभाग महत्त्वाचा असतो. तेजीच्या काळात अर्थव्यवस्थेतील पैशाचा पूरवठा कमी करण्यासाठी सार्वजनिक खर्च कमी केला

जातो. कारण सरकारने केलेल्या खर्चामुळे लोकांच्या हातात जास्तीचा पैसा येऊन मागणीत वाढ झाल्यामुळे किंमतीत वाढ होते असे होऊ नये म्हणून खर्च कमी केला जातो. याउलट मंदीच्या परिस्थितीत लोकांच्या हातात पैसा कसा येईल यादृष्टीने सरकार प्रयत्न करीत असते म्हणून मंदीच्या काळात सार्वजनिक खर्चात वाढ करून कल्याणकारी योजना राबविल्या जातात, त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढून मागणी वाढते. मागणीतील वाढीमुळे उत्पादनात व रोजगारात वाढ होऊन अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडण्यास मदत होते.

**३) कर्ज:**

सरकारला आपल्या उत्पन्नातून सार्वजनिक खर्च भागविता येत नसेल तर सार्वजनिक कर्ज काढावे लागते. तेजीच्या काळात सरकार लोकांकडून कर्ज घेऊन सरकारी कर्जरोख्यांची खरेदी करतात त्यामुळे लोकांकडील पैसा सरकारकडे जमा होतो त्याचा परिणाम लोकांची क्रयशक्ती कमी होण्यास मदत होते. मागणीतील घटीमुळे किंमती कमी होतात. याउलट मंदीच्या परिस्थितीत लोकांकडे पैसा असणे असते. म्हणून सरकार लोकांना सवलतीच्या दराने कर्ज पूरविते. या कर्जाचा उपयोग गुंतवणूकीसाठी केला जातो. गुंतवणूकीतील वाढीमुळे उत्पादन, रोजगार, उत्पन्न, मागणी यात वाढ होते आणि अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडण्यास मदत होते.

## ७.५ राज्यवित्तीय धोरणाच्या मर्यादा (LIMITATIONS OF FISCAL POLICY)

राज्यवित्तीय धोरणाला काही मर्यादा येतात त्या पुढीलप्रमाणे:

१. अर्थव्यवस्थेतील चक्रीय बदलांचे नियंत्रण करण्यासाठी सरकार आपल्या महसुलात व सार्वजनिक खर्चात किती प्रमाणात व कोणत्या वेळेत बदल करते हे अत्यंत महत्त्वाचे असते. परंतु महसुलात व सार्वजनिक खर्चात नेमका किती बदल शक्य आहे हे ठरवणे कठीण आहे. सामान्यतः अंदाजपत्रक हे एका वर्षासाठी असते, त्यामुळे कर व सार्वजनिक खर्चात बदल करणे शक्य व योग्य नसते.

२. सार्वजनिक खर्चात सरकारला हवा तसा बदल करता येत नाही. एकदा सुरू केलेला खर्च थांबविता येत नाही समजा देशात मंदीची परिस्थिती असेत तर सरकारने हाती घेतलेली कामे मध्येच सोडता येत नाही.ती पूर्ण करावी लागतात जरी तेजीची परिस्थिती निर्माण झाली असेल.

३. सरकारच्या कर व सार्वजनिक खर्चातील बदलामुळे, तसेच आयात कर व निर्यात कर यातील यातील बदलामुळे देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम होत असतो. राजकोषीय धरण आखताना त्याचा आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम नाही याची काळजी घ्यावी लागते.

४. राजकोषीय धोरणामुळे अर्थव्यवस्थेतील एकूण खर्च व मागणी वाढवण्यासाठी केलेल्या उपायांमुळे बचत प्रवृत्ती अधिक असणाऱ्या उत्पन्न गटातील लोकांचे उत्पन्न वाढले तर राजकोषीय धोरणाचा अपेक्षित परिणाम सध्या होणार नाही.

munotes.in

५. राजकोषीय धोरणामुळे अर्थव्यवस्थेतील विविध उद्दिष्टे साध्य करताना खाजगी क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम नाही याची काळजी घ्यावी लागते. अर्थव्यवस्थेतील रोजगार पातळी वाढवण्यासाठी सरकार सार्वजनिक क्षेत्रात मोठया प्रमाणात गुंतवणूक करते. परंतू खाजगी क्षेत्रातील उद्योगपती नफ्याच्या हेतूने गुंतवणूक करतात ते रोजगार वाढीचा विचार करीत नाही.

६. राज्यवित्तीय धोरणा यश हे लोकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असते. सरकारने कर व खर्चात बदल करण्याचे धोरण अवलंबिले पण त्यामुळे लोकांच्या काम, बचत, गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर व क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होऊन राज्यवित्तीय धोरण फसण्याची शक्यता असते तसेच अर्थव्यवस्थेत चांगले वातावरण असेल तर करांच्या दरात वाढ करूनही भाववाढ कमी शक्य नसते.

७. अर्थव्यवस्थेत तेजी मंदीचे व्यापारचक्र सातत्याने येत असले तरीही प्रत्येक व्यापारचक्र नवीनच कारण घेऊन निर्माण होते त्यामुळे राज्य वित्तीय धोरणाची जी साधने पूर्वीच्या व्यापारचक्रात यशस्वी झाली ती आताच्या व्यापारचक्रात यशस्वी होतीलच हे निश्चित सांगता येत नाही .

## ७.६ सार्वजनिक अंदाजपत्रक: अर्थ व व्याख्या (THE PUBLIC BUDGET)

### ७.६.१ प्रस्तावना (Introduction):

अंदाजपत्रक म्हणजे अर्थसंकल्प होय. याला इंग्रजीत 'बजेट' (Budget) असे म्हणतात. Budget हा शब्द  बजेटी (Bugettee) या फ्रेंच शब्दापासून 'बजेट' हा शब्द अस्तित्वात आला आहे.  बजेट हा शब्द प्रथम इंग्लंडमध्ये १९३३ मध्ये वापरण्यात आला. एक वर्षाच्या कालावधीत विविध बाबींवर सरकार किती पैसा खर्च करू इच्छिते आणि हा पैसा कोणत्या मार्गांनी सरकार उभा होऊ शकतो याचे पत्रक म्हणजे अंदाजपत्रक होय. कायदेमंडळासमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणारा तो एक प्रकारचा प्रस्ताव असतो. आधुनिक काळात सरकारच्या अंदाजपत्रकाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. केंद्र सरकारच्या वतीने अर्थमंत्री सभागृहाला अंदाजपत्रक सादर करतात. त्यावर चर्चा होऊन नंतर स्वीकृती दिली जाते.

### ७.६.२ अंदाजपत्रकाचा अर्थ (Meaning of Budget):

भारतीय घटनेत अर्थसंकल्प या संज्ञेचा अर्थ – “अर्थसंकल्प म्हणजे वित्तीय वर्षाच्या संदर्भात भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या प्राप्ती आणि खर्चाचे अंदाज मांडणारे वार्षिक विवरणपत्र होय”. साधारणतः १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षातील सार्वजनिक खर्च व सार्वजनिक उत्पन्न याबाबतचे स्पष्टीकरण अंदाजपत्रकात असते. सरकारचा अंदाजे खर्च व अंदाजे उत्पन्न दाखविणारे पत्रक म्हणजे अंदाजपत्रक होय. अंदाजपत्रकाच्या पुढील काही व्याख्यांवरून अंदाजपत्रकाचा अर्थ स्पष्ट होईल.

### ७.६.३ अंदाजपत्रकाच्या व्याख्या (Definitions of Budget):

**१. जे.एल हॅन्सन:**

“सरकारच्या उत्पन्नाचा व खर्चाचा पुढील आर्थिक वर्षाचा अंदाज म्हणजे अंदाजपत्रक होय.”

**२. प्रा.फिंडले शिरास:**

“सरकारच्या उत्पन्न व खर्चाचे तयार केलेले वार्षिक पत्रक म्हणजे अंदाजपत्रक होय.”

**३. सी. एल. किंग:**

“सरकारी उत्पन्न व सरकारी खर्च यात ज्या साधनांद्वारे समतोल प्रस्थापित केला जातो ते साधन म्हणजे वित्तीय अंदाजपत्रक होय."

**४. फिलीप टेलर:**

“सरकारची वित्तीय विस्तारित योजना म्हणजे अंदाजपत्रक होय.”

कर वरील व्याख्यांवरून पुढील वर्षाचा सरकारी जमेचा अंदाज व सरकारी खर्चाचा अंदाज ज्यामध्ये व्यक्त केलेला असतो अशी कागदपत्रे होत.

## ७.७ अंदाजपत्रकांचे प्रकार (TYPES OF BUDGET)

**१. महसुली अंदाजपत्रक (Revenue Budget):**

महसुली अंदाजपत्रकात एका विशिष्ट आर्थिक वर्षात सरकार लोकहितासाठी कशा-कशावर खर्च करते आणि त्यासाठी सरकार कररूपाने व अन्य मार्गाने लोकांवर किती पडतो याची कल्पना येते.

**खर्चाच्या बाबी:**

अ) अंदाजपत्रकात सरकार आर्थिक वर्षात संरक्षणावर किती खर्च करते हे दाखविले जाते. त्यावरून संरक्षणाला सरकार किती प्राधान्य देते हे लक्षात येते.

ब) देशाची अर्थव्यवस्था चालविण्यासाठी सरकारला जो प्रकारचा खर्च करावा लागतो त्याचा समावेशही महसुली अंदाजपत्रकात केला जातो.

क) शिक्षण, आरोग्य, कुटुंबकल्याण, सकस व चांगला आहार, मनुष्यबळ विकास, अपघात विमा, निवृत्ती वेतन, इत्यादी कल्याणकारी योजनांवरील सरकारी खर्च महसुली अंदाजपत्रकात दाखविला जातो.

ड) कृषी विकास, रस्ते विकास, धरणे, कालवे, बंदरे यांचा विकास, वाहतूक व दळणवळण यांसारख्या बाबींचा विकास यासाठी सरकार किती सार्वजनिक खर्च करणार आहे हे महसुली अंदाजपत्रकात दाखविले जातेशाच्या आर्थिक विकासासाठी सरकारकडून

होणारा खर्च दाखविला जातो.महसुली अंदाजपत्रकात चालू बाबींवरील खर्चाचा विचार केला जातो.

**महसुलाच्या बाबी:**

उत्पन्नाचे मार्ग पुढीलप्रमाणे सांगता येतील:

अ) प्राप्तिकर कंपनीवर निगम कर, उत्पादन कर, आयात-निर्यात कर, भांडवली नफ्यावरील कर, संपत्ती कर, देणगी कर, वारसा कर असे कर आकारून सरकार उत्पन्न मिळविते.

ब) देशात सरकारच्या मालकीच्या काही स्थावर मालमत्ता असते. अशा मालमत्तेचे भाडे अथवा खंडरूपाने सरकारला उत्पन्न मिळते. सरकारी कर्जावरील व्याजरूपानेही व सरकारी कंपन्यांमधील शेअर्सवर लाभांश या स्वरूपात उत्पन्न मिळत असते.

क) देशात सरकारी मालकीच्या उद्योगापासून नफ्याच्या रूपानेही सरकारला काही उत्पन्न मिळत असते.

ड) स्टँप फी, नोंदणी फी, परवाना फी इत्यादी मार्गांनी सरकारला काही उत्पन्न मिळत असते. हे उत्पन्न महसुली अंदाजपत्रकात जमेच्या बाजूला दाखविले जाते.

**२. भांडवली अंदाजपत्रक (Capital Budget):**

भांडवली अंदाजपत्रकातील खर्चामुळे सरकारच्या उत्पन्नात वाढ होत असते. भांडवली अंदाजपत्रकातील हा खर्च विकासात्मक व रचनात्मक असा असतो.

अ) सरकारी खर्चाचे दोन भागात विभागणी केले जाते. (१) उत्पादक गुंतवणूक खर्च व (२) अनुत्पादक गुंतवणूक खर्च. सरकारच्या भांडवली गुंतवणूकीमुळे उत्पादन साधनांची निर्मिती होते त्याला सरकारचा उत्पादक स्वरूपाचा भांडवल गुंतवणूक खर्च असे म्हणतात. उदा. नवीन बंदरांची उभारणी, नवीन रेल्वेमार्ग बांधणे, नवीन विद्युतप्रकल्प उभारणे इत्यादींवरील गुंतवणूक खर्च हा उत्पादक स्वरूपाचा समजला जातो. परंतु सरकारच्या भांडवल गुंतवणूक खर्चापासून भविष्यात उत्पन्न मिळण्याची शक्यता नसते. त्याला अनुत्पादक भांडवली गुतवणूक खर्च असे म्हणतात. उदा. संरक्षणावरील खर्च.

ब) सरकार जेव्हा देशातील विविध खाजगी उद्योगांना व प्रकल्पांना कर्जे देते त्यांचा समावेश भांडवली अंदाजपत्रकाच्या खर्च बाजूला केला जातो.

क) सरकार जेव्हा परकीय कर्ज व त्यांच्या हप्त्यांसाठी खर्च करते. त्यांचाही समावेश खर्च बाजूला केला जातो.

ड) विविध घटक राज्ये व संस्थांना सरकारकडून जी कर्जे व अनुदाने दिली जातात त्यांचाही सार्वजनिक खर्चात समावेश होतो. नियोजन व विकास कार्ये पूर्ण व्हावीत यासाठीचा खर्चही यामध्ये समाविष्ट होत असतो.

**उत्पन्नाची बाजू:**

भांडवली अंदाजपत्रकात उत्पन्नाच्या बाजूला सरकारची देशांतर्गत नवीन कर्ज उभारणी, परदेशाकडून घेतलेली कर्जे व आर्थिक मदत तसेच जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय विकास संस्था यांच्याकडून मिळणारी कर्जे व मदत इत्यादींचा समावेश असतो. महसुली अंदाजपत्रकातील घसारा म्हणून बाजूला काढलेली रक्कम ही भांडवली अंदाजपत्रकात उत्पन्न म्हणून दाखविली जाते. तसेच महसुली अंदाजपत्रकातील शिलकी रक्कम भांडवली अंदाजपत्रकात उत्पन्नाच्या बाजूला जमा दाखविली जाते.

**३. संकलित अंदाजपत्रक (Combined Budget):**

महसुली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक ही दोन्ही जेव्हा एकत्रित मांडली असता त्याला संकलित अंदाजपत्रक असे म्हणतात. यावरून सरकारचा एकूण महसूल व एकूण खर्च याचा आढावा घेता येतो.

**४. समतोल अथवा संतुलित अंदाजपत्रक (Balanced Budget):**

एखाद्या आर्थिक वर्षातील सरकारच्या उत्पन्न व सार्वजनिक खर्च जेव्हा समान असतो तेव्हा त्या अंदाजपत्रकाला संतुलित अंदाजपत्रक असे म्हणतात. देशाच्या एकूण स्थैर्यावर व लोकांचे उत्पन्न, उपभोग, बचत, इच्छा, आकांक्षा अथवा कुवत यावर त्याचा काहीही परिणाम होत नाही.

ॲडॅम स्मिथ, जे. बी. से व इतर सनातन संप्रदायाच्या अर्थशास्त्रज्ञांनी समतोल अंदाजपत्रकाचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते, सरकारने कमीतकमी खर्च करावा. फक्त संरक्षण, अंतर्गत शांतता व न्यायव्यवस्था या गोष्टींवरच सरकारने खर्च करावा. समतोल अंदाजपत्रकाची संकल्पना ही ॲडॅम स्मिथ यांनी अदृश्य शक्ती' (Invisible Hand) यावर आधारित होती. सरकारी हस्तक्षेपाची अर्थव्यवहारात गरज नसते.

आधुनिक काळात संतुलित अंदाजपत्रकाचे समर्थन केले जात नाही. जगातील बहुसंख्य देशांनी कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारलेली आहे. देशातील लोकांचे कल्याण साधणे हे सरकारचे कर्तव्य असते. त्यासाठी सरकारला अनेक कल्याणकारी योजना राबवाव्या लागतात.

**५. शिलकी अंदाजपत्रक (Surplus Budget):**

शिलकी अंदाजपत्रकाला वाढाव्याचे किंवा आधिक्याचे अंदाजपत्रक असे म्हटले जाते. एखाद्या आर्थिक वर्षातील सरकारी उत्पन्ना हे सार्वजनिक खर्चापेक्षा अधिक असते तेव्हा त्याला शिलकी अर्थसंकल्प असे म्हणतात.

सार्वजनिक खर्चात कपात, सार्वजनिक उत्पन्नात वाढ आणि किंमत नियंत्रण यासाठी शिलकी अंदाजपत्रक उपयुक्त ठरते. शिलकी अर्थसंकल्पाचे अर्थव्यवस्थेवर त्याचे अनिष्ट परिणाम होतात. शिलकी अर्थसंकल्पाचा देशातील उत्पादन, उत्पन्न व रोजगार पातळी वर प्रतिकूल परिणाम होऊन सरकारला लोककल्याणाची कामे हाती घेता येत नाहीत.

**६. तुटीचे अंदाजपत्रक (Deficit Budget):**

एखाद्या आर्थिक वर्षात देशातील सार्वजनिक वार्षिक उत्पन्नापेक्षा सार्वजनिक खर्च अधिक असेल तर त्याला तुटीचे अंदाजपत्रक म्हणतात. कर व इतर मार्गांनी सरकारला मिळणारे उत्पन्न कमी करून विविध बाबीवरील सरकारी खर्चात वाढ केली जाते.

लॉर्ड जे.एम. केन्स व इतर अर्थशास्त्रज्ञ यांनी तुटीच्या अर्थसंकल्पाचे समर्थन करतात. कारण तुटीच्या अंदाजपत्रकाने देशातील उत्पन्न मागणी, उत्पादन, रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न यांमध्ये वाढ घडून येते. विकसनशील देशांची अर्थव्यवस्था गतिमान करून आर्थिक विकासास मदत होते. आर्थिक मंदी, आर्थिक विषमता कमी करणे, भांडवलनिर्मिती, लोकांच्या बचतीत व गुंतवणुकीच्या इच्छेत व कुवतीमध्ये वाढ इ. साठी तुटीचा अर्थसंकल्प उपयुक्त ठरतो. तुटीच्या अंदाजपत्रकाद्वारे सार्वजनिक खर्चात वाढ करून उत्पादनाचे प्रमाण, अवजड व मूलभूत उद्योगांची उभारणी व निवडक वस्तू व सेवांच्या उत्पादन, उत्पादन घटक व साधनसामग्रीचा कार्यक्षमतेने उपयोग करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते. व्यक्तिगत उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून नागरिकांचे राहणीमानात वाढ होऊन देशाची प्रगती होऊ शकते. म्हणूनच तुटीच्या अंदाजपत्रकाचे समर्थन केले जाते.

## ७.८ अंदाजपत्रकीय धोरणाचे महत्त्व व उपयोग (IMPORTANCE AND USES OF BUDGETARY POLICY)

१. आर्थिक वर्षातील सरकारी खर्चाची व उत्पन्नाची तरतूद केली जाते.

२. सरकारच्या सार्वजनिक खर्चाचे वाईट परिणाम टाळून उत्पादन, विभाजन, उत्पन्नाचे वाटप, पूर्ण रोजगार यासाठी उत्पन्नाचा उपयोग होतो.

३. पूर्ण रोजगार प्रस्थापित झाल्यानंतर सार्वजनिक खर्चात काळानुसार बदल करता येतो.

४. अर्थव्यवस्थेत होणाऱ्या भाववाढीच्या काळामध्ये करामध्ये वाढ करून वित्तीय साधनांचा अनुकूल परिणाम घडवून आणता येतो.

५. चक्रीय चढउताराच्या काळात सार्वजनिक खर्चाच्या परिस्थितीत आवश्यकतेप्रमाणे बदल व उपयोग करता येतो.

## ७.९ तुटीचे अंदाजपत्रक विषयक काही संकल्पना (SOME CONCEPT OF DEFICIT BUDGET)

"तुटीचे अंदाजपत्रक म्हणजे सरकारच्या महसुली आणि भांडवली उत्पन्नापेक्षा महसुली आणि भांडवली खर्चाचे अधिक्य असलेले अंदाज पत्रक होय." सरकारच्या एकूण खर्चापेक्षा एकूण उत्पन्न कमी असणे असाही तुटीचा अंदाज पत्रकाचा अर्थ घेता येईल.

भारतात तुटीचा अंदाज करण्यासाठी महसुली आणि भांडवली अशा दोन्ही आयव्ययाचा विचार केला जातो. भारत सरकारच्या एकूण उत्पन्नात महसुली आणि भांडवली अशा दोन्ही उत्पन्नाचा समावेश केला जातो तर खर्चात महसुली आणि भांडवली अशा दोन्ही

खर्चाचा विचार केला जातो. जेव्हा सरकारचा सार्वजनिक उत्पन्नापेक्षा सार्वजनिक खर्च जास्त असतो तेव्हा तुटीचे अंदाजपत्रक असते.ही तुट समजण्यासाठी तुटीच्या विविध संकल्पनाचा अभ्यास आवश्यक आहे.

**१) अंदाज पत्रकीय तूट (Budget Deficit):**

जेव्हा महसूली आणि भांडवली उत्पन्नापेक्षा महसुली आणि भांडवली खर्च जास्त असतो. तेव्हा जी तुट निर्माण होत असते . त्या तुटीस अंदाज पत्रकीय तूट असे म्हणतात. ही तूट मोजण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो.

अंदाज पत्रकीय तूट = एकूण प्राप्ती – एकूण खर्च

एकूण प्राप्तीत = महसुली उत्पन्न व भांडवली उत्पन्न

महसुली उत्पन्न = कर व करेत्तर उत्पन्न

भांडवली उत्पन्न = कर्ज उभारणी, कर्जाची परतफेड व इतर उत्पन्न

एकूण खर्च = महसुली खर्च व भांडवली खर्च

महसुली खर्च = व्याजावरील खर्च, प्रशासकीय खर्च, सामाजिक व आर्थिक सेवांवरील खर्च

भांडवली खर्च = गुंतवणूक खर्च उदा. रस्ते,धरणे, रेल्वे इ.

**२) महसुली तूट (Revenue Deficit):**

महसुली उत्पन्नापेक्षा महसुली खर्च जेवढा जास्त असतो. त्याला महसुली तूट असे म्हणतात.

महसुली तूट = महसुली प्राप्ती - महसुली खर्च

महसुली उत्पन्न = कर व करेत्तर उत्पन्न

महसुली खर्च = व्याजावरील खर्च, प्रशासकीय खर्च, सामाजिक व आर्थिक सेवांवरील खर्च

**३) वित्तीय तूट (Fiscal Deficit):**

महसुली प्राप्ती, अनुदाने आणि कर्जेत्तर भांडवली प्राप्ती यांच्या पेक्षा सरकारच्या एकूण खर्च जास्त असतो. हा खर्च जेवढा जास्त असतो तेवढी वित्तीय तूट असते.

वित्तीय तूट = अंदाज पत्रकीय तूट + कर्ज आणि इतर देयता.

= (महसुली प्राप्ती कर्जाची वसुली + इतर प्राप्ती) - (एकूण खर्च)

**४) प्राथमिक तूट (Primary Deficit):**

वित्तीय तुटीतून दिलेले व्याज वजा केली असता प्राथमिक तूट समजते.

प्राथमिक तूट = वित्तीय तूट - दिलेले व्याज.

**५) मौद्रीक तूट (Monetised Deficit):**

केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेकडून केलेल्या उचलमध्ये झालेली निव्वळ वाढ म्हणजे मौद्रिक तूट होय.

## ७.१० तुटीचा अर्थभरणा (DEFICIT FINANCE)

### ७.१०.१ प्रस्तावना:

आधुनिक काळात राजकोषीय धोरणाचे तुटीचा अर्थभरणा हे महत्त्वाचे साधन मानले जाते. सरकारच्या एकूण प्राप्ती पेक्षा एकूण खर्चाचे जेवढे अधिक्य असते. त्याला अंदाज पत्रकीय तूट असे म्हणतात. तूट असलेल्या अंदाज पत्रकास तुटीचे अंदाजपत्रक (Deficit Budget) असे म्हणतात. अंदाज पत्रकातील तूट भरून काढण्यासाठी जे प्रयत्न केले जातात त्याला तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात. तूट भरून काढण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून ना परतावा अटीवर कर्ज घेतले जाते. मध्यवर्ती बँक रोख्यांच्या तारणाच्या आधारावर नवीन चलन निर्माण करून ते कर्ज रूपाने सरकारला देते. या अर्थाने विचार केल्यास तुटीचा अर्थभरणा म्हणजे अधिक नवीन चलनी नोटा छापून चलनात आणणे होय.

भारताच्या संदर्भात विचार केल्यास सरकारचे महसुली आणि भांडवली उत्पन्न यांचा एकत्रित विचार केला जातो. आणि महसुली खर्च आणि भांडवली खर्च यांचा एकत्रित विचार केला जातो. एकूण उत्पन्नापेक्षा जेवढा जास्त असतो तेवढी अंदाज पत्रकीय तूट असते. ती भरून काढण्यासाठी सरकारमार्फत प्रयत्न केले जातात. भारतीय नियोजन मंडळाच्या मते- सरकारच्या अंदाजपत्रकीय व्यवहारामुळे अर्थव्यवस्थेतील खरेदी शक्तीत होणारी निव्वळ वाढ म्हणजे तुटीचा अर्थ भरणा होय.

### ७.१०.२ व्याख्या:

१. अंदाजपत्रकात जमा रक्कमेपेक्षा खर्च रक्कम अधिक असल्यास अशी तुट भरून काढण्यासाठी ज्या मार्गाचा अवलंब केला जातो त्यास तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात.

२. सार्वजनिक खर्च हा सरकारी उत्पन्नापेक्षा जास्त झाल्यामुळे आलेली तुट भरून काढण्यासाठी केलेली व्यवस्था म्हणजे तुटीचा अर्थभरणा होय.

३. भारतीय नियोजन मंडळ.

“सरकारच्या अंदाजपत्रकीय व्यवहारामुळे अर्थव्यवस्थेतील खरेदी शक्तीत होणारी निव्वळ वाढ म्हणजे तुटीचा अर्थभरणा होय.”

### ७.१०.३ तुटीचा अर्थभरणा करण्याच्या पद्धती:

१. मध्यवर्ती बँकेकडून कर्ज

२. रोख शिल्लकेतील रकमा

३. व्यापारी बँकांना सरकारी कर्जरोखे

४. चलन पुरवठयात वाढ

### ७.१०.४ तुटीच्या अर्थभरणाचे उद्देश:

१. युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास सरकारला सार्वजनिक खर्च मोठया प्रमाणात करावा लागतो.

२. अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर काढून रोजगार निर्माण करण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करावा लागतो.

३. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सरकारला शेती, उद्योग व सेवा क्षेत्रावर खर्च करावा लागतो .

४. देशातील साधनसामुग्रीची गतिशीलता वाढवण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करावा लागतो.

५. देशामध्ये रोजगार निर्माण करून लोकांच्या राहणीमानात सुधारणा करण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करण्याची आवश्यकता असते.

### ७.१०.५ तुटीच्या अर्थभरणाचे महत्व (Importance of Deficit financing):

१. केन्स यांच्या मते परिणामकारक मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक मंदी येत असते. आर्थिक मंदीच्या काळात मागणीच्या कमतरतेमुळे देशात उत्पादन, व रोजगारातही घट होते. रोजगारातील घटीमुळे परिणामकारक मागणी आणखी कमी होते. कारण लोकांकडील उत्पन्न कमी झाल्यामुळे क्रयशक्ती कमी झालेली असते. सर्वत्र नैराश्याचे वातावरण असते. या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक खर्चात वाढ करून रोजगाराच्या संधी निर्माण करणे हाच मार्ग असतो. जर सरकारने विकासात्मक कार्ये हाती घेऊन सार्वजनिक खर्च केला तर रोजगारात वाढ होऊन लोकांना उत्पन्न प्राप्त होईल. लोकांची क्रयशक्ती वाढून परिणामकारक मागणीत वाढ होऊन मंदीची परिस्थिती कमी होईल.

२. युद्ध काळात सरकारच्या सार्वजनिक खर्चात वाढ होत असते. हा अचानकपणे वाढणारा खर्च भागविण्यासाठी तुटीच्या अर्थभरण्याचा वापर केला जातो.

३. अल्प विकसित किंवा विकसनशील देशात आपल्या देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी अनेक विकासात्मक योजना राबविण्यासाठी प्रचंड प्रमाणावर भांडवलाची गरज असते. ही गरज तुटीच्या अर्थभरण्यातून भागविता येते.

४. अल्पविकसित व विकसनशील देशात बचतीचा दर कमी असल्यामुळे भांडवल निर्मिती आणि गुंतवणूकीत अडचणी निर्माण होतात. अशा स्थितीत गुंतवणूक वाढविण्यासाठी सरकार तुटीचा अर्थभरणा करून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीतून उत्पादन,

रोजगार आणि उत्पन्नात वाढ निर्माण करते. यातून खाजगी उद्योजक प्रेरित होऊन ते नवीन गुंतवणूक करण्यास प्रेरित होतात.

५. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी शिक्षण, आरोग्य विषयक सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रेल्वे मार्ग, वीज प्रकल्प इत्यादीच्या निर्मितीसाठी सरकारला आपल्या खर्चात वाढ करावी लागते.

### ७.१०.६ तुटीच्या अर्थभरणाची मर्यादा (Limits of Deficit Financing):

तुटीचा अर्थभरणा जास्तीतजास्त फायद्याचा ठरण्यासाठी व त्याचे दुष्परिणाम कमीतकमी करण्यासाठी तुटीच्या अर्थभरण्याच्या पुढील मर्यादा लक्षात घेणे गरजेचे आहे.

१. तुटीच्या अर्थभरण्याने देशात एकूण चलन पुरवठयात किती वाढ झाली यावरून तुटीच्या अर्थभरण्याची मर्यादा ठरविता येईल.

२. अपुरा वापर असलेल्या साधनसामग्रीचे प्रमाण लक्षात घेऊनच तुटीच्या अर्थभरण्याचे प्रमाण ठरवावे.

३. देशातील किंमत पातळी व वेतन दर कितपत नियंत्रित आहेत त्यावर तुटीच्या अर्थभरणा अवलंबून असतो.

४. परदेशातील चलनाचा साठा मोठया प्रमाणात असतानाच तुटीचा अर्थभरणा करावा. कारण त्यामुळे भाववाढ मर्यादित ठेवता येते.

४. तुटीच्या अर्थभरण्याचा वापर शक्यतो उत्पादक ठरणाऱ्या गुंतवणुकीसाठीच केला जावा.

५. तुटीचा अर्थभरणा करताना सरकारची करव्यवस्था अत्यंत कार्यक्षम ठेवावी व गरज असेल तरच कर वाढवावेत.

६. तुटीचा अर्थभरणा करताना वेतनदारावर नियंत्रणअसावे व सरकारने आपला अनावश्यक व अनुत्पादक खर्च कमीतकमी करावा.

७. तुटीचा अर्थभरणा करीत असताना बँकिंग क्षेत्रावर मध्यवर्ती बँकेचे कडक नियंत्रण असावे.

८. देशातील सरकारच्या वित्तीय व चलनविषयक धोरणाच्या परिणामावर तुटीचा अर्थभरणा अवलंबून असतो.

## ७.११ सारांश (SUMMARY)

अर्थव्यवस्थेचे कार्य सुरळीत सुरू राहण्याच्या दृष्टीने राज्यवित्तीय धोरणाला महत्त्वाचे स्थान असते. राज्यवित्तीय धोरणाला हे महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देण्यात लॉर्ड जे.एम. केन्सचा यांचा सिहांचा वाटा आहे. केंद्रसरकारकडून राज्य वित्तीय धोरणाची आखणी व

अंमलबजावणी केली जाते त्यासाठी कर, सार्वजनिक खर्च व कर्ज या साधनांचा वापर केला जातो.

आधुनिक काळात सरकारच्या अंदाजपत्रकाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. अंदाजपत्रकामुळे सरकारच्या सार्वजनिक खर्चाचे वाईट परिणाम टाळून उत्पादन, विभाजन, उत्पन्नाचे वाटप, पूर्ण रोजगार यासाठी उत्पन्नाचा उपयोग होतो.

भारत सरकारच्या एकूण उत्पन्नात महसुली आणि भांडवली अशा दोन्ही उत्पन्नाचा समावेश केला जातो तर खर्चात महसुली आणि भांडवली अशा दोन्ही खर्चाचा विचार केला जातो. जेव्हा सरकारचा सार्वजनिक उत्पन्नापेक्षा सार्वजनिक खर्च जास्त असतो तेव्हा तुटीचे अंदाजपत्रक असते.ही तुट समजण्यासाठी तुटीच्या विविध संकल्पनाचा अभ्यास आवश्यक आहे. अंदाजपत्रकीय तुट, महसुली तुट, वित्तीय तुट, प्राथमिक तुट व मौद्रिक तुट या संकल्पना आहेत,

अंदाज पत्रकातील तूट भरून काढण्यासाठी जे प्रयत्न केले जातात त्याला तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात. तूट भरून काढण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून ना परतावा अटीवर कर्ज घेतले जाते. मध्यवर्ती बँक रोख्यांच्या तारणाच्या आधारावर नवीन चलन निर्माण करून ते कर्ज रूपाने सरकारला देते. या अर्थाने विचार केल्यास तुटीचा अर्थभरणा म्हणजे अधिक नवीन चलनी नोटा छापून चलनात आणणे होय.

## ७.१२ प्रश्न (QUESTIONS)

१. राज्यवित्तीय धोरणाची व्याख्या सांगून राज्यवित्तीय धोरणाची उद्दीष्ट्ये स्पष्ट करा.

२. राज्यवित्तीय धोरणाची विविध साधने कोणती?

३. राज्यवित्तीय धोरणाच्या मर्यादा विशद करा.

४. अंदाजपत्रकाच्या व्याख्या सांगून अंदाजपत्रकांचे प्रकार सांगा.

५. अंदाजपत्रकीय धोरणाचे महत्त्व व उपयोग स्पष्ट करा.

६. तुटीचे अंदाजपत्रक विषयक काही संकल्पना स्पष्ट करा.

७. तुटीचा अर्थभरणा ही संकल्पना स्पष्ट करा.

८. तुटीचा अर्थभरणा करण्याच्या पद्धती:

९. तुटीच्या अर्थभरणाचे उद्देश, महत्व आणि मर्यादा स्पष्ट करा.

*****

# ८

# शासनाचे राजकोषीय संबंध

**घटक रचना**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ केंद्र व राज्य सरकारची कार्य विभागणी (Division of Function)

८.३ केंद्रात व राज्यात वित्तीय साधनसामग्रीचे विभाजन

८.४ वित्त आयोगाची कार्ये (Functions of Finance Commission)

८.५ सारांश

८.६ प्रश्न


## ८.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. भारतातील संघराज्य वित्तव्यवस्थेचा अभ्यास करणे.

२. केंद्र व राज्य सरकारच्या कार्याची विभागणी अभ्यासणे.

३. केंद्रात व राज्यात वित्तीय साधनसामग्रीचे विभाजन कसे होते याचा अभ्यास करणे.

४. वित्त आयोगाची कार्ये अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

२६ जानेवारी, १९५० पासून संपूर्ण भारताला राज्यघटना लागू करण्यात आली व त्या घटनेनुसार भारत हे एक संघराज्य बनले. खऱ्या अर्थाने संघराज्यीय शासनव्यवस्था ही भारत सरकारच्या १९३५ च्या कायद्याने (Government of India Act 1935) अस्तित्वात आली आहे. आपल्या देशातील व्यवस्था संघीय वित्त स्वरुपाची असून केंद्र व राज्ये यांच्यामध्ये साधनसामुग्री व जबाबदारी विभागलेली आहे.

भारतीय राज्यघटनेनुसार दर ५ वर्षांनी वित्त आयोगाची नियुक्ती करण्यात येते. या वित्त आयोगाकडे केंद्रीय करांचे वाटप घटक राज्यांमध्ये कोणत्या प्रकारे करावयाचे या संदर्भात राष्ट्रपतींकडे शिफारशी करण्याचे कार्य देण्यात आलेले आहे. या शिफारशीनुसार संघराज्यातील राज्यांना केंद्राकडून त्याच्या उत्पन्नातील हिस्सा तसेच अनुदानाचे वाटप केले जाते.

munotes.in

## ८.२ केंद्र व राज्य सरकारची कार्य विभागणी (DIVISION OF FUNCTION)

भारतीय राज्यघटनेनुसार केंद्र सरकार व राज्य सरकारे यांनी पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या व कार्ये यांचे विभाजन खालील तीन प्रकारच्या याद्यांमध्ये केलेले आहे.

**१. केंद्र सूची:**

केंद्र सूचीत ९७ विषय असून तिच्यात केंद्र सरकारने करावयाच्या कार्याचा समावेश करण्यात आला आहे. चलननिर्मिती व चलननियंत्रण, आंतरराष्ट्रीय व्यापार, विदेशी चलनविषयक व्यवहार, हवाई वाहतूक, जहाज वाहतूक, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, पोष्ट व तारखाते, दूरसंचार, विदेशी , भांडवल आगमन व निगमन, जनगणना, कायदे, राज्यांच्या कार्यावर लक्ष ठेवणे व राज्यांचे हिशेब तपासणे इत्यादी कार्ये केंद्र सरकारला करावी लागतात.

**२. राज्यसूची:**

राज्यसूचीत ६६ विषय असून राज्यसरकारने करावयाच्या कार्याचा समावेश राज्यसूचीत करण्यात आला आहे. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि प्रशिक्षण, अंतर्गत रस्ते, जलवाहतूक आणि व्यापार , इत्यादी कार्य राज्यसरकारला करावी लागतात.

**३. समवर्ती सूची:**

समवर्ती सूचीत ४७ विषय असून केंद्र सकरार व राज्य सरकार या दोघांनी करावयाच्या कार्याचा समावेश या सूचीत करण्यात आला आहे. यात सामाजिक सुरक्षितता, कामगार कल्याण, कामगार कलह, किंमत नियंत्रण, आर्थिक व सामाजिक नियोजन, फौजदारी कायदे इत्यादींचा समावेश होतो. ही कार्ये केंद्र सरकार व राज्य सरकार या दोहोंना एकत्रितरित्या करावी लागतात.

भारतीय राज्य घटनेतील तरतूदीनुसार केंद्र सरकारला सर्वोच्च अधिकार देण्यात आला आहे. राष्ट्रहिताची सर्व कामे सोपविण्यात आली आहेत. राज्य सरकारकडे लोककल्याणाच्या कार्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहेत.

## ८.३ केंद्रात व राज्यात वित्तीय साधनसामग्रीचे विभाजन

भारतात १९३५ च्या कायद्यानुसार संघराज्यात केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यात वित्तीय अधिकारांची विभागणी केलेली आहे. भारतीय राज्यघटनेनुसार केंद्र सरकार व राज्य सरकारे यांना काही कार्ये ठरवून दिलेली आहेत. ही कार्ये पार पाडण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारे यांना मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो व हा खर्च करण्यासाठी केंद्राला व राज्याला काही वित्तीय अधिकार देण्यात आलेले आहेत. त्या वित्तीय अधिकाराची विभागणी खालीलप्रमाणे आहे:

**१. केंद्र सरकारची उत्पन्न साधने:**

केंद्रीय करांमध्ये पुढील वेगवेगळ्या करांचा समावेश होतो:

उत्पन्न कर, उत्पादन शुल्क , जकात कर (आयात-निर्यात कर), निगम कर, तंबाखू व इतर भारतात उत्पादित वस्तूंवरील उत्पादन शुल्क (मादक पेय व औषधे वगळून), वारसा मालमत्तेवरील कर (शेतजमीन वगळून), रेल्वे, चलनातील नोटा व माणी, पोस्ट व तार, दूरध्वनी व प्रसारण, शेअर बाजार व वायदा बाजारातील व्यवहार तिकिटे कर, चेकस्, हुंडी, विमा पॉलिसी, शेअरचे हस्तांतरण इ. साठी वापरण्यात देणारी तिकिटे, रेल्वे प्रवासी व मालावर आकारले जाणारे टर्मिनल कर, प्रवासी भाडे व माल भाडे इ. वरील कर इत्यादी करांचा समावेश केंद्र सरकारच्या अखत्यारित होतो.

१. करआकारणी आणि वसुली व विनियोगसुद्धा केंद्र सरकारकडे असतो असे कर. उदा. निगम कर, जकात कर.

२. कर आकारणी वसुलीसुद्धा केंद्र सरकारच करते; त्यातून प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा ठरावीक भाग राज्य सरकारना दिला जातो असे कर. उदा. प्राप्तिकर, केंद्रीय उत्पादन कर.

३. कर आकारणी व वसुली देखील केंद्र सरकारच करते. त्यातून प्राप्त झालेले उत्पन्न पूर्णतः राज्यांना दिले जाते असे कर. उदा. वारसा कर, रेल्वे माल प्रवासी वाहतूक, शेतजमीन व्यतिरिक्त इतर मालमत्तेवरील मालमत्ता कर इत्यादी.

४. कर आकरणी केंद्र सरकार करते आणि करांची वसुली आणि विनियोग करण्याचा अधिकार राज्यांकडे असतो असे कर.

उदा. वैद्यकीय साधनसामग्रीवर तसेच स्वच्छतागृहासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीवर आकारले जाणारे कर, औषधांवरील कर, सौंदर्य प्रसाधनावरील कर, स्टँप ड्यूटि इत्यादी.

**२. राज्य सरकारची उत्पन्न साधने:**

भारतीय राज्यघटनेनुसार काही कर आकारण्याचे स्वातंत्र्य राज्य सरकारना देण्यात आलेले आहे. या करांची आकारणी, वसुली तसेच विनियोग करण्याचा संपूर्ण अधिकार राज्य सरकारना असतो.

जमीन महसूल, शेती उत्पन्न कर, मादक पेये, अफू व इतर मादक औषधावरील उत्पादन शुल्क, शेतजमिनीवरील वारसा कर, मनोरंजन, जुगार इ. वरील कर, वीज उपभोग व विक्रीवरील कर, रस्ते व जल-मार्गाद्वारे केल्या जाणाऱ्या माल व प्रवासी वाहतुकीवरील कर, मोटार गाडीवरील कर, स्थानिक जकात, दरडोई कर इत्यादी करांचा समावेश राज्य सरकारच्या उत्पन्न साधनांमध्ये होतो.

वरीलप्रमाणे भारतीय संघराज्यातील घटनेमध्ये केंद्र व राज्य सरकारांनी पार पाडावयाची कार्ये व ती पूर्ण करण्यासाठी लागणारा वित्तीय निधी उभारण्यासाठीचे मार्ग यांचे विभाजन केलेले आहे.

munotes.in

## ८.४ वित्त आयोगाची कार्ये (FUNCTIONS OF FINANCE COMMISSION)

भारतीय संघ राज्यात केंद्र सरकार, घटक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांच्यामध्ये राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्यांची आणि उत्पन्न मार्गांची विभागण केलेली आहे. जबाबदारीच्या दृष्टीने विचार केल्यास राज्यांकडे कल्याणकारी राज्याच्या निर्मितीची जबाबदारी जास्त आणि उत्पन्न साधने मात्र मर्यादित आहेत. यातच काही कर हे केंद्र आणि राज्य यांच्यात विभागलेले आहेत. विभाजक करांचा केंद्र आणि राज्यांना किती वाटा मिळावा, यासाठी काय निकष वापरावेत, राज्यांना किती विकासात्मक अनुदान द्यावे या विषयी शिफारस करण्याची जबाबदारी घटनेने वित्त आयोगावा सोपविली आहे.

भारतीय राज्य घटनेतील कलम २८० नुसार देशाचे राष्ट्रपती वित्त स्थापना करतात, राष्टपती देशातील एका तज्ज्ञ व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली वित्त आयोगाची स्थापना करतात, अध्यक्षासोबत काही सदस्यांची नियुक्ती वित्त आयोगाचे सदस्य म्हणून राष्ट्रपतींकडून केली जाते. प्रत्येक वित्त आयोगाचा कालावधी पाच वर्षाचा असतो. पाच वर्ष पूर्ण होण्याच्या अगोदर नवीन वित्त आयोगाची स्थापना केली जाते. वित्त आयोगाकडे राष्टपती पुढील जबाबदारी सोपवितात.

१) केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात विभाजक करांपासून मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचे विभाजन कसे करायचे या बाबत शिफारस करणे.

२) घटक राज्यांना अनुदाने कोणत्या तत्वानुसार द्यायची या बाबत शिफारस करणे.

३) राष्टपतींनी निर्देश केल्याप्रमाणे केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील वित्तीय संबंधाबाबत शक्यता पडताळून पाहणे व शिफारस करणे.

वरील तीन प्रमुख बाबींबाबत शिफारशी राष्टपतींना सादर करायच्या असतात. ह्या तीन शिफारशी करण्यासाठी भारतात १९५२ ते २०१५ या कालावधीत तेरा वित्त आयोग स्थापन करण्यात आले. २०१५ ते २०२० या कालावधीसाठी चौदावा वित्त आयोगाच्या शिफारशी स्विकाराव्या गेल्या आहेत. आता पर्यंतच्या चौदा वित्त आयोगांनी आपल्या शिफारशी राष्टपतींना सादर केलेल्या आहेत. विविध वित्त आयोगांनी केलेल्या शिफारशींचे तीन गटामध्ये विभाजन केले जाते.

i) प्राप्तीकर व इतर विभाजक करांचे केंद्र व राज्यात विभाजन.

ii) केंद्राकडून घटक राज्यांनी दिली जाणारी अनुदाने.

iii) संघराज्याकडून (केंद्र सरकार) घटक राज्यांना दिली जाणारी कर्जे.

## ८.५ सारांश (SUMMMARY)

भारतात संघीय वित्त व्यवस्था असून केंद्र व राज्य यांच्यात कार्यक्षेत्राची विभागणी झालेली आहे. केंद्र व राज्य सरकारमध्ये साधनसामुग्री व जबाबदाऱ्यांची विभागणी घटनेने स्पष्ट

केलेली आहे. या व्यवस्थेत घटनेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. राज्यांना त्यांच्या स्वत:च्या वित्तीय साधनापासून उत्पन्न मिळते. तसेच केंद्र सरकारकडूनही स्थानांतराच्या मार्गाने वित्तीय साधनसामुग्री मिळते. यात केंद्र सरकारच्या करातील हिस्सा, सहाय्यक अनुदाने , कर्जे वगैरेचा समावेश होतो. केंद्राकडून राज्यांना किती हिस्सा मिळेल हे कर व शुल्क आणि सहाय्यक अनुदाने यांच्यातील हिश्याच्या रूपाने किती रक्काम राज्यांना स्थलांतरीत केली जाते आणि कोणत्या तत्त्वाच्या आधारे हि विभागणी केली जाते. यावर अवलंबून असते. राज्यांच्या वित्तीय गरजा, राज्यातील लोकसंख्या, वसुली मागासपणा वगैरे निकषाच्या आधारे साधन सामुग्रीची वाटणी केली जाते.

केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यातील वित्तीय संबधात लवचिकता आणण्याचे कार्य वित्त आयोग करतो. वित्त आयोग वेयक्तिक ग्राशिकरापासून मिळणाऱ्या उत्पनाचे वाटप. केंद्रीय उत्पादन कराचे वाटप, मालमत्तेवरील करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे वाटप, केंद्र सरकारांना द्यावयाची अनुदाने वगैरे बाबतीत शिफारशी करतात.

## ८.६ प्रश्न (QUESTIONS)

१. भारतातील संघराज्य वित्तव्यवस्था यावर टीप लिहा.

२. केंद्रात व राज्यात वित्तीय साधनसामग्रीचे विभाजन यावर भाष्य करा.

३. वित्त आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

*****

munotes.in